|| जय माता जी ||



|| माता बारोंडादेवी प्रसन्न ||

गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : १३ अंक : ३ सोमवार दि. २७ जानेवारी २०२५ ते रविवार दि. २ फेब्रुवारी २०२५ पाने : ८ किंमत : ५/- रुपये

www.crimesandhya.com महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ संभाजीनगर ■ लातूर ■ धाराशिव ■ सोलापूर ■ नांदेड


## मित्राच्या पत्नीवर अतिप्रसंग केला स्त्रीलंपट सुशांत जीवानिशी गेला

बदलापूर/क्राईम रिपोर्टर

काही लोक इतके लंपट असतात कि त्यांची मित्राच्या बायकोवरच वाईट नजर असते. मित्रत्वाच्या नात्याने मित्राच्या घरी येणेजाणे ठेवतात आणि नकळत मित्राच्या पत्नीला जाळ्यात ओढतात. पण मैत्रीतील हि गद्दारी कधीतरी प्राणघातक ठरू शकते. बदलापूर नजीकच्या शिरगावमध्ये अशीच एक घटना घडली नरेश आणि सुशांत हे मित्र होते. पण नरेशच्या पत्नीवर सुशांतची वाईट नजर होती. पण ती त्याला भाव देत नव्हती. त्यामुळे त्याने तिच्यावर अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न केला आणि मैत्रीला डाग लावला. मात्र हा प्रकार ...पान २ वर

## कुटुंबकर्त्याच्या दारूच्या व्यसनामुळे होत्याचे नव्हते झाले दहावीतल्या मुलाने आईच्या मदतीने बापालाच ठार केले

नागपूर/क्राईम रिपोर्टर









**आजकाल रक्ताची नाती सुद्धा नावापुरतीच उरली आहेत असे म्हणायला हरकत नाही. कारण चार भिंतीत एकच छताखाली राहणारी रक्ताच्या नात्याची माणसे जेव्हा नात्यातच रक्ताचे पाट वाहण्या इतपत निष्ठूर बनतात तेव्हा सारे काही संपलेले असतात. कुटुंबातील एखादा माणूस जर चुकीचा वागत असेल तर त्याला समजावायला हवे, सांभाळून घ्यायला हवे, पण तसे प करता त्याला कायमचे संपवणे हा कुठला न्याय? ही कुठली माणुसकी? जी माणसे आपल्या कुटुंबातील चुकलेल्या माणसाला माफ करीत नाहीत, त्याला दया दाखवत नाहीत, ती माणसे इतरांसाठी काय करतील यावर कुणीही विश्वास ठेवणार नाही. दारुडा माणूस कुटुंबासाठी डोकेदुखी असतो हे खरे आह, पण शेवटी तो आपल्या रक्ताच्या नात्यातला आहे. त्यामुळे त्याचे रक्त सांडलेले आपण पाहू शकत नाही. याची प्रत्येकाला जाणीव असायला हवी. पण आजकाल माणसे कृतघ्न झाली आहेत. त्यांना उपकारांची जाणीव राहिलेली नाही. त्यामुळे एखादा स्वार्थी माणूस आई-बापाला ठार करायलाही मागेपुढे पाहत नाही. अशीच एक घटना नागपूरच्या हुडकेश्वर भागात घडली आहे. वडील दारू पितात म्हणून एका दहावीतल्या मुलाने आईच्या मदतीने वडिलांची हत्या केली. या घटनेने परिसर हादरला असून पोलिसांनी मायलेकांना अटक केली आहे.**

गृहमंत्र्याच्या शहरातील कायदा व सुव्यवस्था बिघडली असून हत्याकांडाचे सत्र थांबता थांबत नसल्याचे चित्र आहे. शहरातील गँगवार आणि हत्याकांडासारख्या घटनांवर पोलिसांनी नियंत्रण ठेवण्यात अपयश आल्यामुळे पोलिसांच्या कार्यप्रणालीवर संशय व्यक्त करण्यात येत आहे. हत्याकांडाची आणखी एक घटना सोमवारी सकाळी उघडकीस आली. दहावीत शिकणाऱ्या मुलाने आईच्या मदतीने वडिलाचा गळा आवळून खून केला. ही घटना हुडकेश्वर पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली. पोलिसांनी हत्याकांडाचा गुन्हा दाखल करुन अल्पवयीन मुलगा व त्याच्या आईला ताब्यात घेतले आहे. मुकेश (५७) असे खून झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. मुकेश हा एका हार्डवेअरच्या दुकानात विक्री प्रतिनिधी म्हणून कामाला होता. त्याला पत्नी निर्मला व दोन मुले आहेत. १९ वर्षाचा मोठा मुलगा हा पुण्यात एका कंपनीत नोकरी करतो. तर लहान मुलगा बंटी (काल्पनिक नाव) हा दहावीत शिकतो. आई निर्मला ही मिळेल ते काम करते. घरीच परिस्थिती बेताची असल्यामुळे मोठ्या मुलाला शिक्षण सोडून पुण्यात नोकरीसाठी जावे लागले, तर अभ्यासात हुशार असलेला लहान मुलगा बंटीसुद्धा सुटीच्या दिवशी कामाला जातो. मुकेशला दारुचे व्यसन होते. गेल्या काही महिन्यांपासून त्याचे दारुचे व्यसन खूप वाढले. घरातील वस्तू-सामान विकून तो दारु पीत होता. तसेच दारुच्या नशेत मायलेकाला शिवीगाळ व मारहाण करीत होता. त्यामुळे पत्नी व मुलगा मुकेशच्या त्रासाला कंटाळले होते. दारु पिऊन आल्यानंतर घरात वाद करणे आणि मारहाण करणे हे नित्याचेच झाले होते. रविवारी रात्री ११ वाजता मुकेश दारु पिऊन घरी आला. त्याने पत्नी निर्मलाला शिवीगाळ आणि मारहाण केली. मुलगा बंटी दोघांचा वाद सोडविण्यासाठी गेला. त्यालाही वडिलांनी मारहाण केली. मुकेशने पोटात लाथ मारल्यामुळे आई तडफडत होती. त्यामुळे बंटीचा राग अनावर झाला. त्याने घरातील टॉवेलने त्याच्या वडिलांचा गळा आवळला. काही मिनिटातच मुकेशचा जीव गेला. मुलाने वडिलाचा खून केल्याचे आईच्या लक्षात येताच तिने डोक्यावर हात मारला. परंतु, रागाच्या भरात हे कृत्य घडल्यामुळे आईने मृतदेहाची विल्हेवाट लावण्याचा निर्णय घेतला. मृतदेह नदीत फेकण्याचे नियोजन केले. त्यासाठी बंटीने आपल्या एका मित्राला फोन केला आणि घडलेली घटना सांगितली. मृतदेहाची विल्हेवाट लावण्यासाठी मदत मागितली. मात्र, मित्राने त्याची भेट घेतली आणि समजूत घातली. पोलिसांत जाऊन सर्व घटना सांगण्यास सांगितले. दोघेही हुडकेश्वर पोलीस ठाण्यात गेले. त्यांनी ठाणेदार ज्ञानेश्वर भेदोडकर यांची भेट घेऊन घटना सांगितली. त्यांनी घटनास्थळावर जाऊन पाहणी केली. या प्रकरणी हत्याकांडाचा गुन्हा नोंदविला आणि मायलेकांना ताब्यात घेतले.

## प्रेमाच्या शत्रूंपासून कोण करील रक्षा प्रेमविवाह करणाऱ्याला मृत्यूदंडाची शिक्षा



मयत मुकेश

जळगाव/क्राईम रिपोर्टर

**सगळेच प्रेमविवाह यशस्वी होतात असे नाही. कारण प्रेमविवाहास मुलाच्या किंवा मुलीच्या घरच्यांचा विरोध असतो आणि हा विरोध डावलून त्या दोघांनी लग्न केले, तर मग घरचे लोक भावकीतले लोक त्यांच्या जीवावर उठतात. त्यातून सैराट सारख्या घटना घडतात. जळगावमध्ये प्रेमविवाह केलेल्या एक तरुणाला त्याच्या पत्नीच्या माहेरच्या लोकांनी अत्यंत क्रूरपणे ठार मारून प्रेमविवाहाला शिक्षा दिली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपींना अटक केली आहे.**







चार वर्ष झाले टॉर्चर करत होते माह्या लेकराले, त्याले मारी टाकू मारी टाकू... शेवटी मारी टाकल. जळगाव शहराच्या पिंप्राळा - हुडको परिसरातील मुकेश शिरसाठ या खून झालेल्या तरुणाच्या आईचे हे शब्द... माझी एवढीशी मुलगी कुणाच्या भरवशावर सोडू? मृत मुकेश शिरसाठच्या बायकोचे हे शब्द... जळगावच्या पिंप्राळा हुडको भागात राहणाऱ्या मुकेश शिरसाठ या तरुणाची रविवारी १९ जानेवारी २०२५ रोजी त्याच्या सासरच्या मंडळींनी चॉपर आणी कोयत्याने हत्या केली. त्याच्यावर कोयत्याने, चॉपरने निघृणपणे वार करण्यात आले. वार करणा-यांमधे त्याचे सासरे होते, मेहुणे होते. अशी माणसे ज्यांच्या डोक्यात मुकेशबद्दल राग होता. ज्यांच्या डोक्यात स्वत:ची इज्जत गेल्याचा राग होता. मुकेशच्या सासरच्या लोकांनी केवळ जावयावरच हल्ला केला असे नाही तर त्यांच्या टार्गेटवर त्याची गर्भवती विवाहीत मुलगी सुद्धा होती. हा हल्ला नेमका कसा झाला? का झाला? मुकेशची गर्भवती पत्नी नेमकी कुणामुळे वाचली? जळगावचे हे संपुर्ण प्रकरण नेमके काय आहे? हृदय पिळवटून टाकणारा हा तपशील जाणून घेऊया... मुकेश शिरसाठ आणि पुजा सोनवणे हे दोघे जळगावच्या पिंप्राळा हुडको परिसरात रहात होते. तारुण्यात पदार्पन केलेले दोघेही ...पान २ वर

## 'लव्ह स्टोरी'मध्ये एक फुल दो माली एकाने दुसऱ्याला चिरडले ट्रॅक्टर खाली



इचलकरंजी/क्राईम रिपोर्टर

**ज्याप्रमाणे एका म्यानात दोन तलवारी जाऊ शकत नाहीत. त्याचप्रमाणे एका मुलीवर दोन तरुण प्रेम करू शकत नाही. कारण तसे जेव्हा होते, तेव्हा त्या दोघांपैकी प्रत्येक जण त्या मुलीवर आपला अधिकार सांगत असतो आणि त्यातूनच दोघांमध्ये वाद निर्माण होतात आणि त्या वादातून एखाद्या वेळी हाणामारी होऊन एखाद्याचा जीवही जातो इचलकरंजीत असेच घडले. एकाच गुढीवर दोघांचे प्रेम होते. त्यातून दोघांमध्ये दुश्मनी झाली आणि एकाने दुसऱ्याला आपल्या साथीदारांच्या मदतीने ट्रॅक्टर खाली ढकलून ठार मारले. या प्रकरणी पोलिसांनी आरोपींना अटक केली आहे.**





विशाल आप्पासो लोकरे हा इचलकरंजी येथील संत मळ्यात आपल्या आई वडिल बहिण भावासह राहयला आहे. त्याच्या घरची परिस्थीती तशी बेताचीच असल्याने तो आपले शिक्षण पुर्ण करून एका ठिकाणी चांगल्या पगारावर कामाला आहे. त्याला जरी चांगली नोकरी असली तरी त्याचे लग्न अजून झालेले नव्हते. तो आपल्या मित्राबरोबर कधी कधी तरी दारूची पार्टी करीत होता. दारूची पार्टी म्हटले की, नशा चढल्यानंतर मित्रा मित्रात सहज कोणत्या ना कोणत्या कारणातून ...पान २ वर

## भुसावळमध्ये गुन्हेगारीतून 'रक्ताचा सडा' पडला जिम ट्रेनरच्या हत्येनंतर हल्लेखोराचा मुडदा पाडला



मयत अफाफ

भुसावळ/क्राईम रिपोर्टर

गुंड म्हटले की ते निर्ढावलेले असतात. त्यांच्या नादाला सहसा कुणी लागत नाही. पण एक जिम ट्रेनरने या गुंडांशी पंगा घेतला, त्यात त्याचा तर खून झालाच पण त्याला मारण्याची सुद्धा हत्या करण्यात आली. या दोन्ही हत्या प्रकरणातील आरोपींना पोलिसांनी अटक केली आहे.





मयत तेहरीम



अफाफ अख्तर पटेल हा तिस वर्ष वयाचा शरीरसौष्ठव पटू भुसावळ शहरातील खडका रोड परिसरात रहात होता. भुसावळ शहरातील एक जीममधे तो जीम ट्रेनर म्हणून काम करत होता. जीममधील तरुणांना त्यांचे शरीर पिळदार करण्यासाठी तो योग्य तीट्रेनिंग देत असे. फेब्रुवारी २०२३ चा तो काळ होता. या कालावधीत तो रहात असलेल्या खडका रोड परिसरातील काही तरुणांसोबत त्याचा व्यावसायिक वाद झाला होता. तेहरीम नासीर शेख, तोहिद नासीर शेख, उबेद शेख, शेख मुजम्मिल शेख फरीद, शेख अक्रम शेख सबदर, उबेद शेख अक्रम शेख आणि नावीद शेख नासीर असे ते तरुण होते. या सर्व तरुणांसोबत अफाफ पटेल या जीम ट्रेनरचा वाद होता. या वादामुळे गुंड प्रवृत्तीचे सर्व तरुण अफाफ पटेल याच्यावर चिडून होते. शेख बिस्मिल्ला शेख रहीम हे अफाफ पटेल याचे नातेवाईक होते. अफाफ पटेल याचे नातेवाईक शेख बिस्मिल्ला यांच्यासह काही नातेवाईकांवर लोखंडी रॉड व तलवारीने हल्ला झाला होता. ...पान ६ वर

## बापाच्या अपमानामुळे मुलगा चिडला आजोबांचा नातवाने मुडदाच पाडला

धुळे/क्राईम रिपोर्टर



**आजची तरुणाई बेछूट आणि बेलगाम आहे. त्यांच्यावर आई-वडिलांचे चांगले संस्कारच झालेले नसल्याने थोरा मोठ्यांशी कसे वागावे, कुटुंबातील वडीलधाऱ्यांचा कसा आदर करावा याचे त्यांना भान नसते. धुळे जिल्ह्याच्या शहादामध्ये आजोबा आपल्या वडिलांचा सतत अपमान करतात या गोष्टीचा नातवाला इतका राग होता की एकेदिवशी त्याने आपल्या साथीदारांच्या मदतीने आजोबांची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपींना अटक केली आहे.**

वडील आणि मुलगा यांच्यात विलक्षण नाते असते. कोणतेही वडील आपल्या मुलाच्या भल्यासाठी कार्यरत असतात. मुलगा चुकला तर त्याला चार गोष्टी सुनावणे हे वडीलांचे कर्तव्यच असते. मुलगाही आपल्या वडीलांचे मन ओळखून असतो. तो त्यांचा मान राखतो. कोणी आपल्या वडीलांना काही बोलले तर मुलाला राग येतो. तो उसळून उठतो हेही खरे आहे, पण जेंव्हा आजोबा, वडील आणि नातू या तीन पिढ्या एकत्र असतात, तेंव्हा काही वेळा तिढा पडू शकतो. वास्तविक आजोबा पोटच्या मुलापेक्षा मुलाच्या मुलाची म्हणजे नातवाची जास्त माया करतात ही वस्तूस्थिती आहे, ...पान ६ वर

## अनैतिक संबंधाच्या अडवल्या वाटा पत्नीने काढला अखेर पतीचा काटा

कर्जत/क्राईम रिपोर्टर

**अनैतिक संबंधात एखादी विवाहित महिला अडकली की आपल्या प्रियकरासाठी ती कोणत्याही थराला जाते. कारण पती पेक्षा तिला प्रियकर महत्वाचा वाटत असतो. खास करून एखादा पती व्यसनी असला तर त्याला मार्गातून हटवण्यासाठी पत्नीच पुढाकार घेते. कर्जत तालुक्यातील मिरजगाव येथे अशाच एका घटनेत एका महिलेने आपला प्रियकर आणि भावाच्या मदतीने पतीची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपींना अटक केली आहे.**



दत्तात्रय राठोड हे आपले पत्नी ललिता मेहुणा प्रविण जाधव याचेसह जमशेदपुर तालुक्यातील डिग्रस येथे गेल्या चार वर्षापूर्वी ऊस तोड मजुरीच्या कामासाठी आले.ते जेथे ऊस तोड म्हणून काम करीत होते. त्या ठिकाणी इंदापुर तालुक्यातील पळसदेवी येथील संतोष काळे हा ही ऊस तोड मजुर म्हणून काम करीत होता. त्यातून त्याची ओळख ही ललिता हिच्याबरोबर झाली.ललिता ही मध्यम बांध्याची आणि शेलक्या अंगाची असल्याने कोणाच्या ही नजरेत भरणारी अशी तिची जवानी होती.घरात कायम अठरा विश्व दारिद्रय असल्याने रोज मोलमजुरीला गेले तरच नवरा बायकोच्या संसाराचा गाडा चालत होता. यातच दत्तात्रय याला दारूचे व्यसन लागले होते. तो सकाळ संध्याकाळ दारू पिऊन दंगा करून ललिता बरोबर भांडण काढत मारहाण करीत होता. त्याच्या सततच्या मारहाणीला ती कंटाळलेली होती. त्यातच तिचा भाऊ ही त्याचेबरोबर राहयला असल्याने तिला नवऱ्याला सोडता येत नव्हते. अशातच ती संतोष काळे याच्या नादाला लागली. ती तिच्या ...पान २ वर

## फुटपाथवरील जागेवरून वाद पेटला साथीदाराने भिकाऱ्याचा जीव घेतला

पुणे/क्राईम रिपोर्टर

**भिक मागून खाणाऱ्यांचा कोण शत्रू असू शकतो असे जरी आपल्याला वाटत असले तरी जे भिकारी रस्त्याच्या कडेला फूटपाथवर झोपतात त्यांच्यात जागेवरून वाद होऊन खून झाल्याच्या घटना घडल्या आहेत. तर काही भिकाऱ्यांना दारूचे व्यसन असते. त्यामुळे एकत्र दारू पिताना नशेत वाद झाला तर ते समोरच्या माणसाचा जीव घ्यायलाही मागे पुढे पाहत नाहीत. पुण्यातील लष्कर परिसरात अशाच एका भिकाऱ्याची हत्या करण्यात आली आहे. हि हत्या झोपण्याच्या जागेवरून करण्यात आली असून पोलीस फरारी आरोपींचा शोध घेत आहेत.**

लष्कर भागात भिक्षेकाऱ्याला मारहाण करुन करुन त्याचा खून करण्यात आल्याची घटना उघडकीस आली. खून झालेल्या भिक्षेकऱ्याची ओळख पटलेली नाही. याप्रकरणी एकाविरुद्ध बंडगार्डन पोलिसांनी गुन्हा दाखल केला. खून झालेल्या भिक्षेकऱ्याचे वय अंदाजे ६० वर्ष आहे. याप्रकरणी एकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत सहायक पोलीस निरीक्षक अर्जुन मोहिते यांनी बंडगार्डन पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. लष्कर भागातील नेहरु मेमोरिअल हॉलसमोरील पदपथावर रात्री भिक्षेकरी झोपतात. खून झालेला ६० वर्षीय भिक्षेकरी तेथे झोपायचा. तेथे आणखी एक भिक्षेकरी झोपायचा. गुरुवारी पहाटे दोघांमध्ये वाद झाले. त्यानंतर ...पान २ वर

27 JANUARY TO 02 FEBRUARY 2025 - Page 2 (CRIME SANDHYA):Layout 1 1/25/2025 8:22 PM Page 1



पान १ वरून...

## मित्राच्या पत्नीवर अतिप्रसंग केला...

नरेशला समजताच त्याने आपल्या या विश्वासघातकी मित्राची हत्या करून त्याला कायमची अद्दल घडवली. हत्या उघड होऊ नये यासाठी एक बनाव रचण्यात आला. बाथरूममध्ये पडून आपल्या मित्राचा मृत्यू झाल्याचं सांगितलं. मात्र पोस्टमॉर्टम रिपोर्टमध्ये या सगळ्याची पोलखोल झाली आणि पोलिसांनी आरोपी पतीला बेड्या ठोकल्या. बदलापूरच्या शिरगाव परिसरात राहणाऱ्या नरेश भगत आणि सुशांत यांची चांगली मैत्री होती. मात्र सुशांत याने नरेशच्या पत्नीवर अतिप्रसंग करत पतीला सांगितल्यास जीवे मारण्याची धमकी तिला दिली. यानंतर आणखी काही वेळा त्याने तिला धमकी देत तिच्यावर अतिप्रसंग केला. मात्र पत्नीने हिंमत करून नरेश याला सुशांतच्या या दुष्कृत्याची माहिती दिली. यानंतर नरेशने आपल्याला याबाबत काहीच माहिती नसल्याचं दाखवत १० जानेवारी रोजी सुशांतला घरी बोलावलं. तिथे दुपारी या दोघांनी मद्यपान केलं. त्या रात्री सुशांत हा नरेशच्याच घरी मुक्कामी राहिला. पहाटेच्या सुमारास नरेश याने सुशांतच्या डोक्यात हातोडी मारून त्याची हत्या केली. तसंच अति दारू प्यायल्याने बाथरूममध्ये पडून सुशांतच्या डोक्याला दुखापत झाली आणि त्याचा मृत्यू झाला, असा बनाव रचत पोलिसांना माहिती दिली. दरम्यान, याप्रकरणी पोलिसांनी सुरुवातीला अकस्मात मृत्यूची नोंद केली. मात्र ज्यावेळेस सुशांत याच्या पोस्टमॉर्टमचे रिपोर्ट आले, त्यावेळेस नरेश याची पोलखोल झाली. कारण सुशांतचा मृत्यू अवजड वस्तूने डोक्यात प्रहार केल्यामुळे झाल्याचं पोस्टमॉर्टम रिपोर्टमध्ये नमूद करण्यात आलं होतं. यानंतर पोलिसांनी नरेश याला ताब्यात घेऊन पोलिसी खाक्या दाखवताच त्याने आपणच सुशांत याची हत्या केल्याची कबुली पोलिसांना दिली.

## प्रेमाच्या शत्रूंपासून कोण करील ...

एकाच समाजाचे होते. दोघांमधे प्रेमाची कळी खुलली. प्रेमाची कळी फुलात रुपांतरीत झाली. बघता बघता दोघांच्या प्रेमाला बहार आला. दोघांनी प्रेमाच्या आणाभाका घेत लग्न करण्याचे ठरवले. मात्र पुजाचे कुटूंबीय या प्रेमाच्या विरोधात होते. आपल्या प्रेमाला आणि लग्नाला पुजाच्या परिवाराकडून कडाडून विरोध होत असल्याचे मुकेशच्या लक्षात आले. अखेर एके दिवशी दोघांनी पळून जावून लग्न केले. त्यामुळे पुजाच्या घरच्यांचा विरोध बदला घेण्यात परिवर्तीत झाला होता. पुजा आणि मुकेशच्या परिवारात कटूता निर्माण होण्यास सुरुवात झाली. या वादातून पुजाच्या घरच्यांनी मुकेशला संपवण्याचे निश्चीत केले. गेल्या पाच वर्षापासून या कटूतेची धग सोनवणे परिवारात कायम होती. गेल्या पाच वर्षापासून पुजाच्या परिवारातील सदस्य त्याला ठार करण्यासाठी टपले होते. मुकेश कधी आपल्या तावडीत सापडतो याच्याच ते मागावर होते. मुकेश आणि पुजाचे प्रेमसंबंध पुजाच्या घरच्यांना समजले तेव्हापासून सोनवणे आणि शिरसाठ परिवारात वादाची ठिणगी पडली होती. त्यातून पुजाच्या कुटूंबातील सदस्यांनी मुकेशला अनेकदा धमकावले सुद्धा. त्यात शनिवार १८ जानेवारी रोजी दोन्ही कुटूंब आमने सामने आले. यावेळी हाणामारी देखील झाली. त्यानंतर रामानंद नगर पोलिस स्टेशनला मुकेशच्या कुटूंबाने तक्रार दाखल केली. पोलिसांनी या तक्रारीची दखल घेत दोघा परिवाराचे समुपदेशन केले. मात्र पोलिसांनी किरकोळ वाद आहे असे म्हणत तक्रारीची दखल घेतली नाही असा आरोप मुकेशच्या परिवाराकडून करण्यात आला. मुकेश हमाली काम करुन घर चालवत होता. त्याला आणि पुजाला एक छोटी मुलगी होती. तर पुजा सात महिन्यांची गर्भवती देखील होती. आई घरकाम करायची आणि मुकेशचे वडील देखील हमालीकाम करायचे. सगळा संसार सुरळीत सुरु होता. मात्र टेंशन होते ते दोन परिवारातील वादाचेच. शनिवारी या वादाने पुन्हा डोके वर काढले आणि त्यानंतर आली रविवारची दुर्दैवी सकाळ. रविवारी सकाळी मुकेश सामान आणण्यासाठी दुकानात गेला त्यावेळी गाढे चौकात त्याला घेरण्यात आले. त्याला घेरणारे पुजाचे नातेवाईक होते. तिचे काका, तिचे भाऊ आणी इतर सगळे नातेवाईक. त्यांनी मुकेशला शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. तुला फार माज आलाय. तु पुजासोबत पळून जावून लग्न केले. तु लग्न केले तेव्हा आम्ही तुला सोडले. आता मात्र सोडणार नाही. तुला आणि तुझ्या घरच्यांना संपवणार असे म्हणत पुजाच्या घरच्यांनी मुकेशवर कोयता आणि चॉपरने वार करण्यास सुरुवात केली. मानेवर घाव बसलेल्या मुकेश जीवाच्या आकांताने ओरडला. त्याचा आवाज ऐकून त्याच्या घरातील सदस्य धावत गाढे चौकात पळत आले. त्याठिकाणी पोहोचल्यावर समोर दिसणारे दृश्य मन हेलावणारे होते. मुकेश रक्ताच्या थारोळ्यात पडलेला होता. मुकेशच्या आईने, भावाने, वडीलांनी मुकेशला वाचवण्याचा प्रयंत्न सुरु केला. मात्र पुढच्याच क्षणी पुजाच्या घरच्या सदस्यांनी त्यांच्यावर देखील चॉपर आणि कोयत्याने हल्ला करण्यास सुरुवात केली. मुकेश रक्ताच्या थारोळ्यात पडल्याचे बघून मुकेशच्या परिवारातील इतर सदस्यांनी पोलिस स्टेशनकडे धाव घेण्याचा प्रयत्न केला. हे बघून पुजाच्या घरची मंडळी बिथरली. त्यांनी या नातेवाईकांना अडवले. त्यांनी मुकेशच्या नातेवाईकांना अडवत शिवीगाळ करत मारहाण सुरु केली. हातावर, डोक्यावर कोयत्याने हल्ला करण्यात आला. त्यांच्याकडून कशीबशी सुटका करुन घेत मुकेशचा भाऊ रामानंद नगर पोलिस स्टेशनला आला. त्याठिकाणी त्याने घटनेची हकीकत कथन केली. त्याच्या तक्रारीनंतर पोलिसांनी पुजाचे काका सतिश केदार, भाऊ प्रकाश सोनवणे, सुरेश बनसोडे, बबलु बनसोडे, राहुल सोनवणे, पंकज सोनवणे, अविनाश सुरवाडे, बबल्या गांगले यांना ताब्यात घेतले. तसेच उर्वरीत दोघांचा शोध सुरु करण्यत आला. मुकेशला शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी मुकेशला मृत घोषित केले. मानेवर खोलवर जखम झाल्याने मुकेशचा जागीच मृत्यु झाला होता. त्याचे सात नातेवाईक जखमी झाले होते. सर्व जखमींवर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात उपचार सुरु करण्यात आले. उपचारा दरम्यान मयत मुकेशचा भाऊ सोनु याने दिलेल्या जवाबानुसार रामानंद नगर पोलिस स्टेशनला पुजाचे काका सतीष जुलाल केदार, पुजाचा भाऊ प्रकाश शंकर सोनवणे, सुरेश भुताजी बनसोडे, बबलु सुरेश बनसोडे, पुजाचा चुलत भाऊ राहुल शांताराम सोनवणे, पंकज शांताराम सोनवणे, आतेभाऊ अश्विन सुरवाडे, विक्की राजु गांगले, बबल्या राजु गांगले अशा नऊ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. गु.र.नं. ३३/२५ भारतीय न्याय संहिता १०३ (१), १०९, ११८ (२), १८९ (२), १९०, १९१ (२), १९१ (३), ३२४ (४) नुसार हा गुन्हा दाखल करण्यात आला. या गुन्ह्याचा पुढील तपास पोलिस निरीक्षक राजेंद्र गुंजाळ यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस निरीक्षक विठ्ठल पाटील यांनी आपल्या सहका-यांच्या मदतीने सुरु केला. मुकेशच्या काकांनी माध्यमांना दिलेल्या माहितीनुसार शनिवारी रात्री झालेल्या वादानंतर पुजाच्या नातेवाईकांनी फिल्डींग लावण्यास सुरुवात केली. तिचे मामा व काका यांनी नातेवाईकांची जमवाजमव करण्यास सुरुवात केली. त्यांना माहिती होते की मुकेश रविवारी घरीच असतो. तो घरातून बाहेर पडण्याची शक्यता आहे. त्यामुळे त्यांनी रविवारीच ट्रॅप लावला. मुकेशने त्यांच्या संमतीशिवाय लग्न केल्याचा राग त्यांच्या डोक्यात होता. गेल्या पाच वर्षापासून त्याला मारण्याचे प्रयत्न सुरु होते. ज्यांनी आमच्या मुलाला मारले त्यांना आम्ही सोडणार नाही. त्यांचेही एक दोन खल्लास करु तरच राहू असेही मुकेशचे काका माध्यमांसमोर म्हणाले. या सर्वात आणखी एक गंभीर घटना म्हणजे मुकेशच्या नातेवाईकांवर वार केल्यानंतर पुजाचे नातेवाईक मुकेशच्या घरात घुसले. त्यांनी गर्भवती पुजाला धमकी दिली की तिकडे डिलीव्हरीला चल नाहीतर दगड घालतो तुला आणि तुझ्या पोटातील बाळाला देखील संपवतो असे म्हणत ते पुजाच्या अंगावर धावले. तोवर आपल्या भावाच्या खूनाची माहिती समजलेली मुकेशची बहिण तिथे आली. ती मधे पडली आणि तिने सगळ्या हल्लेखोरांना मागे ढकलले. अगदी थोडक्यात पुजाचा आणि तिच्या पोटातील बाळाचा जीव वाचला. मुकेशच्या खूनानंतर त्याची पत्नी पुजा हिने माध्यमांना प्रतिक्रिया दिली की आम्ही एकाच जातीचे असून आम्ही प्रेमविवाह केला. लग्न झाल्यापासून मी एकदाही महेरी गेलेली नाही. जेव्हापासून लग्न झाले तेव्हापासून माझ्या माहेरचे माझ्या पतीला टॉर्चर करत होते. माझी मुले कुणाकडे दाद मागणार? तुम्हाला जर तुमची मुलगी लागत होती तर माझा हिरा का हिरावून घेतला? आक्रोश करणाऱ्या पुजाची मागणी एकच आहे ती म्हणजे मला न्याय हवा. मुकेशच्या बहिणीने मात्र पोलिसांवर गंभीर आरोप केले आहेत. माध्यमांशी बोलतांना ती म्हणाली की माझ्या भावावर जमावाने हल्ला केला. मान कापून त्याला ठार केले. त्याला न्याय मिळाला पाहिजे. जेव्हा आम्ही पोलिसांकडे गेलो तेव्हा त्याला मारुन टाकू द्या तेव्हा आम्ही बघू असे पोलिस म्हणाले. पोलिसच असे म्हणत असतील तर आम्ही न्याय कुणाकडे मागायचा? पुजाच्या नातेवाईकांना नातेवाईक असलेल्या पोलिसाचा पाठींबा होता. त्यानेच सांगितले होते, तुम्ही मारुन टाका मी सांभाळून घेतो. पोलिसांनी माझ्या भावाला परत आणावे. न्याय मिळाला नाही तर आम्ही स्वत:ला संपवून घेऊ. असा इशाराही मुकेशच्या बहिणीने दिला आहे. आपल्या प्रतिष्ठेपायी पुजाच्या नातेवाईकांनी मुकेशची हत्या केली. त्याच्या परिवारावर वार केले. आपल्या गर्भवती मुलीच्या पोटावर दगड घालण्याची धमकी दिली. मुकेशच्या कुटूंबाने एका बाजूने न्याय मिळण्याची मागणी केली तर दुसऱ्या बाजूला सुड घेण्याची भाषा देखील केली आहे. जळगाव शहराच्या पिंप्राळा हुडको परिसरातील गाढे चौकात झालेल्या या घटनेप्रकरणी सर्वांच्या मनात एकच प्रश्न आहे. मुकेशच्या लहान बाळाचा आणि अद्याप जगही न पाहिलेल्या पोटातील बाळाचा नेमका दोष काय?

## 'लव्ह स्टोरी'मध्ये एक फुल दो...

वाद विवाद आणि भांडण तंटा होणे हे आलेच. हल्ली मोकळ्या आणि निर्जन जागेत रात्रीच्या अंधारात ओल्या पार्टया या होत असतात. बऱ्याच वेळेला निर्जन ठिकाणी पार्टी होत असताना कोणत्या ना कोणत्या कारणातून अगदी क्षुल्लक कारणातून वाद विवादाच्या घटना घडतात. विशाल लोकरे आणि सागर वाघमारे याच्यात ही मागे एकदा दारू पित असताना वाद विवाद झालेला होता. त्यावेळी त्या वादात दोघांनी ही एकमेकांना शिव्या देत मारामारी केलेली होती. त्या मारामारीला दुसरे तीसरे कोणतेच कारण नव्हते. सागर वाघमारेचे ज्या मुलीवर प्रेम होते त्याच मुलीवर विशालचे ही प्रेम होते.त्यामुळे दारूच्या नशेत ती माझीच आहे या कारणातून दोघांत वाद झालेला होता. त्यावेळी दोघांनी ही एकमेकांना बघून घेण्याची भाषा केलेली होती. गेल्या काही महिन्यापासून दोघांतील हा वाद काही केल्या मिटत नव्हता. दोघे ही समोरासमोर ज्यावेळी भेटतील त्यावेळी ते दोघे ही एकमेकांकडे खुन्नसी नजरेने बघत होते. सागरने ही आपल्या जवळच्या मित्रांना विशाल याला कायमचा धडा शिकवायचा आह असे सांगितले होते. तर इकडे विशालने ही आपल्या मित्रांना सागऱ्याला सोडयाचे नाही त्याला बघून घ्यायचे असे सांगितले होते. दोघांतील हा वाद त्याच्या मित्रांनी ही मिटविण्याचा प्रयत्न केलेला होता. परंतु हा वाद काही मिटला गेला नाही. दोघांची ही समोरा समोर कुठे भेट झाली की, दोघे ही एकमेकाकडे रागाने बघत होते. त्यामुळे खून्नस ही वाढली होती. संत मळा परिसरात मीच मोठा आहे असे आणि तुला बघून घेतो असे त्या दोघांचे म्हणणे होते.दोघे ही दारू पित असल्याने कोण कुठे दारू प्यायला बसतो हे त्यांना माहित होते. आवाडे टॉकीज जवळील समता वाईन शॉपी येथून दारूच्या पार्सल बाटल्या आणण्यास बरेच जण जात असतात. त्या ठिकाणी गर्दी ही असते हे दोघांना ही माहित होते. वाईन शॉपी हे रात्री १०च्या दरम्याने बंद होत असल्याने त्या वेळी प्रत्येक जण पळापळी हा करीत असतो. त्यातच शुक्रवारी विकली मार्केट येथे आटवडा बाजार भरत असल्याने विकली मार्केट ते वाईन शॉपीच्या रस्त्यावर गर्दी ही होती. त्यातच स्नॅकच्या आणि कोल्ड्रिकच्या गाडया असल्याने रस्त्यावर उभे राहयला ही जागा नव्हती. त्यातच जवाहनर कारखान्याकडे जाणाऱ्या ऊसाच्या ट्रॉली ट्रॅक्टर ही त्याच रस्त्याने जात होते. वाईन शॉपी बंद होण्याची वेळ झाली असल्याने विशाल आणि त्याचा मित्र अनिकेत तोडकर हे दोघे घाई गडबडीने वाईनमधून दोन क्वॉटरच्या बाटल्या घेऊन रस्ता पार करून कोल्ड्रिकच्या गाडी कडे येत होते. त्याच वेळी तेथे कोल्ड्रिंकच्या गाडीजवळ सागर वाघमारे हा दारू पित उभा होता. विशाल आणि अनिकेत कोल्डिंकच्या गाडीजवळ येताच सागर याने विशाल याला बघून मुद्दामच दुसऱ्याला बघून त्याला शिवीगाळ केली. त्यावेळी सागर याने दुसऱ्यावरून आपल्यालाच शिवी गाळ केली असल्याचा संशय विशालला आला. तो ही त्याला अर्वाच्च भाषेत शिवी देत काय रे***मस्ती आली का रे म्हणत सागर याला शिव्या देऊ लागला.त्यावेळी रस्त्यावरच दोघात वादा वादी सुरू झाली. दोघे ही एकमेकांना मारहाण करायला एकमेकांच्या अंगावर जात होते. सागरने दारू नुतीच ढोसली होती तर विशालने अगोदरच दारू घशाखाली ढोसली असल्याने त्या दोघांना ही चेव चढला होता. विशाल बरोबर असणाऱ्या अनिकेत आणि सागर बरोबर असणाऱ्या आकाश जगदाळे, अरूण चव्हाण, आणि महेश सुतार यांनी त्या दोघांचे भांडण सोडविण्याचा प्रयत्न केला. परंतु दोघे ही ऐकून घेण्याच्या मनस्थिीतीत नव्हते. रस्त्यावर तरूणांच्यात हाणामारी सुरू झाल्याने आणि त्यातच आठवडी बाजार असल्याने लोकांची पळा पळ होऊ लागली. काही काळ वाहतुक आणि गर्दी वाढल्याने तणावाचे वातावरण झाले.त्यातच तेथे सागरचे आणखीन दोघे मित्र यश चौगुले आणि संतोष मुनोळी हे तेथे आले. त्यांनी ही दारू ढोसली असल्याने ते दोघे ही फुल्ल ताईटच होते. ते सागरची बाजू घेत विशाल याला मारहाण करू लागले. तिघे चौघे विशालच्या अंगावर आल्याने तो ही थोडासा घाबरला. त्याच वेळी गर्दीतून वाट काढत ऊसाने भरलेली ट्रॅक्टर ट्रॉली येत होती. त्याला दोन ट्रॉल्या जोडल्या असल्याने वेडी वाकडे पण हळू हळू मार्ग काढत ड्रायव्हर पुढे चालला होता. त्याच वेळी विशाल याला धक्काबुक्की करणाऱ्या यश चौगुले आणि संतोष मुनोळी यांनी विशाल याला रस्त्यावर ढकलून देत असताना त्याला खाली पाडले. त्याला अशा पध्दतीने खाली पाडले की. त्या ट्रॅक्टरचे मागील ट्रॉलीची दोन्ही चाके विशाल याच्या अंगावरून गेली. त्याच्या डोक्यावरून पाठीवरून दोन्ही चाके गेल्याने तो गंभीर रित्या जखमी झाला. विशालच्या शरीरातून मोठया प्रमाणात रक्तस्राव सुरू झाला. त्याला मारहाण करून सागर वाघमारे,यश चौगुले आणि संतोष मुनोळी हे तिघे ही तेथून पळून गेले. इकडे गंभीर रित्या जखमी झालेल्या विशाल याला त्याच्या मित्रांनी लागलीच इंदिरा गांधी मेमोरियल हॉस्पिटल येथे उपचारासाठी दाखल केले. तेथील डॉक्टरांनी त्याची गंभीर अवस्था बघून त्याला सांगली येथील सिव्हिल हॉस्पिटल येथे नेण्यास त्याच्या नातेवाईकांना सांगितले. त्याचेवर सांगली येथील सिव्हिल हॉस्पिटल येथे उपचार सुरू असताना मध्यरात्रीच्या सुमारास त्याचा मृत्यु झाला. इकडे विशाल याचा मारहाणीत मृत्यु झाल्याने संत मळा परिसरात तणावाचे वातावण बनले. या घटनेची माहिती कुणी तरी गाव भाग पोलीसांना दिल्यावर गाव भाग पोलीसांनी घटनास्थळ गाठून घटनेची पाहणी केली.घटनेचा पंचनामा करून या घटनेची माहिती मयत विशाल याचा भाऊ निलेश आप्पासो लोकरे याच्याकडून घेतली. त्याने पोलीसांना ही घटना कोणत्या कारणातून घडली आहे आणि त्यातील संशयीत आरोपी कोण कोण आहेत याची नावे सांगितली. मयत विशाल याचा खून कुणी आणि कोणत्या कारणासाठी केला आहे याची माहिती पोलीसांना मिळाल्यावर पोलीसांनी संशयीत आरोपीची शोध मोहिम सुरू केली. या घटनेचा तपास गाव भाग पोलीसाबरोबरच कोल्हापुर स्थानिक गुन्हे अन्वेषनचे पोलीस ही करीत होते. स्थानिक गुन्हे अन्वेषनच्या पथकाला यातील तिन्ही गुन्हेगार हे परराज्यात पळून जाण्याच्या तयारीत असल्याची माहिती मिळाली. शनिवारी दुपारपर्यंत पोलीस त्याचा शोध घेत होते. यातील यश चौगुले हा पंचगंगा कारखाना ते शहापुर रोड परिसरात लपला असल्याची माहिती मिळाल्यावर स्थानिक गुन्हे अन्वेषनाच्या पथकाने त्याच्या मुसक्या आवळ्या. तसेच या घटनेतील मुख्य संशयीत आरोपी सागर वाघमारे आणि संतोष मुनोळी हे दोघे सावंतवाडी रेल्वेस्टेशनवर असल्याचे आणि तेथून ते दोघे गोव्याला जाणार असल्याची माहिती पोलीसांना मिळाल्यावर त्यांना ही सावंतवाडी रेल्वेस्टेशनवरून ताब्यात घेण्यात आले.या तिघांना ही स्थानिक गुन्हे अन्वेषनच्या पोलीसांनी ताब्यात घेऊन गाव भाग पोलीसांच्या ताब्यात दिले. गाव भाग पोलीसांनी त्याच्याकडे या घटनेची चौकशी केली असता त्यांनी मयत विशाल लोकरे आणि सागर वाघमारे यांच्यात पुर्ववैमन्यस असल्याने दोघे ही एकमेकाकडे रागाने बघत होते. त्यातूनच घटनेच्या रात्री रस्त्यात बचाबाची झाल्याने मयत विशाल याला ट्रॉली खाली ढकलून देण्यात आल्याचे त्यांनी पोलीसांना सांगितले. इकडे शवविच्छेदनानंतर विशाल लोकरे याचा मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला. त्याचा मृतदेह अंत्यसंस्कारा साठी शववाहिकेतून पंचगंगा नदी घाट येथे नेत असताना गाव भाग पोलीसांनी मयत विशाल याच्या रक्ताचे नमुने घेण्यासाठी म्हणून शववाहिका आडवली. त्याचा मृतदेह शववाहिकेतून इंदिरा गांधी रुग्णालयात आणला. परंतु तेथील डॉक्टरांनी मयताचे शवविच्छेदन सांगली सिव्हिल येथे झाले असल्याने पोलीसांना तिकडे मृतदेह नेण्यास भाग पाडले. यावरून इंदिरा गांधी रुग्णालयात सर्वसामान्य रुग्णाची कशी ससे होलपाट होते हे परत एकदा दिसून आले. त्या रुग्णालयाच्या अनागोदी कारभाराची चर्चा ही होताना दिसत होती. अत्यवस्त पेशंटना या हॉस्पिटलमधील डॉक्टर आणि अधिकारी दाखल करून घेत नाहीत त्यांना सांगली कोल्हापुरला नेण्यास भाग पाडले जाते म्हणजे हे हॉस्पिटल इचलकरंजी आणि परिसरातील लोकांना असून फायदयाचे आणि नसून घोटळ्याचे ठरत आहे एवढेच लोकांचे आणि अत्यवस्त रुग्णांचे म्हणणे आहे. या घटनेची फिर्याद गावभाग पोलीसात निलेश लोकरे याने दिली असल्याने त्याच्या फिर्यादीवरून गावभाग पोलीसांनी विशाल आप्पासो लोकरे (वय २९) रा.संतमळा इचलकरंजी याच्या खून प्रकरणी सागर मोहन वाघमारे (वय २९) यश अरूण चौगुले (वय २६) आणि संतोष मुनोळी (वय २६) रा.तिघे ही संत मळा इचलकरंजी याच्या विरोधात भा.दं.वी. कलम १०३(१) प्रमाणे गुन्हा दाखल करून त्या तिघांना ही इचलकरंजी येथील प्रथमवर्ग न्यायालयासमोर पोलीसांनी हजर केले असता मा.न्यायालयाने या तिघांना ही तीन दिवसाची पोलीस कोठडी सुनावली.या घटनेचा पुढील तपास गाव पोलीस करीत आहेत. किरकोळ वाद विकोपाल गेला की,त्यातून अघटित अशी खूनाची घटना घडते हेच या घटनेवरून दिसून येते.

## अनैतिक संबंधाच्या अडवल्या वाटा...

सगळ्या गरजा पुर्ण करीत होता. ते दोघे ही बाहेर भेटून मजा मारत होते. त्या दोघांच्या त्या संबंधाची चर्चा ही डिग्रस गावात आणि ऊस तोड कामगारांच्यात होत होती. तिचा नवरा दत्तात्रय हा कायम दारू पिऊन काम न करताच पडून राहत होता. त्यामुळे संतोषच एक प्रकारे तिचे घर चालवित होता. त्या दोघांच्या त्या संबंधाची माहिती ही ललिता हिचा भाऊ प्रविण जाधव याला होती. तो सगळे आपल्या उगडया डोळ्यांनी पाहत होता. परंतु आपला दाजीच बेवडा असल्याने आणि तो कोणताही कामधंदा करीत नसल्याने त्याने ही या दोघांच्या त्या संबंधाला मुक संमती दिलेली होती. त्यामुळे ललिता ही संतोष काळे बरोबर बाहेर कुठे ही जाताना घाबरत नव्हती. नवरा काही करू शकत नाही हे तिला माहिती होते. त्यामुळे ती संतोषबरोबर गुलछर्रे उडवीत होती. संतोषच्या नादाला आपली बायको लागली आहे. ती त्याची रखेलच बनली आहे हे ज्यावेळी दत्तात्रयच्या लक्षात आले त्याला ज्यावेळी ही गोष्ट समजली त्यावेळी त्याने याचा जाब बायकोला विचारीत तिच्याबरोबर भांडण काढत तिला जबर मारहाण केली. परंतु त्याचा मार खाऊन ही ललिता ही त्याला उलट उत्तर देत मी त्याच्याबरोबरच राहणार आहे. तु मला सोडून दे.तुझ्या हातून कुठेलच काम होत नाही असे म्हणत ती त्याच्या मर्दानगीवर बोट ठेवीत होती. त्यामुळे दत्तात्रय हा आपली इज्जत अब्रु जाईल म्हणून गप्प रहात होता. मनातून तसा तो घाबरलेलाच होता. तरी ही तो त्या दोघांच्या संबंधाला विरोध करीत होता. भांडणात तो ललिताला त्याचा नाद सोड त्यामुळे काही फायदा होणार नाही असे सांगत होता. परंतु तिला संतोषची चटकच लागली असल्याने ती त्याला सोडायला तयार नव्हती. संतोषला ही ती त्या कामासाठी पाहिजे असल्याने तो ही तिला सोडायला तयार नव्हता. गेल्या दोन वर्षापासून त्या दोघांचे ते संबंध होते.हल्ली तर तो दत्तात्रय घरी नसताना तिच्या घराकडे येत होता. तिची मदमस्त जवानी लुटून तो मजा मारत तिला ही ते स्वर्ग सुख देत होता.तो तिला भेटण्यासाठी कधी कधी इंदापुर तालुक्यातून पळसदेवी येथून येत होता. तिच्या नवऱ्यासमोर आणि भावासमोर तो तिच्या घरात तीन चार दिवस मुक्काम करीत होता. ते दोघे ज्यावेळी बाहेर भेटत होते त्यावेळी ती गोष्ट त्याच्या नजरेआड होत होती परंतु हल्ली तर तो त्याच्यासमोरच त्याच्या बायकोबरोबर झोपत असल्याने त्याच्या तळपायाची आग मस्तकात जात होती. त्याला काय करावे काय नको असे झाले होते. तो रोज दारू पिऊन येऊन ललिताला मारहाण करीत होता. त्याचा नाद सोडून दे म्हणून तिला सांगत होता. परंतु ते दोघे ही त्याचे काही ऐकत नव्हते. एकदा दोनदा त्याने दारूच्या नशेत संतोष काळे याला ही मारण्याची धमकी दिली होती. परंतु त्यानेच त्याला तु तुझ्या बायकोला सोडून दे नाही तर मीच तुला मारून टाकतो अशी धमकी दिली. बायकोच्या बाहेरख्यालीपणा मुळे त्याला कुठे बाहेर तोंड दाखवायला जागा उरली नाही. बायको ऊस तोडी साठी गेली तर तेथे ही संतोष तिच्याबरोबर असायचा.त्यामुळे नवरा म्हणून त्याला काही किमंत राहिलेली नव्हती. या कारणातून तो जास्तच दारू पित होता. याचा सगळा राग तो बायकोवर काढत होता.तिला मारहाण करीत तिच्या झिंज्या उपटत तिच्या गळयाला कोयता लावत होता. दारूच्या नशेत तो आपल्याला मारून टाकेल याची भिती तिला वाटत होती. तिने ही गोष्ट प्रियकर संतोष काळे याला सांगून तु माझ्या नवऱ्याचा बंदोबस्त कर मी तुझ्याबरोबर राहते असे सांगितले. तिच्यासाठी त्याची काय पण करायची तयारी असल्याने तो ही दत्तात्रयचा कायमचा काटा काढायला तयार झाला. याकामी त्याने ललिताचा भाऊ प्रविण याची मदत घेण्याचे ठरविले. प्रविण ही दाजी आपल्या बहिणीला त्रास देतो आहे म्हणून संतोष याला साथ दयायला तयार झाला. त्या तिघांनी मिळून दत्तात्रय राठोड याला मारण्याचा पुर्ण प्लॅन केला. त्याच्या प्लॅनप्रमाणे संतोष हा इंदापुरहून जमशेदपुर येथील डिग्रस येथे ललिताला भेटण्यासाठी आला. रात्री १०च्या सुमारास संतोष याने दारू पिऊन दत्तात्रय याच्याबरोबर भांडण काढले. त्या भांडणात संतोष याने त्याला तुझ्या बायकोला सोड आणि येथून तु तुझ्या गावाला निघून जा असे सांगितले.यावर दत्तात्रय याने ती माझी बायको आहे. तुच तिचा नाद सोड असे सांगितले. त्यावर संतोष याने ती माझी रखेल आहे ती माझ्याबरोबर राहणार आहे असे म्हणताच दोघात हाणामारी सुरू झाली. त्यावेळी प्रविण आणि ललिता यांनी ही दत्तात्रयला हातात सापडेल त्या वस्तुने मारहाण केली. तिघांनी मिळून त्याला खाली पाडले. लाथा बुक्क्यांनी तुडविले. त्यातच संतोष याने दत्तात्रय याच्या गळ्यात दोरी घातली आणि ती जोरात आवळून धरली. त्यावेळी ललिता आणि प्रविण या दोघांनी दत्तात्रयचे हातपाय दाबुन धरले. काही वेळातच त्याचा मृत्यु झाला. त्याचा आपल्या हातून खुन झाल्याचे त्या तिघांच्या लक्षात आल्यावर त्यांनी त्याचा मृतदेह पहाटेपर्यत तसाच खोपीमध्ये लपवून ठेवला. त्यानंतर पहाटे पहाटे संतोष आणि प्रविण यांनी संतोष याच्या चार चाकी वाहनात दत्तात्रय याचा मृतदेह घातला. संतोष याने रवाळगाव शिवाराकडे चार चाकी गाडी नेली. तेथील निर्जन ठिकाणी गाडी थांबून प्रविण आणि संतोष यांनी एक खड्डा खोदला. त्या खड्डयात दत्तात्रय राठोड याचा मृतदेह त्या खड्डयात अर्धवट पुरला. मयत दत्तात्रय याचे डोके त्या खड्डयाच्या थोड वर आले होते. ते डोके त्या दोघांनी दगडाने ठेचले. तरी ही थोडे फार दिसत होते. त्याचा मृतदेह त्या दोघांनी पुरून तेथून पळ काढला. दुसऱ्या दिवशी सकाळी त्या शिवारातून जाणाऱ्या येणाऱ्या लोकांना खड्डयातून एक डोके वर आल्याचे दिसत होते. त्यांनी या घटनेची माहिती मिरजगाव पोलीसांना दिली. या घटनेची माहिती मिळताच पोलीस ही तातडीने घटनास्थळी दाखल झाले. पोलीसांनी तो मृतदेह ग्रामस्थाच्या मदतीने बाहेर काढला. त्या मतदेहाची ओळख पटवून तपासाला सुरूवात केली. मयत इसम हा दत्तात्रय वामन राठोड रा.डिग्रस हा असल्याची माहिती मिळाल्यावर पोलीसांनी घटनास्थळी मयत दत्तात्रय याची बायको ललिता राठोड आणि त्याच्या नातेवाईकांना बोलावून घेतले. मयत दत्तात्रय याचा गळा आवळल्याचा खुणा दिसत होत्या. तसेच त्याला मारहाण केल्याच्या ही खुणा ही त्याच्या शरीरावर दिसत होत्या. पोलीसांनी घटनेचा पंचनामा करून मृतदेह जवळच्या सरकारी रुग्णालयात पाठवून दिला. पोलीस या घटनेचा तपास करीत असताना मयत दत्तात्रय याची बायको ललिता हिचे विवाह बाहय संबंध हे इंदापुर तालुक्यातील पळसदेवी येथील संतोष काळे याच्याबरोबर असल्याचे आणि त्या संबंधाला दत्तात्रय राठोड याचा विरोध असल्याची माहिती पोलीसांना मिळाली. त्यांनी संशयावरून ललिता हिला ताब्यात घेतले. तिच्याकडे या घटनेची पोलीस चौकशी करीत असताना ती पोलीसांना उडवा उडवीचे उत्तरे देत होती. घटनेच्या दिवशी आपल्या नवऱ्याने फुल्ल दारू सकाळ पासून रात्री पर्यत पिली होती. त्याने जास्त दारू पिल्याने त्यात त्याचा मृत्यु झाल्याचे तिने पोलीसांना सांगितले. मग मृतदेह खड्डयात कुणी पुरला आणि तो नेला कसा असा प्रश्न पोलीसांनी तिला विचारल्यावर ती बावचळली. ती काही तरी लपवत असल्याचे पोलीसांच्या लक्षात येताच त्यांनी तिला महिला पोलीसाकरवी पोलीसी खाक्या दाखविला असता आपले संतोष काळे याच्याबरोबर विवाहबाहय संबंध असून मी माझ्या प्रियकराने आणि भावाने मिळून नवऱ्याची हत्या केली असून त्याच्या मृतदेहाची विल्हेवाट माझ्या भावाने आणि प्रियकराने लावल्याचे सांगितले. तिने आपला कबुली जबाब दिल्यावर पोलीसांनी या घटनेतील मुख्य संशयीत आरोपी संतोष काळे आणि प्रविण जाधव या दोघांना ही ताब्यात घेतले. त्यांनी ही आपला गुन्हा कबुल करीत तो का? आणि कशासाठी केला याची माहिती पोलीसांना दिली. तिघांनी ही आपला गुन्हा कबुल केल्यावर पोलीसांनी या घटनेची फिर्याद मयत दत्तात्रय राठोड याच्या जवळच्या नातेवाईकाकडून घेतली. त्यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पोलीसांनी दत्तात्रय राठोड (वय ४०) रा.डिग्रस याचा खून करून पुरावा नष्ट केल्याप्रकरणी त्याची बायको ललिता (वय ३५) तिचा भाऊ प्रविण जाधव (वय २८) प्रियकर संतोष काळे (वय ३५) याच्या विरोधात भा.दं.वी. कलमाप्रमाणे गुन्हा दाखल केला.मिरजगाव पोलीसांनी या तिघांना कर्जत येथील कोर्टात उभे केले.मा.कोर्टाने या तिघांना ही पाच दिवसाची पोलीस कोठडी सुनावली.पोलीस कोठडी दरम्यान पोलीसांनी संशयीत आरोपीच्या कडून गुन्हयात वापरलेली दोरी आणि चार चाकी कार गाडी ताब्यात घेतली.या घटनेचा पुणे स्थानिक गुन्हे अन्वेषणच्या पथकाने करून संशयीतांना ताब्यात घेतले. त्यांना मिरजगाव पोलीसांच्या ताब्यात दिले.या घटनेचा पुढील तपास मिरजगाव पोलीस करीत आहेत.

## फुटपाथवरील जागेवरून वाद पेटला...

भिक्षेकऱ्याला लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण करण्यात आली. मारहाणीत भिक्षेकरी गंभीर जखमी झाला. सकाळी पदपथावर भिक्षेकरी मृतावस्थेत सापडला. या घटनेची माहिती पोलिसांना कळविण्यात आली. वरिष्ठ पोलीस निरीक्षक रवींद्र गायकवाड यांनी घटनास्थळी भेट दिली. भिक्षेकऱ्याचा खून करुन पसार झालेल्या आरोपीचा शोध घेण्यात येत असून पोलीस उपनिरीक्षक धीरज गुप्ता तपास करत आहेत.

27 JANUARY TO 02 FEBRUARY 2025 - Page 3 (CRIME SANDHYA):Layout 1 1/25/2025 8:24 PM Page 1



# २० वर्षीय तरुणीसोबत रिक्षाचालकाचा वसई जवळील सागरी बीचवर अत्याचार

## • गुप्तांगात दगड आणि सीजेरियन ब्लेडणे हल्ला • वालीव खैरपाड्यातून रिक्षाचालकाला घेतले ताब्यात

**वसई/प्रतिनिधी**

मुंबईतील एक भयावह घटना समोर आली आहे. रिक्षाचालकाने २१ जानेवारी २०२५ रोजी २० वर्षीय तरुणीवर अत्याचार केल्याची घटना राम मंदीर परिसरात घडली. याप्रकरणी रिक्षाचालकाला पोलिसांनी ताब्यात घेतलं असून आरोपीने अत्याचार केल्याचं कबूल केलं आहे. सदर घटनेनं मात्र मुंबई हादरली आहे. सदर घटनेतील आरोपी रिक्षाचालकाचं नाव राजरतन सदाशिव वायवळ असून तो ३२ वर्षांचा असून त्याला २ मुली असल्याची माहिती मिळाली आहे. राजरतन सदाशिव वायवळला नालासोपारा वालीव येथील खैरपाड्यातून ताब्यात घेण्यात आले आहे. सदर प्रकरणानंतर अतिरिक्त पोलीस आयुक्त अभिषेक त्रिमूखे वनराई पोलीस ठाण्यात दाखल झाले आहेत.



राम मंदिर स्टेशनजवळ एका २० वर्षीय तरुणीवर २१ जानेवारी २०२५ रोजी बलात्कार करण्यात आला. सिझेरियन ब्लेड आणि दगडांसह हल्ला रिक्षाचालकाने पीडितेवर हल्ला केल्याचं समोर आलं. तसेच मुलीच्या गुप्तांगात काही दगडाचे तुकडेही घालण्यात आले. पीडित मुलगी मुंबईतील राम मंदिर स्टेशनच्या आवारात २२ जानेवारी रोजी बेशुद्ध अवस्थेत आढळली. याप्रकरणी वनराई पोलिसांनी गुन्हा दाखल करत आरोपी रिक्षा चालकाला अटक केली असून पुढील तपास वनराई पोलीस करत आहे. वनराई पोलीस ठाण्यास दिनांक २२/०१/२५ रोजी महिला नामे वय २० वर्षे ही एकटी मुलगी गोरेगाव पूर्व रेल्वे स्थानक परिसरात मिळून आल्यानंतर तिचेवर उपचार करण्यासाठी सरकारी रुग्णालयात दाखल करण्यात आले. सदर महिलेकडे नमूद घटनेच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आली असता, तिने दि. २१/०१/२५ रोजी रात्री वसई स्टेशन परिसरात भेटलेल्या एका अनोळखी रिक्षा चालकाने तिच्यावर वसई जवळील सागरी बीचवर जबरदस्तीने संभोग केल्याचे सांगितल्याने तिचा सविस्तर जबाब नोंद करुन वनराई पोलीस ठाणे गु.र.क्र.२७/२५, कलम ६४ (२) (एम) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला. सदर गुन्हाच्या तपासाकरीता परिमंडळीय पथके तयार करण्यात आली. बळीत मुलीकडून प्राप्त माहितीच्या आधारे विरार ते चर्चगेट रेल्वे परिसर, तांत्रिक माहिती व गुप्त बातमीदार यांच्या आधारे आरोपी नामे राजरतन सदाशिव वायवळ, वय ३२ यास खैरपाडा, वालीव येथील झोपडपट्टीमधुन ताब्यात घेण्यात पोलीस पथकास यश आले.

# कृतिशील प्रयोगशाळा परिचर पुरस्कार जाहीर



**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

माजी आमदार मा. दत्तात्रय सावंत साहेब यांच्या शाळा कृति समितीतर्फे दिला जाणारा आदर्श कृतिशील प्रयोग शाळा परिचर पुरस्कार यावर्षी श्री सोमेश्वर प्रशाला हत्तुर येथील प्रयोग शाळा परिचर बाबूराव अवताडे यांना जाहीर झाला आहे. श्री सोमेश्वर हायस्कूल हत्तुर येथील प्रयोगशाळा परिचर श्री. बाबूराव श्रीमंतराव अवताडे हे हुशार कर्मचारी असून प्रशाला व संस्थेचे अतिशय प्रामाणिक आणि इमानदार कर्मचारी म्हणून त्यांचा नावलौकिक आहे. लवकरच नियोजित कार्यक्रमात समारंभपूर्वक मान्यवरांच्या शुभहस्ते बाबूराव अवताडे यांना मानाचा फेटा, उंची शॉल, पुष्पहार आणि मानचिन्ह देवून गौरविण्यात येणार आहे. त्यांच्या पुरस्कार सन्मानासाठी संस्था ग्रामस्थ मित्रपरिवारात समाधानाचे वातावरण पसरले आहे. त्यांच्या या स्पृहणीय स्तुत्य पुरस्काराबद्दल त्यांचेवर सर्वत्र कौतुकाचा वर्षाव होत आहे.

संस्थेचे चेअरमन आनंदराव तटाळे चिडगुंपी, उपाध्यक्ष नागनाथ गुंडू, सेक्रेटरी शंभूराजे भरले आणि प्रशालेचे मुख्याध्यापक निंगप्पा शिवयोगी यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

# देवणी तालुका केमिस्ट असोसिशनतर्फे रक्तदान शिबिर संपन्न



**देवणी/प्रतिनिधी**

देवणी तालुका केमिस्ट अँड ड्रगीस्ट असोसिएशनचे भारताचे राष्ट्रीय अध्यक्ष जगन्नाथ आप्पाजी शिंदे यांच्या ७५ व्या वाढदिवसाच्या निमित्ताने पूर्ण भारतभर रक्तदान शिबिराचा कार्यक्रम घेण्यात आला त्याचाच एक भाग म्हणून देवणी तालुका केमिस्ट.असो. वतीने रक्तदान शिबिर घेण्यात आले. यावेळी देवणी तालुका केमिस्ट अँड ड्रगीस्ट अध्यक्ष उद्धवजी मल्लेशे, ज्येष्ठ केमिस्ट व्यंकट चिद्रेवार, सहसचिव सचिन मंगनाळे, सुभाष पाटील, बस्वराज ईश्वरशेट्टे, सुनील बावगे, दत्ता हुरचनाळे, धनराज मेहत्रे, नागनाथ गरिबे, बन महाराज, पाटील सुनील, रंजीत कोतवाल, शैलेश बिरादार, योगेश देवशेटवार, मोदी सुधीर, सुमित रोट्टे, मधुकर नाईक, मुर्के शिवप्रसाद आदी केमिस्ट बांधव उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून तहसीलदार सोमनाथ वाडकर हे उपस्थित होते. यावेळी वैद्यकीय अधिकारी डॉ पांडुरंग कलंबरकर, पत्रकार रमेश कोतवाल, रेवन मळभगे, व्यापारी मनोज लांडगे, डॉ.विशाल भंडे, यावेळी राधाई ब्लड बँकेचे योगेश गोडाजी, निकिता एकलिंगे, संध्या नेत्रगावकर, अस्मिता सूर्यवंशी, ऐश्वर्या वाघमारे आदी कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले या वेळी ५५ रक्तदात्यानी रक्तदान केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहसचिव सचिन मंगनाळे यांनी केले.

# वसई पोलिसांच्या भरोसा कक्षाने सावरले एक हजार संसार!

**वसई/प्रतिनिधी**

कौटुंबिक कलह, वाद असणाऱ्या जोडप्यांमध्ये समेट घडवून त्यांच्या विस्कटलेल्या संसाराना जोडण्याचे काम करण्यात पोलिसांच्या भरोसा कक्षाला यश येत आहे. कौटुंबिक कलह, महिलांवरील अत्याचारातून सुटका करून त्यांना न्याय देण्यासाठी हा कक्ष स्थापन करण्यात आला आहे. वसई आणि भाईंदर येथील भरोसा कक्षाने २०२४ या वर्षात सामोपचाराने तोडगा काढून सुमारे १ हजार संसार सावरले आहेत. कौटुंबिक हिंसाचाराच्या प्रकरणे वाढत आहेत. पती पत्नीच्या एकमेकांविरोधात तक्रारी असतात. महिला कौटुंबिक हिंसाचाराला बळी बडत असतात. वाद आणि भांडणे वाढतात परिणामी पती विरोधात पोलिसात तक्रारी देण्यात येतात. यामुळे कायदेशीर कारवाई होऊन गुन्हा दाखल होतो. मूळ प्रश्न सुटत नाही पण संसार विस्कटतो. यावर तोडगा काढण्यासाठी तत्कालीन पोलीस आयुक्त सदानंद दाते यांच्या संकल्पनेतून भरोसा कक्ष



स्थापन करण्यात आला होता. पोलीस आयुक्लायात भाईंदर आणि वसईत प्रत्येकी दोन कक्ष स्थापन करण्यात आले आहे. आलेल्या अर्जावर दोन्ही पक्षामध्ये चर्चा घडवून समेट घडविण्याचे काम कक्षातील महिला अधिकारी करत असतात. गुन्हा दाखल होऊन संसार तुटण्याऐवजी समुपदेशन करून संसार टिकविण्यावर त्यांचा भर असतो. दोन्ही कक्षांनी मिळून २०२४या वर्षात सुमारे १ हजार अर्जदारांमध्ये समेट घडवून आणला आहे. भरोसा कक्षाच्या भाईंदर विभागात २०२४ या वर्षात ७३१ अर्ज आले होते. त्यातील ४४८ प्रकरणात समेट धडवून आणण्यात यश आले आहे. आहे. जी प्रकरणी गंभीर स्वरूपाची होती अशा २५७ प्रकरणाना पुढील कारवाईसाठी संबंधित पोलीस ठाण्यात पाठविण्यात आले आहे, अशी माहिती भरोसा कक्षाच्या प्रमुख सहाय्यक पोलीस निरीक्षक तेजश्री शिंदे यांनी सांगितले. वसई भरोसा कक्षाकडे २०२४ या वर्षात ६३९ अर्ज आले होते. त्यापैकी ४७९ प्रकरणात मसेट घडवूण आणला. १३५ प्रकरणात गुन्हे दाखल करण्यात आले तर २५ प्रकरणं सध्या प्रलंबित आहेत, अशी माहिती कक्षाच्या प्रमुख सहाय्यक पोलीस निरीक्षक अर्चना कोळी यांनी दिली. या व्यतिरिक्त सायबर गुन्हे जनजागृती, लैंगिक धोक्यांपासून सावधगिरी बाळगण्यासाठी जनजागृतीचे काम वसई भरोसा कक्षामार्फत करण्यात येत आहे. त्यासाठी शाळांमध्ये शिबिरे व कार्यशाळा भरविण्यात येत आहे. भाईंदरच्या भरोसा क्षाने मालदीवमध्ये अडककेलाल जिग्नेश पारेख याची भारतीय दूतावासातून सुखरूप सुटका केली. लहान मुलांध्ये लैंगिक अत्याचाराबाबत जागृती निर्माण करण्यासाठी कायद्याचे धडे हा उपक्रम राबवून ४० शाळांध्ये ७५ व्याख्याने घेण्यात आली आणि सुमारे २५ हजार विद्यार्थ्यांचे समुपदेशन करण्यात आले. महाराष्ट्र राज्याच्या महिला व बालिककास, व बाल संरक्षण हक्क आयोग व युनिसेफ यांच्यातर्फे देण्यात येणारा पहिला बालस्नेही पुरस्कार भाईंदर कक्षाच्या प्रमुख सहा. पोलीस निरीक्षक तेजश्री शिंदे यांना देण्यात आला.

# अण्णासाहेब वर्तक महाविद्यालयात कौशल्यसंवर्धन कार्यशाळे अंतर्गत मासे मूल्यवर्धित उत्पादन प्रशिक्षण उपक्रम संपन्न

**वसई/प्रतिनिधी**

विद्यावर्धिनी शिक्षणसंस्थेच्या अण्णासाहेब वर्तक महाविद्यालयाचा प्राणीशास्त्र विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने दोन दिवसांच्या कौशल्यसंवर्धन कार्यशाळे अंतर्गत 'मासे मूल्यवर्धित उत्पादन' या विषयावरील अभ्यासक्रमाची कार्यशाळा शुक्रवार दिनांक २४ जानेवारी २०२५ रोजी व्याख्याने, प्रात्यक्षिके व प्रदर्शन यांसह यशस्वीरित्या संपन्न झाली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अरविंद उबाळे यांच्या उपस्थितीत हा समारोपाचा कार्यक्रम पार पडला. दोन दिवसाच्या कौशल्य संवर्धन कार्यशाळे अंतर्गत मासे मूल्यवर्धित उत्पादन या प्रशिक्षण कार्यक्रमासाठी कोकण कृषी विद्यापीठ, दापोली येथील प्राध्यापक व संशोधक डॉ. विवेक वर्तक हे विषयतज्ञ म्हणून लाभले होते. त्यांनी या कार्यशाळेमधून प्रामुख्याने उद्योजकता या संकल्पनेवर भर देऊन विद्यार्थ्यांना मासे मूल्यवर्धित पदार्थ बनवण्याची कौशल्य संपादन करून कमी खर्चात व्हर्च्युअल ब्रँड देऊन स्वतःचा व्यवसाय कसा सुरू करावा याचे मार्गदर्शन केले. तसेच काही पदार्थसुद्धा स्वतः बनवून दाखवले. या



कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी प्राणिशास्त्र विभागातील डॉ.सुनील आव्हाड, डॉ. अनुजा देसले, प्रा. जागृती चौगुले, डॉ. प्रवीण भिसे व प्रा. साक्षी सांगले यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमाचे समन्वयक आणि प्राणीशास्त्र विभागाचे प्रमुख उपप्राचार्य प्रा.पी.एम पगारे यांनी मत्स्यवडा, मत्स्य पॅटीस आणि मत्स्य कटलेट्स मध्ये प्रोटीनबरोबर शरीराला आवश्यक खनिजे विपुल प्रमाणात असतात असे प्रतिपादन प्रास्ताविक करताना केले व असेच कौशल्याधारित आणि व्यवसायाभमुख उपक्रम आयोजित करू असे सांगितले. अण्णासाहेब वर्तक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर अरविंद उबाळे यांनी क्लाऊड किचनची संकल्पना मांडली ज्यामधून विद्यार्थ्यांना स्वतःचा व्यवसाय सुरू करण्यासाठी लागणारी कौशल्ये आत्मसात करता येतील असे सांगून विद्यार्थ्यांनी व्यवसायाभिमुख बनावे असे आवाहन केले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. प्रवीण भिसे यांनी केले. पाहुण्यांचा परिचय प्रा.साक्षी सांगले यांनी करून दिला व प्रा.जागृती चौगुले यांनी मान्यवरांचे आभार मानले. महाविद्यालयातील वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख प्रा. वैशाली वानखेडे, डॉ.अरुणा नांगरे आणि कनिष्ठ महाविद्यालयाच्या जीवशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. विलास खोपकर हेही या कार्यक्रमासाठी आवर्जून उपस्थित होते.

# शिक्षा पूर्ण करूनही वेळीच सुटका न झालेल्या भारतीय मच्छीमाराचा पाकिस्तानच्या तुरुंगात मृत्यू

**पालघर/प्रतिनिधी**

पाकिस्तानच्या तुरुंगातील शिक्षा पूर्ण करूनही वेळीच सुटका न झालेल्या एका भारतीय मच्छीमाराचा पाकिस्तानी तुरुंगात अखेर मृत्यू झाला आहे. नवीन वर्षाची सुरुवातच अशा वाईट बातमीने झाल्यामुळे पाकिस्तानच्या तुरुंगात असलेल्या भारतीय मच्छीमारांच्या नातेवाईकांमध्ये प्रचंड भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. पालघर जिल्ह्यासह अनेक राज्यातील मासेमारी करणाऱ्या बोटीत जाणाऱ्या खलाशी कामगारांना पाकिस्तानी देशाच्या सीमेलगत असलेल्या समुद्रात आपल्या हद्दीत आल्याचा ठपका ठेवत अटक केली जाते. मृत पावलेल्या कामगाराला २०२२ मध्ये पाकिस्तानच्या मेरीटाईम सेक्युरिटी एजन्सीने धरपकड केली होती आणि त्याच वर्षी त्याची शिक्षा पण पूर्ण झाली असल्याचे जेष्ठ पत्रकार आणि शांततावादी कार्यकर्ते जतिन देसाई ह्यांनी सांगितले. तो भारतीय असल्याचे पण भारताने पाकिस्तानला आधीच कळवलेल होते. २००८ च्या एग्रिमेन्ट ऑन कॉन्सुलर एक्सेसच्या



कलम (५) मध्ये स्पष्ट लिहिले आहे की, शिक्षा पूर्ण झाल्याच्या आणि राष्ट्रीयता ठरल्याच्या एका महिन्यात दुसऱ्या देशाच्या कैद्यांना सोडण्याचं आणि त्याला त्याच्या देशात पाठविण्यास दोन्ही देश सहमत आहेत. या कराराप्रमाणे तो आधीच सुटायला हवा होता. पाकिस्तानातील तुरुंगातील भारतीय कैदी आणि भारतातील त्यांच्या नातेवाईकांमध्ये पत्रव्यवहार नसल्याने ते प्रचंड तणावात जगतात. २१६ भारतीय मच्छीमार पाकिस्तानच्या मलिर जेल, कराची, येथील तुरुंगात आहेत. त्यापैकी जवळपास १७० मच्छीमारांची शिक्षा पूर्ण झाली आहे. आणि त्यांची राष्ट्रीयता पण ठरली आहे. त्या सगळ्यांना पाकिस्तानने तत्काळ सोडावे अशी मागणी जतीन देसाई, पत्रकार आणि शांततावादी कार्यकर्ते ह्यांनी केंद्र सरकार कडे केली आहे.

# परभणी जिल्ह्यास नव्या १०० बसेस देण्याचे आ. राजेश विटेकर यांचे परिवहन मंत्र्यांना साकडे

**परभणी/प्रतिनिधी**

गेल्या काही वर्षापासून शहरासह जिल्ह्यातील सर्वसामान्य प्रवाशी अक्षरशः भंगारात निघालेल्या एसटी बसेसमधून जीव मुठीत घेवून प्रवास करीत असून राज्य परिवहन महामंडळाने या जिल्ह्याकरीता नव्या कोऱ्या किमान १०० बसेस उपलब्ध कराव्यात, अशी मागणी आमदार राजेश विटेकर यांनी राज्याच्या परिवहन मंत्र्यांना सादर केलेल्या निवेदनाद्वारे केली. राज्याचे परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांची आमदार विटेकर यांनी मंगळवारी आवर्जून भेट घेतली. त्यातून परभणी विभागीय कार्यालयांतर्गत विविध आगारातील बसेसच्या अवस्थेबद्दल वस्तुस्थिती निदर्शनास आणून दिली. परभणी विभागांतर्गत सातही आगारातील बसेस पूर्णतः मोडकळीस निघालेल्या आहेत. सर्वसामान्य प्रवाशी या बसेसमधून अक्षरशः जीव मुठीत घेवून प्रवास करीत आहेत. भंगारात निघालेल्या एसटी बसेस रस्त्यावरुन ये-जा करीत असतांना धावत्या बसेसची चाकेच निखळून बाहेर पडणे, चालत्या बसेसला आग लागणे, चालत्या बसेसचे स्टेअरिंग जाम होणे असे प्रकार अक्षरशः नित्याचेच झाले आहेत. चालत्या एसटी बसेस रस्त्यातच बंद होण्याचे प्रकार हे प्रवाशांच्या दृष्टीने अंगवळणी



पडले आहेत. हजारो विद्यार्थी, रुग्ण, महिला, अबालवृध्दांनासुध्दा बंद पडलेल्या एसटी बसेला मागून धक्का मारत चालू करण्यासारखे प्रकार करावे लागत आहेत. या साऱ्या प्रकाराने सर्वसामान्यांमध्ये तीव्र प्रतिक्रिया उमटत असून त्याची राज्य परिवहन महामंडळाने निश्चितच दखल घेतली पाहिजे व या जिल्ह्याकरीता १०० नव्याकोऱ्या बसेस उपलब्ध करुन दिल्या पाहिजेत, अशी अपेक्षा व्यक्त केली. दरम्यान, यावेळी परिवहन मंत्री सरनाईक यांनी आपण व्यवस्थापकीय संचालकांबरोबर चर्चा करुन या संदर्भात निश्चितच सकारात्मक कारवाई करु, असे ठोस आश्वासन दिले.व्यवस्थापकीय संचालकांना या अनुषंगाने सूचनाही केल्या.

# परभणीतील 'खूली मैदाने ठरले ओपन बार'; पोलीस मात्र चिडीचूप

**परभणी/लक्ष्मण उजगरे**

शहरासह जिल्ह्यातील शाळा व महाविद्यालयांसह स्थानिक स्वराज्य संस्थांच्या खेळांच्या मैदानांसह उद्याने तसेच शासकीय निमशासकीय कार्यालयांच्या प्रांगणांसह अन्य सार्वजनिक मोकळ्या ठिकाणांवर तळीरामांचा मोठा हैदोस सुरु आहे. परंतु, राज्य उत्पादन शुल्क विभागासह स्थानिक पोलिस यंत्रणा तसेच स्थानिक स्वराज्य संस्था या तळीरामांविरोधात कारवाई करण्याबाबत चिडीचूप आहेत. गेल्या काही वर्षापासून दारुच्या किमती मोठ्या प्रमाणावर भडकल्या आहेत. विशेषतः अधिकृत बिअरबारमधून अव्वा की सव्वा दराने दारुची विक्री होते आहे. जेवणा खाण्याच्या बिलांमधूनही मोठी वाढ झाली आहे. त्याचा परिणाम ग्राहक अधिकृत बिअरबारकडे फिरकेनासे झाले आहेत.

बारमधून जाण्याऐवजी अनाधिकृत धाबे, हॉटेल्सकडे काही ग्राहक वळाले आहेत. तर बहुतांशी ग्राहक वाईन शॉपवरुन दारु घेवून आडवळणावरील खूल्या जागा, मोकळ्या मैदानांमधून ठाण मांडू लागले आहेत. कहर म्हणजे शाळा व महाविद्यालयांच्या तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या खेळाच्या मैदानांवरसुध्दा सायंकाळी उशीरापासून मध्यरात्रीपर्यत ठिकठिकाणी तळीरामांचे जथ्येच्या जथ्ये दररोजच ठिय्या मांडू लागले आहेत. शासकीय, निमशासकीय कार्यालयांच्या प्रांगणांसह अन्यत्रही मोकळ्या जागा या तळीरामांसाठी भक्कम आधार बनल्या आहेत. जिल्ह्यातील हे चित्र अक्षरशः दिवसेंदिवस भयावह होत आहे. परंतु, कायदा आणि सुव्यवस्थेच्या गप्पा मारणाऱ्या जिल्हा पोलिस अधिक्षकांसह अन्य पोलिस अधिकारी या संवेदनशील विषयात आवाक्षरसुध्दा काढत नाहीत, रात्री बेरात्रीपर्यत रस्त्या रस्त्यावरील अनाधिकृत धाबे आणि बार विरोधात चुकूनही कारवाई करीत नाहीत.

मैदानांवर ठाण मांडणाऱ्या तळीरामांविरोधात कारवाई तर राहिली दूर, असे गंभीर चित्र आहे. परभणी शहरातील विसावा कॉर्नरपासून संपूर्ण जिंतूर रस्ता, जूना पेडगाव रस्ता, दर्गा रस्ता, पारवा रस्ता, रायपूर रस्ता, कृषि विद्यापीठ परिसर, वसमत रस्ता, जूना कारेगाव रस्ता, वांगी रस्ता, धार रस्ता वगैरे चोहोबाजूंच्या रस्त्या रस्त्यांवरील शाळा असो की, महाविद्यालयांची मैदाने, शासकीय खूल्या जागांवर दररोज हजारो तळीराम पार्ट्या झोडू लागले आहेत. तुरतपीरच्या दर्गाह परिसरात उर्सासाठी आरक्षित असलेल्या जागांवर कंदुरीच्या निमित्ताने जमा होवू लागलेल्या तळीरामांनी त्या मैदानाचा अक्षरशः ओपन बार सारखाच वापर सुरु केला आहे.

शहरातील वसमत रस्त्यावरील दोन, स्टेशन रस्त्यावरील एक, बसस्थानक परिसरातील एक व मध्यवस्तीतील जून्या मोंढ्यातील वाईनशॉप परिसरातील कानाकोपऱ्यात दारुड्या तरुणांचे जथ्येच्या जथ्ये दररोज धुमाकूळ घालू लागले आहेत. वसमत रस्त्यावरील विष्णू नगर कॉर्नर, विष्णू जिनिंग मैदान तसेच या रस्त्यावरील वसाहतीतील उद्यानांसाठी किंवा खेळांसाठी आरक्षित मैदानांवर सुध्दा दारुड्यांचा धुमाकूळ आहे.

### नो पेट्रोलिंग नो कारवाई

या तळीरामांच्या विरोधात शैक्षणिक संस्थाचालकांसह मुख्याध्यापक, प्राचार्यानी संबंधित पोलिस ठाण्यांशी संपर्क साधून मैदानांवरील दारुच्या बाटल्यांचे खच निदर्शनास आणून दिले. परंतु, पोलिस अधिकाऱ्यांकडून आश्वासनापलिकडे कारवाई केली जात नाही. कधीही या मैदानांकडे पोलिसांच्या गाड्या फिरकतसुध्दा नाहीत. त्याचा परिणाम तळीरामांना कोणाचाही धाक उरला नाही. कोणी विरोध केल्यास त्यास शिवीगाळ करण्यासह वाद विवाद व मारहाणीचे प्रकारही वाढले आहेत.

### बाटल्या आणि फुटलेल्या काचांचे ढीग

मैदानांवर बाटल्या आणि फुटलेल्या काचांचे ढीग साचू लागले आहेत. साफसफाई करतेवेळी संबंधित संस्था चालकांना नाकी नऊ येवू लागले आहे. मैदानांवर खेळतेवेळी चिमूकल्यांसह विद्यार्थ्यांना काच लागून जखमी होण्याचे प्रकारही मोठ्या प्रमाणावर वाढले आहेत. परंतु, स्थानिक स्वराज्य संस्था असो, पोलिस प्रशासन या संदर्भात चिडीचूप आहे.

27 JANUARY TO 02 FEBRUARY 2025 - Page 4 (CRIME SANDHYA):Layout 1 1/25/2025 8:24 PM Page 1



# ‘गरज सरो वैद्य मरो’

निवडणुकीत मतदार हा जरी प्रमुख घटक असला, तरी त्याची गरज फक्त मतदाना पुरती असते हे गेल्या ७० वर्षाच्या लोकशाहीच्या इतिहासात अनेक वेळा बघायला मिळाले आहे. राजकीय पक्ष आणि त्यांचे नेते निवडणुका आल्या की प्रचारासाठी येतात. आणि मतदारांवर आश्वासनांचा पाऊस पाडतात. मतदार राजा ही बिचारा निवडणुकीत अंधभक्त बनतो. आणि राजकारणांच्या आश्वासनांवर विश्वास ठेवून त्यांना मतदान करतो. पण एकदा का निवडणूक झाली, की गरज सर्व आणि वैद्य मरो! या म्हणीनुसार निवडून गेलेले लोक मतदारांकडे सोयीस्करपणे पाठ फिरवतात आणि मतदाराला जय महाराष्ट्र करून पुढच्या पाच वर्षांनी भेटू असे म्हणत मतदारांचा निरोप घेतात. अशा स्थितीत मतदाराला पुढील ५ वर्ष हतबलपणे गप्प बसण्याशिवाय काहीही करता येत नाही. यंदाची विधानसभा निवडणूक एकतर्फी झाली. कारण या निवडणुकीत सत्ताधारी महायुतीने पाशवी बहुमत मिळवून सरकार बनवले. महायुतीच्या या विजयात लाडक्या बहिणींचा मोठा वाटा होता. सरकारने निवडणुकीच्या तोंडावर लाडकी बहीण योजना सुरू केली. दर महिन्याला महिलांच्या खात्यात फक्त दीड हजार रुपये टाकले. आणि दीड हजार रुपयांमध्ये विधानसभेची निवडणूक जिंकून आपली सत्ता कायम राखली. आता सरकार बनवून जवळपास तीन ते चार महिने झाले, परंतु नेहमीप्रमाणे राजकारण्यांनी आता आपले रंग दाखवायला सुरुवात केली आहे. लाडकी बहीण योजना कोणत्याही दृष्टीने सरकारसाठी आर्थिक दृष्ट्या फायदेशीर नव्हती. हे त्या लोकांना सुद्धा माहिती होतं. परंतु लाडक्या बहिणींची मते मिळवण्यासाठी ही योजना सुरू केली. आणि आता निवडणूक होऊन गेल्यावर या योजनेमधील त्रुटी शोधायला सुरुवात केली आहे. काय तर म्हणे ज्या बहिणी आर्थिक दृष्ट्या सक्षम आहेत, ज्याना चांगली नोकरी धंदा आहे. किंवा उद्योग क्षेत्रात ज्या काम करीत आहेत, ज्यांचं कुटुंब सक्षम आहे, ज्यांना कोणत्याही गोष्टीची चिंता नाही. अशा लाडक्या बहिणीनी स्वतःहून या योजनेतून बाहेर पडावे असे आवाहन केले जात आहे. त्याचबरोबर लाडक्या बहिणींचे अर्ज आता तपासले जाणार आहेत. आणि ज्या लाडक्या बहिणी आर्थिक दृष्ट्या सक्षम आहेत त्यांना या योजनेतून वगळले जाणार आहे. कमाल झाली या लोकांची! ही योजना सुरू करताना कळलं नव्हतं का? की अशा प्रकारची योजना कोणासाठी चालू करायची? कारण अशा योजना सरसकट सुरू केल्या की सर्वच लोक त्याचा लाभ घेण्यासाठी पुढे येतात. मग तो गरीब असो किंवा श्रीमंत असो. प्रत्येकाला सरकारकडून मिळणारा फायदा हवा असतो. लाडकी बहीण योजनेमध्ये सुद्धा असाच प्रकार घडला. योजना सरसकट सगळ्यांसाठी लागू केल्यामुळे, ज्या महिला, ज्या लाडक्या बहिणी आर्थिक दृष्ट्या सक्षम होत्या, ज्यांच्याकडे गाड्या आहेत, फ्लॅट आहेत, चांगली नोकरी आहे, अशा लाडक्या बहिणीने सुद्धा या योजनेचे फॉर्म भरले. आणि सरकारकडून पैसे लाटले. हा सगळा प्रकार होणार होता हे सरकारला ठाऊक नव्हते का? ठाऊक होते, परंतु सरसकट सगळ्या लाडक्या बहिणींची मते मिळवण्यासाठी या योजनेत अनेक त्रुटी दिसत असताना, त्या त्रुटींकडे दुर्लक्ष करून सत्ताधारी पक्षातल्या लोकांनी केवळ आणि केवळ निवडणूक जिंकण्यासाठीच लाडकी बहीण योजना आणली. आणि आता निवडणुका जिंकून झाल्यावर लाडक्या बहिणीला टाटा करीत आहेत. अरे थू तुमच्या जिंदगीवर! आमच्या देशातल्या किंवा आमच्या राज्यातल्या आमच्या माता भगिनींना अशा प्रकारे फसवून तुम्हाला काय मिळाले? मुळात कुठल्याही राज्यकर्त्यांनी एखादी योजना राबवताना, त्या योजनेचा पूर्णपणे विचार करायचा असतो, फायद्या तोट्याची गणित समजून घ्यायची असतात, महाराष्ट्र सरकारवर पाच लाख कोटींचे कर्ज असताना दर महिन्याला ४५ हजार कोटी रुपये वाटण्याची सरकारला दुर्बुद्धी का झाली? बरे झाली ती झाली, पण मग आता या योजनेमधल्या त्रुटी का शोधत आहात? आता लाडक्या बहिणींबद्दल तुम्हाला प्रेम राहिलेले नाही का? की लाडक्या बहिणी बद्दलचे तुमचे प्रेम फक्त निवडणुकीपूर्ती होते. असा सवाल केला जात आहे. आणि याचे उत्तर सत्ताधाऱ्यांना द्यावेच लागणार आहे. सरकार कोणत्याही पक्षाचे असो त्यांनी एक गोष्ट लक्षात ठेवायला हवी ती म्हणजे, लोकांना फुकट द्यायची सवय लावू नये. एकदा का लोकांना फुकट द्यायची सवय लावली की मग सरकारची तिजोरी खाली व्हायला जास्त वेळ लागणार नाही. अशावेळी जे लोक टॅक्स भरतात त्यांची अडचण होते. कारण नागरी सुविधांसाठी पैसा उरत नाही. करदात्यांना नागरी सुविधा मिळायला हव्यात. त्या नागरी सुविधांसाठी जो करांच्या रूपाने पैसा आलेला असतो. तो अशा पद्धतीने जर सरकार कडून उधळला जात असेल, तर हे राज्य चालणार कसे चालणार? केवळ निवडणुका जिंकण्यासाठी जनतेच्या पैशाची अशा पद्धतीने लूट करायची. आणि नंतर लोकांकडे पाठ फिरवायची हा सगळा प्रकार संताप जनक आहे. तेव्हा काहीही झाले तरी आता लाडकी बहीण योजना बंद होता नये आमच्या माता भगिनींना निवडणुकीत जी आश्वासने दिलेली आहेत ती पूर्ण व्हायला हवीत. लाडक्या बहिणीला दरमहा २१०० रुपये देण्यासाठी जे सत्तेत बसलेले आहेत त्यांनी काहीही करावं. आपले कपडे विकावे, आपले घरदार विकावे, पण आमच्या लाडक्या बहिणीना दर महिन्याला २१०० रुपये देण्याचे टाळू नये. लाडकी बहीण योजना कोणत्याही स्थितीत बंद होता नये. तसे पाहता सरकारच्या तिजोरी मध्ये जरी पैसे नसले, तरी सरकारमध्ये जे घोटाळेबाज बसलेले आहेत, त्यांच्याकडे इतका पैसा आहे की, त्यांच्या त्या पैशातून लाडकी बहीण योजनेसारख्या अनेक योजना दोन-चार वर्ष सहज चालवता येतील. पण तेवढी त्यांची दानत नाही. कारण त्यांना लोकांकडून घ्यायचं माहित आहे, पण द्यायचं माहिती नाही. त्यामुळे अशा लोकांवर डोळे झाकून विश्वास ठेवून त्यांना पाशवी बहुमताने निवडून देणे योग्य आहे की अयोग्य आहे याचा विचार आमच्या लाडक्या बहिणीनी करायला हवा. कारण दर महिन्याला तुमच्या खात्यात दीड हजार रुपये जरी येत असले तरी जी महागाई वाढलेली आहे, त्याने तुमच्या किचनचा बजेट बिघडवलेला आहे. थोडक्यात सांगायचे म्हणजे दीड हजार रुपये देऊन तुमच्याकडून दहा हजार रुपये वसूल केले जात आहेत. याचा थोडा तरी विचार करा आणि भविष्यात यातून बोध घ्या.

## महावितरणच्या प्रतीक वाईकरच्या नेतृत्वात भारताला ‘खो-खो’चे विश्वविजेतेपद



मुंबई/प्रतिनिधी

महावितरणच्या पुणे परिमंडलातील पर्वती विभागमध्ये कार्यरत प्रतीक वाईकर यांच्या नेतृत्वात भारतीय खो-खो संघाने पहिल्या विश्वचषकाचे विजेते होण्याचा मान पटकावला आहे. तब्बल २० देशांचा सहभाग असलेल्या या विश्वस्पर्धेत भारतीय संघाचा कर्णधार व उत्कृष्ट खेळाडू म्हणून प्रतीक वाईकर यांनी मोलाची कामगिरी केली. विजेत्या संघासह वाईकर यांच्यावर देशभरातून कौतुकाचा वर्षाव होत आहे. महावितरणचे खेळाडू म्हणून विश्वचषक विजेत्या संघाचे नेतृत्व करणाऱ्या प्रतीक वाईकर यांचे राज्याचे मुख्यमंत्री व ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस, ऊर्जा विभागाच्या अपर मुख्य सचिव सौ. आभा शुक्ला, महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र, संचालक (संचालन / मानव संसाधन) अरविंद भादिकर, पुणे प्रादेशिक संचालक भुजंग खंदारे, पुणे परिमंडलाचे मुख्य अभियंता राजेंद्र पवार यांनी अभिनंदन केले आहे. क्रीडा कोट्यातून १९ जून २०१२ मध्ये प्रतीक वाईकर वयाच्या १९व्या वर्षी महावितरणमध्ये रुजू झाले. दि. २७ मार्च १९९२ रोजी जन्मलेले प्रतीक यांनी सन २००० च्या सुमारास बास्कटेबॉल, लंगडी व गोल खो-खो खेळायला सुरवात केली. प्रामुख्याने खो-खो खेळातील चपळाई व प्रगती पाहून पुण्याच्या नामांकित नवमहाराष्ट्र क्लबमध्ये प्रतीक यांना प्रवेश मिळाला. तेव्हापासून ते उत्कृष्ट खो-खोपटू म्हणून घडत गेले. संगणकशास्त्रात बीएस्सी पदवीधर असलेल्या प्रतीक यांनी फायनान्समध्ये एमबीए केलेले आहे. त्यामुळे खेळ व अभ्यास या दोहोंना कायम महत्व दिल्याने कुटुंबियांचे देखील प्रतीक यांना खो-खो खेळण्यासाठी मोठे पाठबळ मिळाले. महाराष्ट्र शासनाचा श्री शिवछत्रपती क्रीडा पुरस्कारप्राप्त असलेले प्रतीक वाईकर यांनी महाराष्ट्र संघाच्या १४ वर्षाखालील, १६ वर्षाखालील व १८ वर्षाखालील वयोगटाचे व वरिष्ठ गटाचे नेतृत्व केले आहे. अशी कामगिरी करणारे ते एकमेव खो-खोपटू आहे. खो-खोमध्ये मातीकडून मॅटकडे प्रवास सुरु केल्यानंतर दुखापत होण्याचा धोका वाढला तरी कौशल्य, चपळाई व शारीरिक फिटनेसकडे अधिक लक्ष देत प्रतीक यांनी व्यावसायिक खो-खो स्पर्धेत भाग घेणे सुरू केले. यात खो-खो प्रोफेशनल लिगमध्ये तेलगू योद्धांचे नेतृत्व करीत उपविजेतेपद पटकावले. खो-खो खेळात ‘कॅप्टन कूल’ म्हणून ख्याती असलेले प्रतीक हे संघ नेतृत्वामध्ये सांघिक कामगिरीला नेहमीच प्राधान्य देतात, हे विशेष. त्यांच्यासोबत महावितरणच्या पुणे परिमंडलामध्ये खो-खोचे उत्कृष्ट खेळाडू घडत आहेत. प्रतीक यांना खो-खोच्या विविध स्पर्धा व सरावासाठी महावितरणकडून कायमच सहकार्य करण्यात आले आहे. यासाठी प्रतीक यांचे घर, क्रीडांगण व कार्यालय केवळ दोन किलोमीटर परिघात ठेवण्यात आले आहे. राजेंद्र पवार, मुख्य अभियंता, पुणे परिमंडल- ‘प्रतीक वाईकर यांना महावितरणमध्ये एक खेळाडू म्हणूनच पाहिले गेले. खेळाडू म्हणून त्यांना आवश्यक सर्व सोयीसुविधा पुरवण्यात आल्या. कोणत्याही परिस्थितीत नोकरी करताना खेळाडू म्हणून कोणतीही अडचण येणार नाही याची वेळोवेळी काळजी घेण्यात आली. त्याची फलश्रुती म्हणून प्रतीकने महावितरणच नव्हेतर देशासाठी अभिमानास्पद कामगिरी केली आहे.

## अधिकाधिक लोकांनी नेत्रदान करण्याचा संकल्प करावा-राज्यपाल




मुंबई/प्रतिनिधी

आपण स्वतः तसेच आपल्या कुटुंबातील सर्वांनी नेत्रदानाचा संकल्प केला आहे. नेत्रदानातून अनेक दृष्टिहीन व्यक्तींना नवी दृष्टी प्राप्त होऊ शकते. यास्तव अधिकाधिक लोकांनी नेत्रदानाचा संकल्प करावा असे आवाहन राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांनी आज येथे केले. नॅशनल असोसिएशन फॉर द ब्लाइंड (नॅब) या अंध व्यक्तींच्या शिक्षण, पुनर्वसन व रोजगारासाठी कार्य करणाऱ्या संस्थेचा ७४ वा स्थापना दिवस संस्थेच्या वरळी मुंबई येथील सभागृहात सोमवारी (दि. २०) संपन्न झाला, त्यावेळी राज्यपाल बोलत होते. झारखंड येथे आपण राज्यपाल असताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ७३ व्या वाढदिवसाला ७३ लोकांनी नेत्रदानाचा संकल्प केला होता, तर २०२४ साली महाराष्ट्रात आल्यावर पंतप्रधानांच्या वाढदिवसाला आपल्या आवाहनानुसार ७४० व्यक्तींनी नेत्रदानाचा संकल्प केला. यंदा होणाऱ्या पंतप्रधानांच्या ७५व्या वाढदिवसाला ७५०० लोकांकडून नेत्रदानाचा संकल्प करून घेण्याचे लक्ष्य आपण ठेवले असल्याचे राज्यपालांनी सांगितले. नॅब संस्थेच्या स्थापनेत क्रिकेटपटू विजय मर्चंट यांचे योगदान होते हे समजल्यामुळे आपला त्यांच्याप्रती असलेला आदर शतपटींनी वाढला आहे, असे सांगून नॅब ही संस्था अंध तसेच दृष्टिबाधित व्यक्तींकरिता आशा जागवणारी व सक्षमीकरणाची हमी देणारी संस्था ठरली आहे असे राज्यपालांनी सांगितले. आपले पूर्ववर्ती राज्यपाल रमेश बैस यांनी ’नॅब’ला ब्रेल प्रिंटिंग प्रेस खरेदी करण्यास अर्थसहाय्य केले असल्याचे नमूद करून यापुढे देखील राजभवन नॅबच्या पाठीशी खंबीरपणे उभी राहील असे राज्यपालांनी सांगितले. आपल्या ब्रेल प्रिंटिंग प्रेस, टॉकिंग बुक्स, परफ्युमरी प्रशिक्षण आणि शिक्षक प्रशिक्षण यांसारख्या उपक्रमांच्या माध्यमातून नॅब दृष्टीहीन व्यक्तींना सन्मानाने जीवन जगण्यासाठी सक्षम करीत असल्याबद्दल राज्यपालांनी संस्थेचे अभिनंदन केले. कार्यक्रमाला नॅबचे अध्यक्ष हेमंत टकले, मानद महासचिव हरिंदर कुमार मल्लिक, कार्यकारी महासचिव डॉ विमल देंगडा, कार्यकारी संचालक पल्लवी कदम, संस्थेचे आश्रयदाते व विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी राज्यपालांच्या हस्ते विविध पारितोषिके वितरण करण्यात आली.

## येत्या ३१ जानेवारी ते २ फेब्रुवारीपर्यंत डहाणू महोत्सवाचे आयोजन; सर्वांना मोफत प्रवेश!



डहाणू/प्रतिनिधी

३१ जानेवारी ते २ फेब्रुवारी २०२५ या तीन दिवसांच्या कालावधीत डहाणू महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. डहाणू समुद्रकिनाऱ्यावरील सी व्ह्यू पार्क, आगार रोड येथे या महोत्सवाचे आयोजन करण्यात येणार आहे. या महोत्सवाला प्रवेश सर्वांना मोफत असणार आहे. डहाणू शहराला एक उत्कृष्ट, चाकोरीबाह्य तरीही सहज पोहोचण्याजोगे सुट्टी घालवण्याचे ठिकाण म्हणून सर्वांपुढे आणण्याच्या उद्देशाने या महोत्सवाची संकल्पना विकसित करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे स्थानिक कल, संस्कृती आणि उद्योजकतेला प्रोत्साहन देणे हेही या महोत्सवाचे उद्दिष्ट आहे, असे प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे. हा वार्षिक महोत्सव महाराष्ट्र शासन, स्थानिक प्रशासकीय यंत्रणा आणि डहाणू नगरपरिषद यांच्यातर्फे संयुक्तपणे आयोजित करण्यात आला आहे. डहाणू महोत्सवाच्या पहिल्या आणि दुसर्या पर्वाला २.५ लाखांहून अधिक जणांनी भेट दिली होती. तसेच २.५ कोटी रूपयांहून अधिकची आर्थिक उलाढाल देखील झाल्याची माहिती देण्यात आली होती. डहाणूमध्ये किनारपट्टीवरील पर्यटनाची उत्कृष्ट संभाव्यता आहे.पर्यटक येथील स्थानिक संस्कृती, कला आणि हस्तकला यांचा आनंद घेऊ शकतात.त्याचप्रमाणे वॉटर स्पोर्ट्सचा थरारही अनुभवू शकतात. एअरो स्पोर्टस्, वॉटर स्पोर्ट्स, समुद्रकिनार्यावरील विविध स्पर्धा यांचा आनंद साहसी पर्यटक घेऊ शकतात. त्याचप्रमाणे मच्छिमारांच्या खेड्यांमध्ये जाऊन महाराष्ट्रातील किनारपट्टीवरील ग्रामीण जीवनशैलीचा प्रत्यक्ष अनुभव घेऊ शकतात, अशी माहिती डहाणू नगरपरिषदेचे मुख्याधिकारी अक्षय गुडधे यांनी दिली. तर पर्यटकांनी भेट देण्याच्या तसेच भटकंती करण्याच्या दृष्टीने डहाणू हे एक अप्रतिम स्थळ आहे. विकेंडसाठी सुद्धा हे उत्तम स्थळ आहे. या फेस्टीव्हलमध्ये आम्ही सर्व पर्यटकांचे स्वागत करतो, असे डहाणूचे तहसीलदार सुनील कोळी यांनी सांगितले. या महोत्सवात वाळूशिल्पे (सॅण्ड आर्ट) मांडली जाणार आहेत. त्याचप्रमाणे तटरक्षक दलाद्वारे शोध बचाव प्रात्यक्षिक सादर केला जाणार आहे. त्याचा थरार अनुभवता येणार आहे. या महोत्सवात आकाश निरीक्षण, शेतांना भेटी, नाईट कॅम्पिंग आणि मच्छीमारांच्या खेड्यांना भेटी अशा अनेक अनुभवांचा समावेश असणार असल्याचे प्रशासनाच्या वतीने सांगण्यात आले आहे. या महोत्सवाला भेट देणारे रस्ता मार्गाने देखील येऊ शकतात.त्याचप्रमाणे रेल्वेमार्गाने येताना डहाणू स्थानकावरून उतरून पाहुणे महोत्सवाच्या ठिकाणी पोहोचू शकतात. त्याचप्रमाणे स्थानिक रिक्षांद्वारे महोत्सवाच्या ठिकाणी पोहोचता येते.या महोत्सवासाठी फार्म स्टे आणि स्थानिक रेस्टॉरंटमध्ये बुकींग सुरू असून अखेरच्या क्षणी गोंधळ टाळण्यासाठी आधीच ऑनलाईन पद्धतीने बुकींग करण्याचे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

## भारतीय राज्यघटनेमुळेच भारताची जागतिकस्तरावर शक्तिशाली राष्ट्र म्हणून ओळख -सभापती प्रा.राम शिंदे

मुंबई/प्रतिनिधी

जागतिक स्तरावर भारताने एक शक्तिशाली राष्ट्र म्हणून ओळख प्राप्त केली आहे.आपल्या राज्यघटनेने त्यादृष्टीने भक्कम आधारशिला प्राप्त करून दिली असल्यानेच हे शक्य झाले. लोकशाही संस्था बळकट करणे, सकारात्मक सहभाग नोंदवून संसद आणि राज्य विधानमंडळे यांचे वैभव टिकवणे आणि त्यायोगे लोक कल्याणाच्या प्रति प्रतिबद्धता सुनिश्चित करणे, कर्तव्य आपण चोखपणे बजावले पाहिजे, असे प्रतिपादन महाराष्ट्र विधानपरिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे यांनी केले. पाटणा येथे लोकसभा अध्यक्ष श्री. ओम बिर्ला यांच्या अध्यक्षतेखाली येथे आयोजित ८५ व्या अखिल भारतीय पीठासीन अधिकारी परिषदेत ते बोलत होते. भारतीय राज्यघटनेची ७५ वर्षे : घटनात्मक मूल्यांच्या बळकटीकरणासाठी संसद आणि राज्य विधान मंडळे यांचे योगदान या विषयावर या परिषदेमध्ये विचारमंथन होत आहे. विचार व्यक्त करतांना सभापती प्रा. शिंदे म्हणाले, आपली राज्यघटना पुरेशी लवचिक असून ती आणखी सामर्थ्य प्राप्त करीत आहे. आपल्या संसदीय लोकशाहीने राज्यघटनेच्या या शक्तिमुळेच संकटांचा यशस्वी सामना केला. घटना दुरुस्तीच्या संदर्भात काहींनी हेतूता गैरसमज पसरविण्याचे प्रयत्न केले, मात्र अलीकडच्या निवडणुकांमध्ये जनतेने त्यांना नाकारून योग्य जनादेश दिला आहे. लोकशाहीत स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या तीन मूल्यांना अत्यंत महत्त्व आहे. एकाला सोडून दुसऱ्याचा विचार देखील करता येणार नाही. तसे झाल्यास लोकशाही संदर्भातील मूळ संकल्पनेलाच बाधा पोहोचेल या भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी घटना परिषदेसमोर दिलेल्या भाषणातील सावधानतेकडे सभापती प्रा. शिंदे यांनी उपस्थितांचे लक्ष वेधले आणि सर्वांनी या मूल्यांप्रती कटिबद्ध राहण्याचे आवाहन केले. सर्वसमावेशिता आणि सर्वांना समान संधीची उपलब्धता हे आपल्या राज्यघटनेचे महत्वाचे वैशिष्ट्य त्यांनी यावेळी अधोरेखित केले. कोणतीही राजकीय, आर्थिक अशी कौटुंबिक पार्श्वभूमी नसलेल्या कुटुंबातून पुढे आलेले प्रधानमंत्री नरेंद्र मोदी हे आपल्या उल्लेखनीय कार्यकर्तृत्वाच्या आधारावर तिसऱ्यांदा योगदान देत देशाला विकासाच्या वाटेवर पुढे नेत आहेत. हे स्वयंस्पष्ट उदाहरणच यासंदर्भात पुरेसे आहे, असेही सभापती प्रा. राम शिंदे यावेळी म्हणाले. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संसदीय कारकीर्दीचा प्रारंभ तेव्हाच्या बॉम्बे लेजिस्लेटिव्ह काऊन्सिल सदस्यत्वापासून झाला आहे आणि त्याचा आम्हाला अभिमान असल्याचेही त्यांनी सांगितले. आपल्या उत्तुंग कार्यकर्तृत्वाद्वारे लोककल्याणकारी राज्याची संकल्पना प्रत्यक्षात आणणाऱ्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचेही त्यांनी यावेळी स्मरण केले.

हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाऊंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई-६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून प्रकाशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि.पालघर. फोन नंबर ०२५०-२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण,** सहसंपादक (मराठवाडा): **राम पाटोळे,** कायदेशीर सल्लागार : **ॲड.रूपेश शिंदे.** न्यायकक्षा-वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com

27 JANUARY TO 02 FEBRUARY 2025 - Page 5 (CRIME SANDHYA):Layout 1  1/25/2025  8:25 PM  Page 1



# सफाळ्यात कानात इअरफोन घालून रुळावरून चालणं जीवावर बेतलं; रेल्वेच्या धडकेत विद्यार्थिनीचा दुर्दैवी मृत्यू

**सफाळे/प्रतिनिधी**




कानात इअरफोन घालून रेल्वे रुळावरून चालणं एका विद्यार्थीच्या जीवावर बेतलं आहे. कानात इअरफोन घालून रेल्वे रूळ ओलांडत असताना ट्रेनची धडक बसली. या धडकेत विद्यार्थीनीची जागीच मृत्यू झाल्याची धक्कादायक माहिती समोर येत आहे. पालघर जिल्ह्यातील पश्चिम रेल्वेच्या सफाळे रेल्वे स्थानकात ही घटना घडली आहे. वैष्णवी रावल असे रेल्वे अपघातात मृत्यू झालेल्या विद्यार्थीनीचे नाव आहे. सफाळे रेल्वे स्थानक परिसरात कानात इअरफोन घालून वैष्णवी रावल ही रेल्वे रुळ ओलांडत होती. मात्र ट्रेन येत असल्याचा अंदाज न आल्याने वैष्णवी रावल हिला राजधानी एक्स्प्रेसची धडक बसली. या धडकेत वैष्णवीचा जागीच मृत्यू झाला आहे. सफाळे रेल्वेस्थानक परिसरात रेल्वेरूळ ओलांडताना रेल्वेच्या धडकेत विद्यार्थिनीचा जागीच मृत्यू झाला आहे. वैष्णवी मयूर रावल असे मृत विद्यार्थिनीचे नाव असून या घटनेमुळे सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. सध्याच्या मोबाईल युगात शालेय, महाविद्यालय विद्यार्थी, तरूण-तरूणी सर्वांकडेच मोबाईल असतो. कानात इअरफोन, हेडफोन घालून मोबाईमधून मोठ्या आवाजात गाणी ऐकून बहुतांशजण प्रवास करत असतात. इअरफोन घातल्यामुळे आजूबाजूचा आवाज ऐकू येत नाही व आजूबाजूला काय सुरू आहे, याबाबत देखील कोणता ठाव ठिकाणा राहत नाही. त्यामुळे रेल्वेरूळ अथवा रस्ता ओलांडताना अपघात होऊन अनेकांना आपला जीव गमवावा लागत आहे. अशीच काहीशी दुर्दैवी घटना सफाळे रेल्वे स्थानक परिसरात घडली आहे. इअरफोन कानात घालून रेल्वेरूळ ओलांडत असताना रेल्वेच्या धडकेत विद्यार्थिनीचा मृत्यू झाला आहे. वैष्णवी मयूर रावल ही सोळा वर्षाची इयत्ता दहावीत शिक्षण घेणारी विद्यार्थिनी पालघर तालुक्यातील माकणे येथे रहिवासी असून तिचा क्लास संपवून घराकडे निघाली होती. माकणे येथे जाण्यासाठी सफाळे रेल्वे स्थानक परिसरातून पूर्वेकडून पश्चिमेकडे जावे लागते. पश्चिम रेल्वेच्या सफाळे रेल्वे स्थानक परिसरातून सफाळे पूर्वेकडून पश्चिमेकडे जाण्यासाठी रेल्वेरूळ ओलांडात असताना, वैष्णवीने कानात इअरफोन घातले होते. रेल्वेरूळ ओलांडत असताना मुंबईहून गुजरातच्या दिशेने जाणाऱ्या भरधाव राजधानी एक्स्प्रेस ट्रेनने तिला जोरदार धडक दिली. भरधाव ट्रेनच्या धडकेत वैष्णवी गंभीररीत्या जखमी झाल्याने तिचा जागीच मृत्यू झाला आहे. गुरुवारी दुपारच्या सुमारास तुमारास ही दुर्दैवी घटना घडली आहे. घटनेची माहिती मिळताच रेल्वे पोलीस घटनास्थळी दाखल झाले व मृतदेह ताब्यात घेत शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला. घटनास्थळाचा पंचनामा करण्यात आला असून याप्रकरणी अपघाती मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. सोळा वर्षाची मुलगी वैष्णवी हिचा मृत्यूची बातमी कळताच तिच्या आईने अक्षरशः टाहो फोडला. वैष्णवीचा रेल्वेच्या धडकेत दुर्दैवी मृत्यू झाल्याने तिच्या कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. या घटनेमुळे परिसरात देखील शोककळा पसरली आहे. सफाळे पूर्व परिसरातून पश्चिमेकडे रेल्वे रूळ ओलांडून जाण्यासाठी पश्चिम भागात जाण्यासाठी रेल्वे फाटकाजवळ पादचारी पुल नाही. त्यामुळे नागरिक, विद्यार्थी रेल्वे रूळ ओलांडण्याचा मार्ग अवलंबतात. रेल्वेच्या धडकेत विद्यार्थिनीचा मृत्यू झाल्याची घटना परिसरातील नागरिकांना कळताच माकडे परिसरातील नागरिकांनी देखील घटनास्थळी गर्दी केली व नागरिक देखील प्रशासना विरोधात आक्रमक झाले. या घटनेनंतर तरी प्रशासनाला जाग येईल का? असा सवाल स्थानिकांनी उपस्थित केला आहे. सफाळे परिसरात येण्या- जाण्यासाठी रेल्वे फाटक परिसरात पादचारी पूल लवकरात लवकर उभारण्यात यावा अशी मागणी स्थानिकांनी केली आहे.

# मशिदींवरील भोंग्यांच्या याचिकेवर मुंबई हायकोर्टाचा ऐतिहासिक निकाल; न्यायालयाकडून कार्यपद्धती स्पष्ट

**मुंबई/प्रतिनिधी**

राज्यातील मशिंदींवर असलेल्या बेकायदेशीर भोंग्याबाबत सातत्याने तक्रारी केल्या जातात. मात्र, केवळ तेवढ्या पुरताच हा मुद्दा विचारात घेतला जातो. या तक्रारींची दखलही तात्पुरत्या स्वरुपातच घेतली जाते, त्यानंतर काही दिवसांतच पुन्हा हे भोंगे वाजले जातात. न्यायालयाने घालून दिलेल्या डेसिबलच्या मर्यादेचं उल्लंघन करत मशिंदीवरील भोंगे वाजले जातात. पहाटेच्या सुमारास वाजणाऱ्या या भोंग्यांचा त्रास सर्वच समुदायातील नागरिकांना होतो. त्याच अनुषंगाने दाखल याचिकेवर आज उच्च न्यायालयात अंतिम सुनावणी झाली. त्यावर, न्यायालयाने पोलिसांना स्पष्ट शब्दात निर्देश देत राज्य सरकारलाही सुनावले आहे. याचिकेवर सुनावणी करताना आता हायकोर्टाने ध्वनिप्रदूषणाशी संबंधित तक्रारी हाताळत कायद्याच्या अंमलबजावणीसाठी स्पष्ट कार्यपद्धती निश्चित केली आहे. दरम्यान, मनसेकडूनही सातत्याने हा मुद्दा विचारात घेतला जाऊन कारवाईसंदर्भाने तक्रारी दाखल करण्यात आल्या आहेत. मुंबई उच्च न्यायालयानं मशिदींवरील बेकायदेशीर भोंग्यांबाबतच्या याचिकेवर सुनावणी करताना आज ऐतिहासिक निकाल दिला आहे. डेसिबल पातळीचं उल्लंघन आणि ध्वनीप्रदूषण मर्यादेबाबत सर्वोच्च न्यायालय आणि हायकोर्टानं निर्धारित केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांचं पालन न केल्याबाबतच्या याचिकेवर हायकोर्टानं हा निकाल दिला. परवानगी योग्य डेसिबल पातळीचं वारंवार उल्लंघन केलं जातंय. तसेच, स्थापित कायदेशीर निर्देशांचं पालन न केल्याचा आरोप करत हायकोर्टात अवमान याचिका दाखल करण्यात आली होती. या याचिकेवर सुनावणी करताना आता ध्वनिप्रदूषणाशी संबंधित तक्रारी हाताळत कायद्याच्या अंमलबजावणीसाठी हायकोर्टानं स्पष्ट कार्यपद्धती निश्चित केली आहे. जेव्हा ध्वनिप्रदूषणाबाबत पहिली तक्रार दाखल केली जाते तेव्हाच पोलिसांनी तात्काळ दखल घेत उल्लंघन करणाऱ्याला ध्वनिप्रदूषण नियमांचे उल्लंघन केल्याची माहिती द्यावी. याप्रकरणी कायद्याची कठोर अंमलबजावणी होणं गरजेचं आहे. उल्लंघन करणाऱ्याविरुद्ध दुसरी तक्रार दाखल झाल्यास, पोलिसांनी ध्वनी प्रदूषणास कारणीभूत ठरणाऱ्या दंडाची तरतूद असलेल्या महाराष्ट्र पोलीस कायद्याच्या कलम १३६ नुसार कारवाई करणं आवश्यक असल्याचं उच्च न्यायालयाने आदेशात म्हटले. तसेच, त्यानंतरच्या तक्रारींच्या बाबतीत, न्यायालयानं उल्लंघनास कारणीभूत असलेले लाऊडस्पीकर काढून टाकण्याचे आणि जप्त करण्याचे निर्देश पोलिसांना दिले आहेत. या कडक उपायांमुळे पुनरावृत्ती होणाऱ्या गुन्ह्यांवर प्रतिबंधक म्हणून काम करणे अपेक्षित आहे. मुंबई उच्च न्यायालयाने डॉ.महेश विजय बेडेकर विरुद्ध महाराष्ट्र राज्य यांच्यामध्ये दिलेल्या निकालाच्या अंमलबजावणीसाठी मार्गदर्शक तत्त्वे तयार करण्याचे निर्देशही राज्य सरकारला दिले आहेत.

# शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरेंच्या जयंतीनिमित्त महारक्तदान शिबिरात ११८ रक्तदात्यांनी केले रक्तदान



**वसई/प्रतिनिधी**

हिंदुहृदयसम्राट शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या ९९व्या जयंतीनिमित्त उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या नवघर माणिकपूर शहर शाखा आणि नवघर पूर्व विभाग यांच्या वतीने गुरुवारी महारक्तदान शिबीराचे आयोजन नवघर पूर्व येथील सदिच्छा सभागृह येथे शहरप्रमुख संजय गुरव व उपशहरप्रमुख शशिभूषण शर्मा यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. यावेळी एकूण ११८ रक्त बाटल्यांचे संकलन झाले. यावेळी छात्रप्रती शिवाजी महाराज, हिंदुहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे व नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला औद्योगिक वसाहतीमधील कामगार, कारखानदार व रहिवाशांनी उत्स्फुर्तपणे रक्तदान केले. याप्रसंगी शिवसेना जिल्हाप्रमुख पंकज देशमुख, माजी जिल्हाप्रमुख शिरीष चव्हाण, उपजिल्हाप्रमुख जनार्दन म्हात्रे, तालुका प्रमुख हरेश्वर पाटील, उपजिल्हाप्रमुख दिलीप चेंदवणकर, उपतालुकाप्रमुख सुनील मुळे, तालुकाप्रमुख स्वप्नील बांदेकर, नालासोपारा शहरप्रमुख प्रदीप सावंत, माहीम विधानसभा संघटक उमेश महाळे, वसई इंडस्ट्रियल असोशिएशन अध्यक्ष अनिल अंबर्डेकर व त्यांचे सहकारी, विमा इंडस्ट्रियल असोसिएशनचे धीरेन व्होरा, जतिन सावला विनोद खत्री, शैलेश जैन, उपशहरप्रमुख सुनील भालेकर, शहर समन्वयक रश्मी राव, उपशहरप्रमुख सुरज शिरोडकर, शहर समन्वयक विलास बिर्जे, यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी उपशहर संघटक योगिता पाटील, विभाग संघटक संजना गुरव, वंदना वायंगणकर, विभाग प्रमुख गंगाप्रसाद यादव, आनंद वळसंगे, उपविभागप्रमुख प्रमोद प्रभू, राजेंद्र निकम, अभिजित निकम, उपशाखाप्रमुख वसंत जाधव तसेच माथाडीचे मुकादम शिवा वळंजू, दादा गोरठ, अशोक दानोले, मनोज गौड, समीर पाटोळे, जयवंत जोरे, सिद्धांत शर्मा, मदन नादार यांनी प्रयत्न केलेतर शिवसेना नवघर पूर्व शाखा, शिवस्मृती प्रतिष्ठान, समर्थ सांस्कृतिक प्रतिष्ठान, वसई इंडस्ट्रियल असोशिएशन, वसई इंडस्ट्रियल मॅन्युफॅक्चरिंग वेलफेयर असोशिएशन, महाराष्ट्र माथाडी ट्रान्सपोर्ट आणि जनरल कामगार सेना आदींनी सहभाग घेतला होता.

# 'जल जीवन मिशन', 'हर घर जल योजना' आणि 'अमृत योजनां'च्या प्रलंबित कामांची वसई-विरार शहर महानगरपालिकेत आढावा बैठक संपन्न

**विरार/प्रतिनिधी**

वसई-विरार महानगरपालिका मुख्य कार्यालय, विरार येथे राज्यस्तरीय आदिवासी आढावा समिती अध्यक्ष (मंत्री दर्जा), वसईचे माजी आमदार विवेक भाऊ पंडित यांच्या अध्यक्षतेखाली जल जीवन मिशन, हर घर जल योजना, आणि अमृत योजनांच्या प्रलंबित कामांची आढावा बैठक संपन्न झाली. या बैठकीत जल जीवन मिशनच्या विविध योजनांची अंमलबजावणी, प्रलंबित कामे, अडचणी, आणि उपाययोजना यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. वसई तालुक्यात मुबलक पाणी उपलब्ध असूनही, काही गावे आणि आदिवासी पाड्यांना आजही पिण्याचे पाणी मिळत नाही तसेच वसई शहरांमधील सोसायट्यांना ही पुरेसे पाणी मिळत नाही. पाण्याची टंचाई भासत असून, सोसायट्यांना ट्रॅक्टरद्वारे पाणी आणण्यासाठी लाखो रुपयांची बिले भरावी लागत आहेत. या संदर्भात संबंधित अधिकाऱ्यांना जाब विचारण्यात आला. याशिवाय, वसईच्या पूर्व आणि पश्चिम



भागांमध्ये अद्याप पाणी वितरणासाठी पाईपलाईन टाकण्यात आलेली नाही. याबाबत अधिकाऱ्यांना जाब विचारून काम पूर्ण करण्यासाठी आवश्यक कालावधी विचारण्यात आला. हर घर नल से जल या केंद्र सरकारच्या महत्त्वाकांक्षी योजनेच्या अंमलबजावणी तातडीने करण्याचे आदेश विवेक भाऊ पंडित यांनी दिले. तसेच जल जीवन मिशनचे उद्दिष्ट प्रभावीपणे पूर्ण करण्यासाठी प्रलंबित कामांवर वेगवान अंमलबजावणी करण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले आणि जल जीवन मिशनचे उद्दिष्ट प्रभावीपणे पूर्ण करण्यासाठी आवश्यक उपाययोजना त्वरित राबवण्याचे सांगितले. तसेच नागरिकांना पिण्याच्या शुद्ध पाण्याचा पुरवठा वेळेत आणि प्रभावीपणे करण्यासाठी तातडीने उपाययोजना करण्यावर भर दिला. या बैठकीस माझ्या समवेत वसई-विरार महानगरपालिकेचे आयुक्त अनिल कुमार पवार, प्रकल्प अधिकारी डहाणू सत्यम गांधी, उपायुक्त संजय हेरवाडे, गट विकास अधिकारी वसई डोलारे, पाणीपुरवठा अधिकारी एकनाथ ठाकरे, जल जीवन मिशन अधिकारी, जिल्हा परिषदेचे अधिकारी आणि महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अधिकारी, तसेच वसई मतदारसंघातील भाजपचे प्रमुख प्रतिनिधी, कार्यकर्ते, श्रमजीवी संघटनेचे कार्यकर्ते आणि नागरिक सहभागी झाले होते.

# पालिकेच्या घंटागाडीने वृद्धाला चिरडले



**ठाणे/प्रतिनिधी**

दिवा येथील संतोष नगर भागात ठाणे महापालिकेच्या घंटागाडीने ७४ वर्षीय व्यक्तीला फरफटत नेल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. सिताराम थोटम असे मृताचे नाव असून या प्रकरणाची नोंद मुंब्रा पोलीस ठाण्यात केली जात आहे. ही घंटागाडी चालक पाठिमागे (रिव्हर्स) चालवित नेत होता. त्यामुळे हा अपघात झाल्याचे सीसीटीव्ही चित्रीकरणात स्पष्ट झाले आहे. संतोष नगर येथील चाळ क्रमांक दोन परिसरात सिताराम थोटम हे वास्तव्यास आहेत. शुक्रवारी सकाळी ९ वाजताच्या सुमारास त्यांच्या परिसरातील कचरा वाहून नेण्यासाठी ठाणे महापालिकेची घंटागाडी आली होती. ही घंटागाडी संबंधित चालक पाठिमागे नेत होता. त्याचवेळी थोटम हे त्या गाडीच्या मागे होते. त्यांना घंटागाडी मागे येत असल्याचे दिसले नाही. त्यामुळे ते घंटागाडी खाली आले. या अपघातात ते गाडीसोबत काही मीटर अंतरापर्यंत फरफटत गेल्याने त्यांना गंभीर जखम झाली. त्यांना उपचारासाठी कळवा येथील ठाणे महापालिकेच्या छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात दाखल करण्यात आले. डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषित केले. याप्रकरणाची नोंद मुंब्रा पोलीस ठाण्यात केली जात आहे.

# विरार पूर्व येथे 'महावाचन संकल्प महाराष्ट्रा'चा मोठ्या उत्साहात संपन्न

**विरार/प्रतिनिधी**

आगाशी विरार अर्नाळा शिक्षण संस्था संचलित विरार पूर्व येथील पद्मश्री भाऊसाहेब वर्तक महाविद्यालयात महाराष्ट्र शासन आणि मुंबई विद्यापीठाच्या परिपत्रकानुसार वाचन संकल्प महाराष्ट्राचा हा विशेष पंधरवडा उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमाचा मुख्य हेतू वाचन संस्कृती जोपासणे आणि विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करणे हा होता. या पंधरवड्यामध्ये विविध उपक्रमांचे आयोजन महाविद्यालयामध्ये करण्यात आले होते. त्यात प्रामुख्याने विद्यार्थ्यांसाठी वाचन कौशल्य कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते या कार्यशाळेत वाचन का आणि कसे करावे वाचनाच्या पद्धती आज वाचन करताना माहिती आणि तंत्रज्ञानाचा वापर कशाप्रकारे करावा याबद्दल वक्ते निखिल नाईक यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांमधील संवाद कौशल्यांना विकसित करण्यासाठी ठराविक विद्यार्थ्यांना एकत्रित करून त्यांचा टॉक शो आयोजित केला होता. या टॉक शोमध्ये नेहा यादव, सविनय दुबे, तन्वी पवार, ललिता शिरसाट या विद्यार्थ्यांनी आपल्या आवडत्या पुस्तकांवर चर्चा केली तसेच पुस्तकांमुळे त्यांच्या जीवनात झालेले सकारात्मक बदल या शोच्या




माध्यमातून उपस्थितासमोर मांडले. महाविद्यालयाच्या वाचनालयात गटवाचन सत्राचे आयोजन करण्यात आले होतं. या वाचन सत्रामध्ये विद्यार्थ्यांनी एकत्र येऊन पुस्तक आणि वर्तमानपत्रे वाचली आणि सामूहिक वाचन कार्यक्रम कार्यक्रम संपन्न झाला. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. शितल कोरडकर यांनी वाचनाची ऊर्जा या विषयावरती विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केलं त्यात प्रामुख्याने जलद वाचन, मजकूर समजून घेणे, प्रभावी आकलन या तंत्रांचा सराव विद्यार्थ्यांना शिकविण्यात आला. पुस्तक प्रदर्शनात विविध प्रकारची पुस्तके ठेवण्यात आली. पुस्तक प्रदर्शनामध्ये ६५० हून अधिक पुस्तके प्रदर्शित करण्यात आली आणि ८०० हून अधिक विद्यार्थ्यांनी या प्रदर्शनाला भेट दिली. विद्यार्थ्यांना मराठी, हिंदी, इंग्रजी भाषांमधील उत्तम साहित्याचा परिचय करून दिला गेला. शब्दकोश कसा वापरायचा यासंदर्भात विशेष दोन दिवसीय कार्यक्रम आयोजित करण्यात आला आणि या कार्यक्रमात विद्यार्थ्यांच्या भाषिक ज्ञानात वाढ कशी होईल यावरती भर देण्यात आला. विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला चालना देण्यासाठी माइंडमेज उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. यामध्ये विविध प्रश्नमंजुषा आणि कोडी सोडवण्याच्या स्पर्धा घेण्यात आल्या. ज्यासाठी विद्यार्थ्यांनी विविध पुस्तकांचा संदर्भ घेतला. लेखक तुमच्या भेटीला हा एक नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात आला ज्यामध्ये चंद्रकांत कातारे, विक्रांत केसरकर या नामांकित लेखकांना आमंत्रित करून त्यांचं लेखन प्रवास जाणून घेतला. तसेच या नामांकित लेखकांनी वाचनाची गोडी कशी निर्माण करावी, तसेच लिहिण्याचे तंत्र यावर मार्गदर्शन केले. राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने दत्तक घेतलेल्या विरार पूर्व बेगर्सहोम या जिल्हा परिषद शाळांमध्ये कथा आणि काव्य वाचनाचा कार्यक्रम आयोजित केला आणि जिल्हा परिषद विद्यार्थ्यांमध्ये कथा वाचन का महत्त्वाचे आहे याबाबत गोडी निर्माण केली. या पंधरवड्याची सांगता एका वेगळ्या उपक्रमाने करण्यात आली आणि तो उपक्रम म्हणजे वाचन कट्टा विद्यार्थ्यांच्या विचारांच्या आदान प्रदानासाठी, तसेच विद्यार्थ्यांना एक हक्काचं व्यासपीठ मिळावं याकरिता वाचन कट्ट्याचं उद्घाटन महाविद्यालयात करण्यात आलं. विशेष बाब म्हणजे हे उद्घाटन विद्यार्थ्यांच्या हस्ते संपन्न झाल. सदर महावाचन संकल्प हा उपक्रम महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. शितल कोरडकर यांच्या नेतृत्वात राबविण्यात आला. महाविद्यालयाच्या व्यवस्थापन मंडळाचे विशेष सहकार्य या उपक्रमास लाभले. तसेच हा उपक्रम यशस्वी होण्यासाठी महाविद्यालयाच्या ग्रंथपाल स्टेविना डिकून्हा यांनी विशेष परिश्रम घेतले.

# मराठी ग्रंथ संग्रहालयाचे 'ग्रंथयान' बंद होण्याच्या मार्गावर; पर्यायी म्हणून घरपोच सेवा उपलब्ध!

**ठाणे/प्रतिनिधी**

एकीकडे मराठी पंधवडा दिवस साजरा होत असतानाच, दुसरीकडे शहरात वाचकांची भूक भागवणारे मराठी ग्रंथ संग्रहालयाचे ग्रंथयान बंद होण्याच्या मार्गावर आहे. देखभालीचा खर्च परवडत नसल्यासह ग्रंथयानाला पूर्णवेळ चालक उपलब्ध होत नाहिये, त्यामुळे हे ग्रंथयान बंद करण्याचा निर्णय मराठी ग्रंथ संग्रहालयाने घेतला आहे. परंतू, वाचकांची गैरसोय होऊ नये यादृष्टीने पर्यायी म्हणून घरपोच पुस्तके सेवा उपलब्ध केली जाणार आहे. या घरपोच सेवेत जोपर्यंत पूर्णपणे वाचकांची नोंदणी होत नाही, तोपर्यंत ग्रंथयान बंद करण्याच्या निर्णयाला पूर्णविराम दिला जाणार नाही, असा दावा मराठी ग्रंथ संग्रहालय व्यवस्थापनाने केला आहे. राज्यात प्रथमच ठाणे मराठी ग्रंथ संग्रहालयाने ११ वर्षांपूर्वी हे ग्रंथयान सुरु केले होते. या अनोख्या फिरत्या ग्रंथालयाच्या संकल्पनेला राज्यात पसंती मिळाली होती. ठाण्यातील कोपरी, तीन हात नाका, शिवाईनगर, कचराळी तलाव, लुईसवाडी, लोकमान्य नगर, पोखरण क्र. २, घोडबंदर रोडवरील मानपाडा, पातलीपाडा, ब्रह्मांड, हिरानंदानी इस्टेट, वसंत विहार, पवार नगर, कॅसल मिल, बाळकूम, खारेगाव, कोलशेत, माजिवडा आदी भागात ग्रंथयानाद्वारे वाचकांना पुस्तके उपलब्ध होत होती.

ठाणे शहराचा विस्तार होत असतानाच, शहराच्या कानाकोपऱ्यात वास्तव्य करणाऱ्या मराठी ग्रंथप्रेमी वाचकांसाठी ग्रंथयान सेवा ही पर्वणी लाभली होती. या ग्रंथयानाचे ठाणे शहरात ३५० हून अधिक सदस्य होते. सद्यस्थितीला ग्रंथयानचा देखभाल दुरुस्तीचा खर्च वाढला आहे. तसेच ग्रंथयानाला पूर्णवेळ चालक उपलब्ध होत नसल्यामुळे अनेकदा वाचकांची गैरसोय होत आहे. वाचकांची गैरसोय होऊ नये यादृष्टीकोनातून ग्रंथयान बंद करुन घरपोच पुस्तके ही सेवा सुरु करण्याचा निर्णय घेतला असल्याची माहिती मराठी ग्रंथ संग्रहालयामार्फत देण्यात आली. परंतू, ग्रंथयान बंद करणार या संबंधीची सूचना मराठी ग्रंथ संग्रहालयाच्या संकेतस्थळावर किंवा ग्राहकांना दूरध्वनीद्वारे कळविण्याऐवजी थेट ग्रंथयानावर प्रसिद्ध करण्यात आली आहे. त्यामुळे या निर्णयाला काही वाचकांकडून विरोध व्यक्त केला जात आहे. मराठी ग्रंथ संग्रहालयाच्या व्यवस्थापनाने ग्रंथयानला पर्यायी म्हणून घरपोच पुस्तके योजना सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. या पुस्तक योजनेत मासिक शुल्क २०० रुपये करण्यात आले आहे. संस्थेच्या संकेतस्थळावर किंवा पच्या माध्यमातून वाचकांना सहा पुस्तके निवडावी लागणार आहेत. त्यापैकी महिन्याला चार पुस्तके वाचकांना घरापर्यंत उपलब्ध होणार आहेत. त्यानंतर, नवी पुस्तके पाठविताना जुनी पुस्तके परत घेतली जाणार आहे. प्रत्येक पुस्तकासाठी पाचशे रुपये अनामत रक्कम भरावी लागणार आहे. तर, ग्रंथयान च्या माध्यमातून वाचकांना स्वत: पूस्तक हाताळून तीन ते चार पूस्तक १५ दिवसासाठी उपलब्ध केली जात होती. या घरपोच सेवेमुळे वाचकांना आर्थिक भूर्दंड बसण्यासह पुस्तक हाताळण्यासही मिळणार नाही. यामुळे वाचक संख्या घटण्याची भिती व्यक्त होऊ लागली आहे. घरपोच सेवेसाठी व्यवस्थापनाकडून एका कुरिअर कंपनी सोबत करार केला जाणार आहे, अशी माहिती सुत्रांकडून देण्यात आली. घरपोच पुस्तके सुविधेबाबत जोपर्यंत सर्व वाचकांना कळणार नाही आणि घरपोच सुविधेसाठी त्यांची नोंदणी होणार नाही तोपर्यंत ग्रंथयान बंद केले जाणार नाही. यासाठी आपण ग्रंथयान च्या माध्यमातून सर्व वाचक सदस्यांना यासंदर्भातले परिपत्रक देत आहोत. घरपोच पुस्तक सुविधामुळे वाचकांनी कोणत्याही प्रकारची गैरसोय होणार नाही याची काळजी घेतली जाईल, असे ठाण्यातील मराठी ग्रंथ संग्रहालयाचे कार्याध्यक्ष चांगदेव काळे यांनी सांगितले.

27 JANUARY TO 02 FEBRUARY 2025 - Page 6 (CRIME SANDHYA):Layout 1 1/25/2025 8:25 PM Page 1



# कामावरून कमी केलेल्या सफाई कामगारांचे लातूर महानगरपालिकेसमोर बेमुदत उपोषण!



**लातूर/प्रतिनिधी**

लातूर शहरात स्वच्छता व साफसफाई करणाऱ्या महिला कामगार व सुपरवायझर यांना गेल्या सहा महिन्यापासून कामावरून कमी करण्यात आले आहे. या कामगारांनी खंडीत काळातील वेतनासह कामावर पूर्ववत घेण्यात यावे, या मागणीसाठी लातूर शहर महापालिकेसमोर २० जानेवारीपासून बेमुदत उपोषण सुरु केले आहे. हे उपोषण आंदोलन अखिल महाराष्ट्र जनरल कामगार संघटनेचे संस्थापक अध्यक्ष राजकुमार होळीकर यांच्या नेतृत्वाखाली करण्यात येत आहे. या आंदोलनात सर्व महिला कामगार, सुपरवायझर व संघटनेचे कार्यकर्ते, पदाधिकारी यांचा समावेश आहे. लातूर शहर महापालिकेच्या स्वच्छता व साफसफाई विभागात बाह्यस्रोत यंत्रनेमार्फत १७ वर्षांपासून अत्याल्प वेतनावर महिला कामगार व सुपरवायझर स्वछतेची कामे करत आहेत. मात्र १ ऑगस्ट २०२४ पासून सुमारे दीडशे महिला कामगार व सुपर वायझर यांना अचानक तोंडी आदेशाने कामावरून कमी करण्यात आले. यातील काही कामगार १७ वर्षांपासून तर काही १५ वर्षांपासून काम करत होते. त्यामुळे या कामगारांच्या कुटुंबाची उपासमार होत आहे. कामगारांसाठीच्या कुठल्याही कामगार कायद्याची अंमलबजावणी केली नाही किंवा सोयीसुविधा त्यांना दिलेल्या नाहीत. कामावर घेण्यासाठी यापूर्वी अनेक वेळा अर्ज विनंत्या केलेल्या आहेत. त्यामुळे जिल्हाधिकारी व मनपा आयुक्तानी दखल घेऊन कामावरून कमी केलेल्या सर्व महिला सफाई कामगार व सुपर वायझर यांना खंडीत काळातील वेतनासह पूर्ववत कामावर रुजू करून घ्यावे. या मागणीसाठी मनपा समोर २० जानेवारीपासून बेमुदत उपोषण सुरु करण्यात आले आहे. या उपोषण आंदोलनात बंडू कांबळे, महादेव कांबळे, रोहिदास राठोड, विकास देडे, विद्या धावारे, वनिता धावारे, मंगल मोरे, रुक्मिणी कांबळे, सुरेखा गायकवाड, मनीषा कांबळे, रेखा लोंढे, धम्मशिला बनसोडे, सुनंदाबाई गायकवाड, लक्ष्मी पाटोळे, संगीता जगदाळे यांच्यासह ८४ महिला कामगार सहभागी आहेत.

पान १ वरून....

## भुसावळमध्ये गुन्हेगारीतून 'रक्ताचा सडा'...

या प्राणघातक हल्ल्यातील जखमींना डॉ. उल्हास पाटील रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. जखमीनातेवाईकांना बघण्यासाठी अफाफ पटेल रुग्णालयात गेला असता त्या ठिकाणी त्याचे इतर परिचीत नातेवाईक आणि वार्डातील नगरसेवक शफी पहेलवान असे सर्वजण हजर होते. यावेळी जखमी नातेवाईकांसह अफाफ पटेल याने नगरसेवक शफी पहेलवान यांना विचारले की तुम्ही नगरसेवक म्हणून हजर असतांना टोळक्याची आमच्या नातेवाईकांवर प्राणघातक हल्ला करण्याची हिम्मत कशी काय झाली? माझ्या नातेवाईकांना एवढ्या कृरपणे मारहाण कशी काय झाली असा सवाल अफाफ पटेल याने नगरसेवक शफी पहेलवान यांना केला. त्यावेळी त्याठिकाणी शेख मुजम्मील शेख फरीद हा हजर होता. शेख मुजम्मील याच्यासह त्याच्या काही नातेवाईकांनी अफाफ पटेल याच्यावर हल्ला चढवला. मात्र शफी पहेलवान यांनी मध्यस्ती करत रुग्णालय परिसरातील वाद मिटवला. या टोळक्याचा जीम ट्रेनर अफाफ पटेल याच्यावर व्यावसायीक वादातून मोठ्या प्रमाणात राग कायम होता. आपसी हल्ला आणि या वादाच्या तक्रारी त्यावेळी विविध पोलिस स्टेशनला दाखल झाल्या होत्या. दोन गटातील हा वाद अधुनमधून उफाळून येत होता. रस्त्याने जाता येताना तेहरीम नासीर शेख, तोहिद नासीर शेख हे अफाफ पटेल यास वारंवार बघून घेण्याच्या धमक्या देत शिवीगाळ करत होते.सर्वजण गुंड प्रवृत्तीचे असल्यामुळे शरीरसौष्ठवपटू असला तरी अफाफ पटेल पोलिस स्टेशनला त्यांच्याविरुद्ध तक्रार दाखल करण्यास जात नव्हता. जीम ट्रेनर अफाफ पटेल याचा भाऊ वसीम मजीद पटेल याने भुसावळ रेल्वे स्टेशनच्या प्लॅटफॉर्म वर कॅन्टीन स्टॉल चालवण्यास घेतला होता. तो स्टॉल वसीम पटेल याला मिळू नये म्हणून कलीम उंद्री व शरीफ उंद्री या दोघांनी वाद घातला होता. एकंदरीत गुंड प्रवृत्तीच्या टोळक्याने जीम ट्रेनर अफाफ पटेल यास जेरीस आणले होते. तो कुठे जातो? काय करतो? याच्या मागावर त्याचे सर्व गुंड प्रवृत्तीचे विरोधक रहात होते. जीम ट्रेनर अफाफ पटेल हा दररोज सायंकाळी सहा ते नऊ या कालावधीत कॅरम खेळण्यासाठी खडका रोड परिसरातील अलिया कोल्ड्रिंक्स या ठिकाणी जात होता. ४ फेब्रुवारी २०२३ रोजी अफाफ पटेल चार वाजता कॅरम खेळण्यासाठी अलिया कोल्डींक्स या ठिकाणी आला. तो खरोखर कॅरम खेळण्यासाठी आला आहे की नाही याची खात्री करण्यासाठी दोघे जण हेरगिरी करुन गेले. अफाफ पटेल कॅरम खेळत असतांना रात्री नऊ वाजेच्या सुमारास त्याठिकाणी रोमान शेख शकील शेख, तेहरीन नासीर शेख, शेख समीर शेख फिरोज असे सर्वजण हातात लाठया व रॉड घेवुन अफाफवर हल्ला करण्याच्या उद्देशाने आले. आपल्यावर प्राणघातक हल्ला होणार याची खात्री पटताच अफाफ पटेल हा तेथून जीव वाचवण्यासाठी पळाला. मात्र हल्लेखोरांनी काळ बनून त्याचा पाठलाग केला. त्याला लाठ्या काठ्यांनी मारहाण करण्यात आली. तेहरीम शेख याने त्याच्या हातातील लोखंडी रॉड अफाफ याच्या अंगावर घातला. बचाव करण्यासाठी अफाफने त्याचा डावा हात उचलला. मात्र तो रॉड त्याच्या बोटांना लागला. पुढच्याच क्षणी तेहरीम शेख याने त्याच्या हातातील रॉड अफाफच्या डोक्यावर उगारला. तो हल्ला देखील परतवून लावण्यासाठी अफाफने डावा हात वर केला. त्यामुळे तो रॉड अफाफच्या डाव्या हाताच्या कोपरावर लागला. त्यात अफाफ जबर जखमी झाला. हमारेको भाई बोला कर अबसे, नही तो जानसे मार देंगे अशी धमकी शेख समीर शेख फिरोज याने ओरडून अफाफला दिली. तेहरीन शेख याच्यासोबत असलेल्या सर्वांनी जखमी अफाफला अतिशय खालच्या दर्जाच्या शिव्या देत तेथून पलायन केले. मात्र जाता जाता त्यांनी तेरे भाई वसीम पटेलको बोल, कलीम उंद्री और शरीफ उंद्री के नांदमे नही लगनेका, नही तो जानसे मार डालेंगे अशी धमकी अफाफला दिली. जखमी अफाफला त्याचा मेहुणा शेख जोएब शेख जाफर याने त्याचा मित्र सद्दाम शेख अकबर, इम्रान शेख पप्पु शिकारी, रफिकभाई आदींच्या मदतीने डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. अती दक्षता विभागात उपचारादरम्यान अफाफ पटेल याने दिलेल्या जवाबानुसार प्राणघातक हल्लया प्रकरणी भुसावळ बाजारपेठ पोलिस स्टेशनला रोमान शेख शकील शेख, तेहरीम नासीर शेख, शेख समीर शेख फिरोज, लतीफ तडवी या हल्लेखोरांसह त्यांना मदत करणाऱ्या दानिश शेख फरीद शेख, शेख उबेद शेख अक्रम, मुजम्मिल शेख फरीद, तोहिद शेख नासीर शेख, अबुजर शेख बशीर, मुस्तफा शाह युनुस शाह, नासीर सन्नाटातसेच इम्मु कोलरीया, कल्लु तडवी व अक्रम शेख सबदर शेख या सर्वांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. कलीम उंद्री व शरीफ उंद्री यांनी जीवे ठार मारण्याचा कट रचल्याचा आरोप करण्यात आला. वैद्यकीय उपचारादरम्यान अफाफ पटेल याचा मृत्यु झाला. त्याची मृत्युसोबतची झुंज संपली. त्यामुळे या गुन्ह्यात खूनाचे कलम वाढवण्यात आले. या प्राणघातक खूनी हल्लूयात तेहरीम नासीर शेख याचा प्रमुख रोल होता. त्यानेच लोखंडी रॉडने अफाफवर प्राणघातक हल्ला चढवला होता. अफाफच्या मृत्यूस कारणीभूत असलेल्या तेहरीम शेख याचा बदला घेण्याचे अदनान उर्फ काल्या शेख युनुस याने मनाशी ठरवले होते. मित्राच्या खूनाचा बदला घेण्यासाठी अदनान याने बदल्याचे टास्क पुर्ण करण्यासाठी हातावर मयत अफाफ याचा टॅटू गोंदवून घेतला. तो टॅटू बघून त्याला अफाफच्या मृत्यूचा बदला घेण्याची कायम आठवण रहात होती. अखेर दोन वर्षांनी १० जानेवारी २०२५ अफाफच्या खूनाचा बदला घेण्याचा तो दिवस जवळ आला. या दिवशी तेहरीमच्या जीवनातील सकाळची शेवटची नमाज आणि सकाळच्या शेवटच्या चहाचा घोट नियतीने लिहून ठेवला होता. सकाळी साडे सहा वाजता तेहरिमअहमद नासिर याच्यासह चिक्की विक्रेता जाकीर मेहबुब खान, अहमद शेख, अब्बास खान निसार खान, जहाँगिर खान अन्वर खान असे सर्वजण मच्छीवाडयातील मशिदीत नमाज पठन करण्यासाठी गेले. नमाज पठण सकाळी सात वाजता पुर्ण झाले. त्यानंतर तेहरीम याच्यासह सर्वजण चहा पिण्यासाठी जाम मोहल्यातील शालीमार हॉटेल समोर असलेल्या डी.डी.सुपर कोल्ड्रीक्स ॲ ण्डटी हाऊस या दुकानावर सव्वा सात वाजता एकत्र आले. चहा पित असतांना त्याठिकाणी एका पाठोपाठ एक असे तन्वीर माजिद पटेल, अनवर पटेल, रमिज पटेल, शेख साहिल शेख रशिद असे चौघे जण त्याठिकाणी अचानक येऊन धडकले. बंदुका घेऊन आलेल्या सर्वांनी घाणेरड्या शिव्या देत बाहर निकलो असा इशारा दिला. तन्वीर माजिद पटेल याने तेहरिम अहमद यास त्याच्या समोर उभा राहून साले तुने हमारे भाई को पिछले साल मारा था, अब तेरा खेल खत्मअसे म्हणत त्याच्या दिशेने बंदुकीतील गोळी झाडली. ती गोळी तेहरिम अहमद याच्या उजव्या कानाच्या खाली मानेला स्पर्श करुन गेली. गोळीचा आवाज ऐकताच दुकानात चहा पिण्यासाठी आलेले इतर ग्राहक घाबरुन क्षणार्धात पळापळ करत पसार झाले. चहाच्या हॉटेलमधे आलेल्या चौघांनी तेहरीम याच्यावर गोळ्या झाडल्या. त्यातील एक गोळी तेहरिम अहमद याच्या उजव्या बाजुला मानेवर लागली. एक गोळी डोक्याच्यामागे लागली. या गोळीबारीत तेहरीम गंभीर जखमी झाला. त्यानंतर आलेले चौघे जण त्यांच्या कब्जातील बंदुका घेत रुबाबात हॉटेलमधून बाहेर पडू लागले. मात्र बाहेर निघत असतांना सालो हमारे बारे में किसीने किसीको बोला तो इसके जैसा तुम्हारको मार डालेंगे अशी धमकी देण्यास विसरले नाही. बाहेर आलेले अनवर पटेल व शेख साहिल शेख रशिद हे दोघे जण एका मोटर सायकलवर बसुन रेल्वेस्टेशनच्या दिशेने निघून गेले. तन्वीर माजिद पटेल व रमिज पटेल असे दोघे जण दुस- या मोटर सायकलवर बसुन गोल्डन लॉजच्या रस्त्याने शिवाजीनगरच्या दिशेने निघून गेले. यावेळी घाबरुन पळून गेलेला चिक्की विक्रेता जाकीर मेहबुब खान याच्यासह अब्बास खान निसार खान, जहाँगिर खान अन्वर खान असे सर्वजण पुन्हा घटनास्थळी हॉटेलमधे आले. त्याठिकाणी तेहरीम हा जखमी अवस्थेत पडलेला होता. या घटनेची माहिती मिळाल्यानंतर जखमी तेहरीम अहमद याचे वडील नासिर शेख, बहिण तबस्सुमबी व भाऊ नविद शेख असे तिघे जण त्याठिकाणी आले. सर्वांनी मिळून जखमी तेहरीम यास रिक्षाने आठवडे बाजार परिसरातील एका खासगी दवाखान्यात नेले. मात्र त्यापुर्वीच तेहरीम याची प्राणज्योत मालवली होती. खासगी दवाखान्यातील डॉक्टरांनी तेहरीम यास तपासून मयत घोषित केले. तेथील डॉक्टरांनी त्याला ट्रामा केअर सेंटरमधे घेऊन जाण्याचा सल्ला दिला. ट्रामा केअर सेंटर मधील डॉक्टरांनी देखील त्याला तपासून मयत घोषित केले. त्यांनी त्याला जळगाव येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय येथे पोस्टमॉर्टम कामी नेण्याचा सल्ला दिला. अखेर दोघा जणांनी त्याचा मृतदेह शासकीय वैद्यकीयरुग्णालय व महाविद्यालयात नेला. दरम्यानच्या कालावधीत मयत तेहरीम याचे वडील नासीर अहमद आणि जाकीर खान असे दोघे जण बाजारपेठ पोलिस स्टेशनला तक्रार देण्यासाठी हजर झाले. दरम्यानच्या कालावधीत चर्चेदरम्यान त्यांना समजले की तेहरीम याचा खून अदनान उर्फ काल्या शेख युनुस आणि मजीद पटेल या दोघांनी संगनमताने कट रचून चौघांच्यामदतीने केला आहे. जाकीर खान याने दिलेल्या फिर्यादीनुसार भुसावळ बाजारपेठ पोलिस स्टेशनला तेहरीम याच्या खून प्रकरणी तन्वीर माजिद पटेल, अनवर पटेल, रमिज पटेल, शेख साहिल शेख रशिद, मजिद पटेलव अदनान उर्फ काल्या शेख युनुस या सहा जणांविरुद्ध खूनाचा गुन्हा दाखल करण्यात आला. गु.र.नं. १४/२०२५ भारतीय न्याय संहिता कलम १०३(१), ६१(२), ३५१(२), ३५१(३), ३५२, ३(५) सह शस्त्र अधिनियम कलम ३/२५ नुसार १० जानेवारी २०२५ रोजी हा गुन्हा दाखल करण्यात आला. या गुन्ह्याचा पुढील तपास भुसावळ बाजारपेठ पोलिस स्टेशनचे पोलिस निरीक्षक राहुल वाघ यांनी आपल्या सहका-यांच्या मदतीने सुरु केला. या गुन्ह्याचा समांतर तपास स्थानिक गुन्हे शाखेने देखील सुरु केला. या गुन्ह्यातील फरार संशयीत आरोपी सलमान अब्दुल मजीद पटेल उर्फ रमीज पटेल यास स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने बल्लारशाह जिल्हा चंद्रपुर येथून ताब्यात घेत अटक केली. या शोध कामी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उप निरीक्षक शरद बागल, पोहेकॉ कमलाकर बागुल, पोहेकॉ गोपाल गव्हाळे, पोहेकॉ संघपाल तायडे, चालक पोहेकॉ सोमवंशी, पोकॉ सचीन पोळ आदींनी सहभाग घेतला. भुसावळ बाजारपेठ पोलिस स्टेशनचे पोलिस निरीक्षक राहुल तुकाराम वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली त्याच्या पथकाने अदनान शेख युनुस, शेख साहील शेख रशीद, अब्दुल नबी हनीफ पटेल, सनीस नाइन मोहमद आसीफ अशा चौघांना मनमाड परिसरातून तपासाअंती शिताफीने ताब्यात घेत अटक केली. या पथकातील सहायक पोलिस निरीक्षक गणेश धुमाळ, सहायक पोलिस निरीक्षक अमितकुमार बागुल, पोलिस उप निरीक्षक मंगेश जाधव, पोलिस उप निरीक्षक राजु सांगळे, पोलिस उप निरीक्षक मंगेश बेंडकोळी, पोहेकॉ विजय नेरकर, पोहेकॉ रमण सुरळकर, पोहेकॉ उमाकांत पाटील, पोहेकॉ महेश चौधरी, पोहेकॉ अनवर शेख, पोहेकॉ निलेश चौधरी, पोलिस नाईक अतुल पवार, पोलिस नाईक सोपान पाटील, पोकॉ प्रशांत परदेशी, जावेद शहा, भुषण चौधरी, योगेश माळी, राहुल वानखेडे, हर्षल महाजन आदींनी या तपासकामी सहभाग घेतला. त्यांच्या कब्जातून चार गावठी पिस्टल, तिन पितळी धातुचे जिवंत काडतुस व एक पितळी धातूची काडतुसाची रिकामी पुंगळी असा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. सुरुवातीला सर्व संशयितांना पोलिस कोठडी व नंतर न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली. भुसावळ शहरात 'खून का बदला खून'ची मालिका सुरुच असून अशा बदल्याच्या भावनेतून वाढत जाणाऱ्या गुन्हेगारीला आळा बसावा असे या घटनांच्या निमित्ताने म्हटले जात आहे. १३ जुलै २०१५ रोजी जामनेर रोडवरील वाल्मीक चौकात मोहन बारसे यांची हत्या झाली. त्यानंतर १३ जानेवारी २०१६ रोजी मोहन बारसे खून प्रकरणातील संशयित आरोपीनट्टू चावरिया आणि गोपाळ शिंदे यांच्यावर बसमध्ये बदल्याच्या भावनेतून गोळीबार झाला होता. त्यात नट्टू चावरियाचा मृत्यू झाला होता. ९ ऑगस्ट २०१७ रोजी मोहन ब बारसे हत्याकांडातील आरोपी जॅकी ऊर्फ जगदीश पथरोडची भोपाळमध्ये हत्या झाली होती. मोहन बारसे खून प्रकरणातील संशयित आरोपीची बदल्याच्या भावनेतून ही दुसरी हत्या होती.४ फेब्रुवारी २०२३ रोजी शरीरसौष्ठवपटू अफाफ पटेल याचा खून झाला होता.या प्रकरणात एकुण सोळा जणांविरुद्ध गुन्हा दाखल झाला. यातील तेहरीमचा या गोळीबारीच्या घटनेत मृत्यू झाला आहे. दि. २३ ऑक्टोबर २०२३ रोजी दिलीप रामलाल जोनवाल यांची निर्घृण हत्या झाली होती. सन १९९९ मधील वडिलांच्या खूनाच्या घटनेचा बदला म्हणून आदिल खाटीक याने ही हत्या केली होती. दि. २९ मे २०२४ रोजी जळगाव रोडवर पूर्ववैमनस्यातून हल्लेखोरांनी अंदाधुंद गोळीबार करत माजी नगरसेवक संतोष बारसे, सुनील राखुंडे या दोन्ही मित्रांचा एकाचवेळी खून केला होता. भुसावळ शहरातील गुन्हेगारीचा आलेख दिवसेंदिवस वाढत असल्याचे देखील या घटनांच्या निमित्ताने म्हटले जात आहे. भुसावळ येथील गुन्हेगारीला राजकीय वरदहस्त असल्याचे देखील म्हटले जाते. राजकीय वरदहस्त असल्यामुळे आपले कुणीच काही वाकडे करु शकत नाही अशी गुन्हेगारांच्या मनात भावना निर्माण झाली असल्याचे बोलले जाते.

## बापाच्या अपमानामुळे मुलगा चिडला...

पण नातू मोठा होतो, तेंव्हा आजोबा आपल्या वडीलांना बोलतात व रागावतात हे त्याला खटकण्याची शक्यता असते. यातून काही वेळा वाद होऊ शकतात, पण धुळे जिल्ह्यात एका १६ वर्षीय नातवाने आपल्या आजोबांचा खून केला हे मात्र धक्कादायक आहे. शहादा शहरातील वापी रेसिडेन्सी परिसरात वास्तव्यास असलेल्या दशरथ शंकर राजे (वय ६०) या कष्टकरी इसमाला भरत, राहुल आणि मनोज नावाची तीन मुले. घरची परिस्थिती जेमतेम असल्याने दशरथ हा काबाडकष्ट करून अर्थार्जन करायचे. मिळणाऱ्या मानधनातून त्यांनी तीनही मुलांचे पालन-पोषण केले होते. भरत, राहुल आणि मनोज आपआपल्या पायावर उभे राहिल्यानंतर तिघांची लग्ने करून दिली. लग्न झाल्यानंतर तीनही मुले विभक्त झाली आणि वेगवेगळी राहू लागली. दशरथ राजे याचा मोठा मुलगा भरत हा शहादा येथील मीरानगर परिसरात रहातो. मधला मुलगा मनोज आणि तिसरा मुलगा राहुल हे दोघे शहाद्यातील वापी रेसिडेन्सी परिसरात रहायला आहेत. दशरथ हा आपला तिसरा मुलगा राहुल याच्याकडे रहातो. शेंडेफळ म्हणून दशरथ आणि त्याची पत्नी सुनंदाबाई यांचा राहुलवर जीव होता, म्हणून ते दोघे राहुलजवळ रहात होते. दशरथ व सुनंदाबाई यांना तीनही मुले सारखीच म्हणून ते वारंवार त्यांना समुपदेशन करत. काबाडकष्ट करून खर्च वजा जाता थोडी-फार रक्कम भविष्यासाठी बचत करत जा असे दशरथचे तीनही मुलांना सांगणे असायचे. दशरथचा मूळ स्वभाव स्पष्टवक्तेपणाचा असल्याने जे चांगले दिसायचे त्याबद्दल ते कौतुक करत. जे त्यांच्या मनाला पटत नसे त्याबाबतीत ते आपली नाराजी प्रकट करत असत. प्रसंगी ते आपल्या तीनही मुलांना रागावत व शिवीगाळही करत असत. तीनही मुलांपैकी मोठा मुलगा भरत हा थोडा आळशी, कामचुकार व परिस्थितीची जाणीव नसणारा होता. वडीलांचं बोलणं तो या कानाने ऐकायचा आणि त्या कानाने सोडून द्यायचा, त्यामुळे वडील दशरथवर भरतवर रूष्ट होते. काही वर्षांपासून त्यांनी भरतशी बोलणे, त्याच्याशी संपर्क ठेवणे, त्याला समजुतीच्या चार गोष्टी सांगणे सोडून दिले होते. आपल्याशी आपले वडील बोलत नाहीत याचं शल्य भरतला बोचत होतं. गेल्या काही दिवसांपासून त्या कारणास्तव तो अस्वस्थ होता. आपले आजोबा इतर दोन काकांशी बोलतात, त्यांच्या घरी जातात, आपल्याच घरी येत नाहीत म्हणून १६ वर्षीय नातवाला म्हणजे भरतच्या मुलाला ते खटकत असायचं.

वडीलांनी आपल्या घरी यावं असं भरतलाही वाटत होतं. त्याच्या बायकोलाही आपल्या सासऱ्याने घरी यावं असे वाटत होतं. त्या हेतूने काही दिवसांपासूनते दोघे दशरथला घरी बोलवायचं निमित्त शोधत होते. दशरथलाही आपल्या मुलाला, सूनेला आणि नातवाला भेटायची आंतरिक इच्छा होती. निमित्त काढून भरतने आपल्या वडीलांना रविवार दि. ८ डिसेंबर २०२४ रोजी आपल्या घरी रात्रीच्या जेवणाचं निमंत्रण दिलं. निमंत्रण देण्यासाठी त्याने आपल्या मुलाला पाठवले होते. भरतचा मुलगा निमंत्रण द्यायला गेला. दशरथनेही निमंत्रणाचा स्वीकार केला. रविवार दि. ८ डिसेंबर २०२४ रोजी रात्री भरतने दिलेल्या निमंत्रणाचा स्वीकार करत दशरथ हे त्याच्या घरी पोहोचले. वडीलांनी दिलेला शब्द पाळला. आपल्या निमंत्रणाचा स्वीकार केल्यानुसार ते आपल्या घरी आले याचा भरतला आणि त्याच्या कुटुंबाला आनंद झाला. बऱ्याच दिवसांनंतर दशरथ हा भरतच्या घरी आला होता, त्यामुळे जेवण आटोपल्यानंतर नेहमीच्या सवयीप्रमाणे दशरथने आपल्या मुलाची विचारपूस केली. दोघांच्या चर्चेअंती भरतच्या काही गोष्टी त्याला खटकल्या. मूळ स्वभाव जागृत झाला. दशरथने भरतची कानउघाडणी केली. 'मला वाटलं होतं, तू आता सुधारला असशील, पण अजूनही तुझ्यात फरक पडला नाही. भविष्यातही तू सुधारशील असे मला वाटत नाही.' दशरथचं हे बोलणं भरतला नवीन नव्हतं, त्यामुळे त्याने या कानाने ऐकले आणि त्या कानाने सोडून दिले. आपले सासरे आपल्या नवऱ्याच्या भल्यासाठीच बोलले असं म्हणून भरतच्या बायकोनेही दशरथचं रागावणं मनावर घेतलं नाही, पण भरतच्या मुलाला मात्र ही गोष्ट खटकली. आपल्या घरी जेवण करून आपल्या वडीलांना आपले आजोबा बोलतात, त्यांना अपमान करतात असे त्याला वाटले. आठ-साडेआठच्या दरम्यान दशरथने आपल्या मुलाचा व सूनेचा निरोप घेतला आणि आपल्या स्कुटीवर बसून ते तापी रेसिडेन्सी परिसरात आपल्या घरी जायला निघाले. आपल्या स्कुटीवरून शिरूड रोडमार्गे दशरथ सोना इण्डेन गॅसच्या बोर्डाजवळ आला असता या परिसरात अंधारात दबा धरून बसलेला दशरथचा नातू म्हणजे भरतचा १६ वर्षीय मुलगा रस्त्यावर आला आणि त्याने आपल्या आजोबांची स्कुटी अडवली. त्याच्याबरोबर त्याचा मित्रही होता. नातवाने आणि त्याच्या मित्राने स्कुटी अडवल्याने दशरथने स्कुटी थांबवून 'तू मला का अडवलंस?' असे विचारताच नातवाने खिशातील धारदार चाकू बाहेर काढला आणि त्या चाकूने दशरथच्या गळ्यावर डाव्या बाजूने सपासप वार केले. अचानकरित्या झालेल्या प्राणघातक हल्लूयाने दशरथ घायाळ झाला आणि रक्ताच्या थारोळ्यात तो जमिनीवर कोसळला. दशरथ जमिनीवर पडताच हल्लेखोर नातवाने दशरथची स्कुटी घेवून घटनास्थळावरून पोबारा केला. इकडे दशरथच्या घरी त्याचा मुलगा राहुल आपले वडील अजून का परतले नाहीत. त्यांचे आणि आपल्या मोठ्या भावाचे भांडण तर झाले नाही ना? अशी शंका आल्याने राहुल शिरूड रोडवरून दशरथचा शोध घेत भरतच्या घरी जायला निघाला. शिरूड रोडवरील सोना इण्डेन गॅसच्या फलकाजवळ राहुल येताच त्याला त्याचे वडील दशरथ हे रक्तबंबाळ अवस्थेत विव्हळत पडलेले दिसले. राहुलने मदतीसाठी त्या रस्त्यावरून ये-जा करणाऱ्या लोकांना जखमी वडीलांना दवाखान्यात घेवून जाण्यासाठी मदत मागितली, पण झंझट नको म्हणून कुणीही त्याला मदत केली नाही, शेवटी राहुलने आपल्या मित्रांनाफोन करून घटनास्थळी येण्याची विनंती केली. राहुलचा फोन येताच त्याचे मित्र राकेश मंराठे, रामेश्वर सोनार, महेश पाटील हे घटनास्थळी आले. मित्रांच्या मदतीने राहुलने आपल्या वडीलांना रूग्णालयात घेवून जाण्याच्या तयारीत असतांनाच शहादा पोलीस स्टेशनचे प्रभारी पोलीस निरीक्षक राजन मोरे व त्यांचे सहकारी शिरूड रस्त्यानेजात असतांना त्यांच्या निदर्शनास ही बाब येताच त्यांनी पोलीस उपविभागीय अधिकारी दत्ता पवार, स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाचे पोलीस निरीक्षक हेमंत पाटील यांना या संदर्भाची माहिती दिली. विभागीय पोलीस अधिकारी दत्ता पवार यांच्या मार्गदर्शनाखाली शहादा पोलिसांनी घटनास्थळाचा आणि जखमी अवस्थेतील दशरथ शंकर राजे यांचा पंचनामा करून दशरथ राजे यांना शहादा येथील ग्रामीण रूग्णालयात उपचारार्थ दाखल केले. अतिदक्षता विभागात त्याच्यावर उपचार सुरू असतांनाच दशरथ राजे यांची प्राणज्योत मालवली. घटनेची माहिती मिळताच दशरथ राजे यांचा मधला मुलगा मनोज हासुद्धा रूग्णालयात आला. या घटनेची माहिती पोलीस अधीक्षक श्रवण दत्ता यांना कळताच घटनेची उकल करण्यासाठी सी.सी.टी.व्ही. कॅमेऱ्यातील फुटेजची मदत घेण्याची सुचना तपास अधिकारी पोलीस निरीक्षक राजन मोरे यांना केली. दरम्यान शहादा पोलीस स्टेशनचे पोलीस कॉन्स्टेबल भरत उगले यांना दशरथ राजे यांच्या अल्पवयीन नातवाने त्याच्या मित्राच्या मदतीने दशरथ राजे यांच्यावर प्राणघातक हल्ला केल्याची माहिती मिळाली. हांच धागा पकडत विभागीय पोलीस अधिकारी दत्ता पवार, पोलीस निरीक्षक राजन मोरे यांनी जिल्हा पोलीस अधीक्षक श्रवण दत्ता यांच्या सुचनेप्रमाणे परिसरातील सी.सी.टी. व्ही. तपासले असता त्यात संबंधित संशयित भरत राजे यांचा मुलगा व त्याचा अल्पवयीन मित्र हे खेतीया रोडच्या दिशेने जात असल्याचे दिसून आले. त्या फुटेजचा मागोवा घेत तपास पथक पुढे जात असतांना त्यांना दशरथ राजे यांची स्कुटी म्हसावदकडे जाणाऱ्या रस्त्यावर दरा फाट्याचादरम्यान आढळली. ती स्कुटी जप्त करून दशरथ राजे यांच्या संशयित नातवाचा माग काढला असता तो मीरानगरमधील आपल्या घरात दडून बसल्याचे दिसून आले. घटना घडल्यानंतर अवघ्या साडेचार तासांत पोलीस निरीक्षक मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली तपास पथकाने मुख्य संशयितास चौकशीसाठी ताब्यात घेतले. संशयित अल्पवयीन बालकास बोलते केले असता माझे आजोबा माझ्या वडीलांना सतत अपमानास्पद वागणूक देत होते. घाणेरड्या शिव्या देत असायचे. त्याचा राग येवून मी माझ्या मित्राच्या मदतीने माझ्या आजोबांवर खुनी हल्ला केल्याचे त्याने मान्य केले. दशरथ राजे यांच्या नातवाने दिलेला कबुली जबाब कॅमेराबद्ध आणि शब्दबद्ध झाल्यानंतर दशरथ राजे यांची स्कुटी आणि खुनी हल्ल्यासाठी वापरण्यात आलेल्या चाकूची माहिती संशयित आरोपीने दिली. आजोबांची स्कुटी आपण दरा फाट्यावर लावल्याचे आणि चाकू आपल्या मित्राच्या मदतीने भाऊ तात्या पंपाच्या पुढे रस्त्यालगत लपवल्याची माहिती दिली. अल्पावधीत प्रत्यक्षदर्शी पुरावा नसतांना घटनेची उकल केल्याबद्दल पोलीस अधीक्षक श्रवण दत्ता यांनी पोलीस निरीक्षक राजन मोरे व त्यांच्या तपास पथकातील सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रतापसिंह मोहिते, प्रदीप राजपूत, हेडकॉन्स्टेबल देवा विसपुते, दिनकर चव्हाण, भरत उगले, युवराज राठोड, भगवान साबळे यांचे अभिनंदन केले.

पान ८ वरून....

## गुरुचरण जमिनीवरील बेकायदेशीर ...

अशा शासकीय जमिनीवर अनेक ठिकाणी बेकायदेशीर बांधकाम झालेला आहे. याही ठिकाणी महसूल विभाग वसई विरार महानगरपालिका संयुक्त कारवाही करणार असल्याचे एका विश्वसनी सूत्रांकडून कळाले त्यामुळे बेकायदेशीर बांधकाम करणाऱ्या चाळमाफी याचे मात्र आता धाणेदबावले आहेत. ही कारवाही वसई तहसीलदार अविनाश कोष्टी यांच्या आदेशाने राजाराम देवकते नायब तहसीलदार यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभाकर पाटील मंडळ अधिकारी विरार व तलाठी यांच्यासह वसई विरार महानगरपालिकेचे कर्मचारी, महावितरण विभागाचे कर्मचारी व पोलीस अधिकारी यांच्या उपस्थितीत जेसीपीच्या माध्यमातून या बेकायदेशीर झालेल्या बांधकामावर तोडक कारवाही करण्यात आली.

## नवोदित पत्रकारांना पत्रकारितेच्या...

आणि या शाळेचे माजी विद्यार्थी पत्रकारिता क्षेत्रात नावारूपाला आलेले आहेत अर्थात त्यांचा आदर्श पुढे ठेवून आताच्या विद्यार्थ्यांनी समाजाला न्याय देणारी पत्रकारिता करावी असे मार्गदर्शन पाटील यांनी केले. एकूणच हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्वश्री समाजसेवा मंडळाचे खजिनदार मिलिंद पाटील, मेघनाथ पाटील, संघाचे सदस्य आनंद गदगी, नितांत राऊत, शिवकुमार शुक्ला आदीनी विशेष मेहनत घेतली. या कार्यक्रमाचे सुत्र संचालन शिक्षक निलेश गवळी तर आभार प्रदर्शन मुख्याध्यापक विलास जगताप यांनी मानले.

# पाण्यासाठी श्रमजीवी संघटनेचा मोर्चा व बेमुदत ठिय्या आंदोलन!



**वाडा/प्रतिनिधी**

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी वाडा तालुक्यातील १३९ योजनांना निधी उपलब्ध करून दिला असून सदर योजनांच्या माध्यमातून हर घर नल से जल या संकल्पने प्रमाणे प्रत्येक घरात नळाने पाणी ३१ मार्च २०२४ पर्यन्त पोहचणे आवश्यक होते. मात्र श्रमजीवी संघटनेने एप्रिल २०२४ मध्ये योजना पूर्ण न झाल्याने प्रत्येकाच्या घरात पाणी न पोहचल्याने प्रत्येक गाव पाड्यात आंदोलने करून योजना राबवत असतांना पाईप ३ फुट खाली न टाकणे, विहीर खोदकाम करतांना पाण्याचा उद्भव नसतांना सुद्धा विहीर बांधकाम करणे, योजनेमध्ये गाव/पाड्यांचा समावेश नसणे व इतर उणिवा संबंधित अधिकारी, कर्मचारी यांच्या निदर्शनास आणून दिले होती. यावेळी संबंधित यंत्रणेने योजना पूर्ण करणार असल्याचे लेखी आश्वासने देऊन सुद्धा ६ महिन्याचा कालावधी उलटला मात्र अजूनही घरात नळाने पाणी पोहचले नाही. प्रत्यक्षात अनेक गाव पाड्यातील किती कुटुंबांन पाणी मिळाले नाही. अनेक पाडे या योजनेपासून वंचित राहिलेले आहेत सर्वे करतांना चुकीचा केला गेल्याने अनेक कुटुंबांना या वर्षीही पाण्यापासून वंचित राहावे लागणार आहे.

गांधे गावातून वैतरणा नदी वाहते तरीही पाणी गांधे गावा लगत असलेले १७-२० गावांना पिण्यासाठी पाणी मिळत नाही मात्र कोका-कोला कंपनीला पाईपने कुडूस येथे औद्योगिकीकरणासाठी दिले जाते. सद्यस्थितीत पिण्यासाठी पाणी नसतांना कंपनीला औद्योगिकीकरणासाठी चालू असलेले पाणी तात्काळ बंद करण्याची मागणी केली होती. या नदीतून पाणी उपसा दिवस रात्र चालू आहे. हा पाणी उपसा तात्काळ बंद करावा. जल जीवन मिशन योजनेचे मुदत संपली तरीही अनेक गाव पाड्यातील घरात पाणी पोहचले नाही. याचा जाब विचारण्यासाठी श्रमजीवी संघटनेच्या वतीने शनिवारी (दि.२५) खंडेश्वरी नाका येथून हंडा कळशी मोर्चा काढण्यात आला. या मोर्चात मोठ्या संख्येने महिला उपस्थित होत्या. वाडा पंचायत समिती समोर बेमुदत ठिय्या आंदोलन सुरु केले आहे. मोर्चाचे नेतृत्व शंजीवी संघटनेचे तालुका अध्यक्ष भरत जाधव, जानू मोहनकर, तालुका सचिव सुरज दळवी यांनी केले.

## घरफोडीच्या गुन्ह्याची २४ तासात उकल



**वाडा/प्रतिनिधि**

वाडा तालुक्यातील सापरोंडे येथे राहणारे जयेश जाधव यांनी दि. १८ डिसेंबर रोजी वाडा पोलीस ठाण्यात तक्रार दिली होती की, त्यांच्या पत्नीचे सोन्याचे दागिने घरातील कपाटामध्ये ठेवलेले असतांना कोणीतरी अज्ञात चोरटयाने ते चोरुन नेल्याची तक्रार दाखल केली होती. सदर गुन्ह्यातील चोरीस गेलेले दागीन्यांचा शोध घेत असतांना गुप्त बातमीदारा कडून माहीती मिळाल्याने गोराड येथे राहणारा प्रसाद मढवी याचेकडे सापरोंडे येथील स्नेहल जाधव ही दागीने विकण्यासाठी गेली होती. परंतु त्याने खरेदी करण्यात नकार दिल्याने स्नेहल जाधव हीने चोरी केलेले सोन्याचे दागीने तुषार राऊत रा. वज्रेश्वरी यास विक्री केलेचे माहीती प्राप्त झाली. त्यानुसार तुषार राऊत याला ताब्यात घेवुन चौकाशी केली असता त्याने सदरचे दागीने खरेदी केल्याची कबुली दिली. दोन्ही आरोपींना ताब्यात घेवुन त्यांच्या कडून चोरीस गेलेले दोन लाख ३१ हजार सातशे रुपयांचे सोन्याचे दागीने हस्तगत केले. सदर गुन्हयाचा कौशल्याने, सीसीटिव्ही फुटेज व इतर तांत्रीक गोष्टींचा अभ्यास करुन तसेच गुप्त बातमीदारामार्फत माहीती काढुन शोध घेवुन सदरचा गुन्हा उघडकीस आणुन गुन्हयातील आरोपी स्नेहल सचिन जाधव रा. सापरोंडे व तुषार विठ्ठल राऊत रा. वज्रेश्वरी यांच्या कडून चोरुन नेलेले सोन्याचे दागीने हस्तगत केले.

## उल्हासनगरमध्ये वडिलांसह मुलाने सहा वर्षाच्या मुलीवर केले लैंगिक अत्याचार



**उल्हासनगर/सुनील तांबे**

पोलीस सूत्रा कडून मिळालेल्या माहिती नुसार, उल्हासनगर मध्यवर्ती पोलीस स्टेशनच्या हद्दीत एक अत्यंत धक्कादायक घटना घडली आहे,शेजारी राहणाऱ्या बाप-लेकाने एका पाच वर्षाच्या मुलीवर लैंगिक अत्याचार केल्याची घटना घडली आहे. या घटनेत पीडित मुलीच्या शेजारी राहणारे नराधम आणि त्याचा बारा वर्षाचा मुलगा या दोघांनी मिळून या मुलीवर वेळोवेळी लैंगिक अत्याचार केले. मुलीचे आई वडील मोलमजुरीचे कामे करतात. मुलीचे आई-वडील कामावर गेल्यावर मुलगी एकटीच घरी असल्याचा फायदा घेत, या नराधमांनी मुलीचा फायदा घेत अत्याचार केल्याची बाब उघडकीस आली आहे. पीडित मुलगी बाथरूममध्ये गेल्यावर तिला अहसनिय् झालेल्या त्रासाबद्दल तिच्या आईला सांगितल्याने हा धक्कादायक प्रकार समोर आला. उल्हासनगर सेंट्रल पोलिसांनी या दोन्ही आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करून त्यांना अटक केली आहे. या घटनेने परिसरात खळबळ माजली असून, संबंधित आरोपींविरुद्ध कठोर कारवाईची मागणी केली जात आहे.

# लातूर फार्मसीत नूतन विद्यार्थ्यांचे स्वागत




**औसा/प्रतिनिधी**

लातूर येथील श्री वेताळेश्वर शिक्षण संस्था संचलित कॉलेज ऑफ फार्मसी लातूर महाविद्यालयात प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी इंडक्शन प्रोग्राम बी. फार्मसी प्रथम वर्ष, बी फार्मसी द्वितीय वर्ष व डी फार्मसी प्रथम वर्षाच्या नव्याने प्रवेशित विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ आगाज २०२५ या नावाने कार्यक्रम नुकताच पार पडला. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून छत्रपती संभाजी नगर येथील सहआयुक्त अन्न व औषधी प्रशासन विभागाचे राजगोपाल बजाज यांची उपस्थिती होती. यावेळी व्यासपीठावर पुणे येथील ओम प्रकाश सेल्स अँड कार्पोरेशनचे संचालक कार्तिक पायमोडे, लातूर येथील प्रकाश सर्जिकल कंपनीचे संचालक प्रकाश रेड्डी तसेच संस्थेचे अध्यक्ष भीमाशंकर बावगे, सचिव वेताळेश्वर बावगे, संचालक नंदकिशोर बावगे, प्राचार्य संतोष मेदगे, प्राचार्य वीरेंद्र मेश्राम उपस्थित होते. प्रारंभी मान्यवरांच्या शुभ हस्ते सरस्वती मातेच्या प्रतिमेची पूजन करून कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रस्ताविक प्राचार्य डॉ. श्रीनिवास बुमरेला यांनी महाविद्यालयात असणाऱ्या विविध शैक्षणिक धोरण, भौतिक सुख-सुविधा व शैक्षणिक वर्षात होणाऱ्या विविध कार्यक्रमाची माहिती देण्यात आली.

फार्मसीच्या विद्यार्थ्यांना सरकारी व खाजगी क्षेत्रामध्ये खूप नोकरीच्या संधी आहेत त्यासाठी ध्येय व धोरण ठरवून काम केल्यावर हमखास यश मिळते, असे प्रतिपादन राजगोपाल बजाज यांनी केले. कितीही मोठे वादळ आले तर डोंगर हलत नाही कारण त्याचे मूळ खोलवर मजबूत असते असे उद्गार कार्तिक पायमोडे यांनी केले. फार्मसी क्षेत्रात व्यवसायाबद्दल सखोल माहिती देण्यात आली. व नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांनी सदरील अभ्यासक्रमाला प्रवेश घेतल्याबद्दल अभिनंदन करून आपण आपली प्रगती अभ्यासक्रम तसेच अभ्यासक्रमाशी निगडित इतर वेगवेगळी कोर्सेस करून स्वतःचा व महाविद्यालयाचा आलेख कसा वाढवता येईल यावरती भर देण्याचे आव्हान केले. तसेच मान्यवरांच्या हस्ते खेळामध्ये प्रथम व द्वितीय येणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यात आले. दुपारच्या सत्रात सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आले. कार्यक्रमास उपस्थित प्रा. शुभम वैरागकर,प्रा.एम मुळे, प्रा चैतन्य पवार, प्रा सुप्रिया जाधव, प्रा माधुरी पोळकर, प्रा स्नेहज्या भालेराव, प्रा मनकरना कराळे, प्रा.संस्कृती शिरुरे, ग्रंथपाल ज्ञानेश्वर कांबळे, शेबीर शेख आदी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा.अक्षता लासुरे यांनी केले. तर आभार प्रा. अतुल कदम यांनी मानले.

## चोरी, लुटमार करणारी चौकडी वाडा पोलिसांच्या ताब्यात



**वाडा/प्रतिनिधी**

वाडा भिवंडी महामार्गावर आयशर टेम्पो चालकाला चाकूचा धाक दाखवून लुटणाऱ्या चौकडीला सि.सि.टि.व्ही.कॅमेऱ्याच्या मदतीने दोघांना व स्थानिक नागरिकांच्या मदतीने दोघांना असे चार आरोपींना वाडा पोलिसांनी अटक करून त्यांच्या कडून तीन मोबाईल जप्त केले आहेत. शुक्रवारी मध्यरात्रीच्या सुमारास अंबरनाथहून आलेला टेम्पो आबिटघरला जात असताना रात्रीच्या सुमारस वाडा तालुक्यातील शिरीष पाडा येथे चहा पिण्यासाठी थांबलेल्या आयशर टेम्पो चालकावर चाकूने वार करून त्याच्याकडील पाच हजार रूपये व एक ओपो कंपनीचा मोबाईल घेऊन पसार झाले होते. पुढे जाऊन एका ठिकाणी चोरी करत असताना स्थानिक नागरिकांनी दोघांना पकडून चोप दिला व पोलिसांच्या ताब्यात दिले या ठिकाणाहून दोघे पळून गेले होते त्यांना शहापूर तालुक्यातील कांदळी येथून अटक केली आहे. मोबाईल चोरी, चाकूचा धाक दाखवून लुटाने, चाकूने वार करणे यासाठी गणेश भिम जाधव, (रा.कांदळी), सनी मोकाशी (रा. तुसे), नितीन रावते (रा. कुईलू) व प्रकाश मोर (रा.सावरखांड) यांना तात्काळ वाडा पोलिसांनी अटक करून चार दिवस पोलीस कोठाडीत ठेवले आहे. पोलीस निरीक्षक दत्तात्रेय किंद्रे यांच्या मार्गदर्शना स.पो.नि. अजित साबळे, स.पो.नि. अजित गोळे, पो.उ.नि. मयुरेश अंबाजी, पो.हवा. विजय मढवी, पो.हवा गुरुनाथ गोतारणे, पो.हवा.संतोष किनी, पो.हवा. विलास दिवे, पो.अंम. गजानन जाधव, भुषण खिलारे, संतोष वाकचौरे, चेतन सोनावणे, सानप गोवारी यांचे पथकाने केलेली आहे. सदर बाबत अधिक तपास पो.उ.नि. मयुरेश अंबाजी हे करत आहे.

## तरोडा खुर्द नांदेड विद्युत केंद्रात सावळा गोंधळ

### मीटर रीडिंग न पाहता दिले ४५०० बील; बील ऑपरेटरचा प्रताप!

**नांदेड/प्रतिनिधी**

नांदेड विद्युत विभागात सावळा गोंधळ चालू असून तक्रारीची दखल तर घेतली जात नाही पण समाधानकारक उत्तरेही दिली जात नाहीत. हुक टाकून लाइट घेणे, मीटर मध्ये बिघाड करून बील कमी देणे असे अनेक प्रकार या विभागात चालू आहेत. मालेगाव रोड, अयोध्या नगर येथील विठ्ठल तुळशिराम पोकलवार ग्राहक क्रमांक ५५००१८१६५७३२ यांचे घर असून ते बाहेरगावी राहतात. महिन्यातून एखाद्या शनिवारी येतात व सोमवारी जातात. त्यांचे घर बंद असल्यामुळे विद्युत वापर होत नाही. पण या बेजबाबदार ऑपरेटने मागील महिन्यातील मीटर रीडिंग उपलब्ध नाही असा शेरा मारून सरळ ३८४ यूनिट इतकी रीडिंग दाखवली व ४३५० रुपये बील माथी मारले. पण महावितरणच्या ढिसाळ कारभारामुळे याना नाहक अधिक चे बील भरावे लागते. त्यानी रीतसर माहिती देऊन बील ऑपरेटर ला विचारणा केली असता उडवा उडवी ची उत्तरे दिली. या विभागाचे अभियंता याना संपर्क केला असता त्यानी ही चौकशी न करता उत्तरे देण्याचे टाळले. हा सर्व प्रकार ग्राहकाना कंटाळवाणा झाला आहे. येथील कर्मचारी यांची मनमानी वाढली असून ग्राहक वैतागले आहेत. कोणतेही काम पैसे दिल्या शिवाय होत नाही. जो पैसे देईल त्याचे काम लवकर होते, अशी चर्चा ग्राहकांमध्ये चालू आहे.

या भागात कित्येक घरी व शेतात आणि बांधकामावर अवैध रित्या विद्युत वापर करण्यास परवानगी देऊन त्यांचे विद्युत कर्मचारी आर्थिक हितसंबंध जोपासतात. या विभागात बदली करून येण्यासाठी लाखोंचा मलिदा वाटला जातो. ज्या कर्मचारी विरोधात तक्रारी आहेत त्याना अशा ठिकाणी येण्यास प्रतिबंध आहे. पण सर्वच गौडबंगाल असल्यामुळे इथे सावळा गोंधळ आहे. कर्मचारी ग्राहकाना बोलताना कोणतीही शिस्त पाळत नाहीत. उद्धटपणे व्यवहार करतात. हा विद्युत विभाग म्हणजे ग्राहकांची डोकेदुखी झाली आहे. पैसे दिल्याशिवाय काम करावयाचे नाही हे काम सदरील विभाग करतो. कित्येक ग्राहकणा असा अनुभव आला आहे. जर असे नसेल तर मग हे हुक टाकून विद्युत का वापरले जाते? या भागात प्रचंड वीज गळती दाखवली जाते? एका घरातून दुसऱ्या घरात विद्युत पुरवठा देणे व घेणे नियमबाह्य आहे पण या भागात ते का चालते? लोकांच्या तक्रारी घेतल्या जात नाहीत. जरी रजिस्टर तक्रार नोंदवली तरी कर्मचारी लवकार येत नाहीत. या ठिकाणी रजीस्टर ही लवकर मिळत नाही. जर मिळाले तर कर्मचारी सकाळी येतो ची भाषा बोलतात. या सर्व विभागाची उच्च स्तरीय पथकाद्वारे चौकशी करण्यात यावी. बाहेरचे पथक येऊन चौकशी करणे महत्वाचे आहे. अन्यथा ग्राहकांचा उद्रेक व्हावयास वेळ लागणार नाही.

## राज्यभरातील तज्ञ १६ शिक्षकांना शिक्षक क्षमता वृद्धी प्रशिक्षण संपन्न




**भिवंडी/प्रतिनिधी**

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे आयोजित स्टार व समग्र शिक्षा अंतर्गत प्राथमिक माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तर शिक्षक क्षमतावृद्धी प्रशिक्षण २.०चे राज्यस्तरीय प्रशिक्षण २० ते २४ जानेवारी २०२५ या कालावधीत सिंहगड इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, कुसगाव, लोणावळा येथे राज्य विकास आराखडा प्रमुख राजेंद्र वाकडे, संशोधन विभाग प्रमुख डॉ.दत्तात्रय थिटे, पुणे डायट प्रमुख प्रभाकर क्षिरसागर आदी मान्यवरांच्या उपस्थितीत उत्साहात संपन्न झाले आहे. सदर प्रशिक्षणात ठाणे जिल्ह्यातील १६ तज्ञ शिक्षकांची निवड झाली होती. यामध्ये माध्यमिक विभागातून डॉ. दिनानाथ पाटील, भूपेन्द्र महाजन, प्रज्ञा बापट, योगिता पाटील, देवेंद्र पाटील, बालाजी घुगे, सुमन बंडगर, सुनिल शर्मा, श्याम शेलार व प्राथमिक विभागातून हर्षल साबळे, सुदर्शना शिरुडे, डॉ. सुनीता बेडसे, संगीता भेरे, डॉ.शुभांगी गादेगावकर, अजितकुमार गायकवाड, शहाबुल-हक-सिद्दिकी अशी निवड झालेल्या शिक्षकांची नावे आहेत. दरम्यान यामध्ये भिवंडीतून एकमेव शिक्षक म्हणून पी.आर. हायस्कूलचे देवेंद्र पाटील यांची निवड झाल्याने त्यांच्यावर तालुक्यातील शिक्षकांकडून अभिनंदनाचा वर्षाव झाला. तर ३ ते ७ फेब्रुवारी या कालावधीत ठाणे डायट प्राचार्य संजय वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा स्तरावर प्रशिक्षण होणार असून त्यानंतर संपूर्ण ठाणे जिल्ह्यातील शिक्षकांना प्रशिक्षित करून सदर प्रशिक्षण महाराष्ट्र राज्यातील सर्व शिक्षकांना दिले जाणार आहे.

## थोडक्यात वृत्तांत

### देवणी महावितरणने महापुरुषांची जयंती साजरी न केल्याने तहसीलदारांना निवेदन



**देवणी** : राज्यातील शासकीय कार्यालय, शैक्षणिक संस्थांमध्ये राष्ट्रपुरुष यांच्या जयंती व पुण्यतिथी साजरी करण्यात यावे असे शासनाचे आदेश आहेत. तरी देखील अनेक संस्थांमध्ये महापुरुषांच्या जयंती व पुण्यतिथी साजऱ्या केल्या जात नाही. असाच प्रकार देवणी महावितरणने दिं २३ जानेवारी २०२५ रोजी स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे आणि स्वातंत्रसैनिक सुभाषचंद्र बोस यांची जयंती साजरी केली नाही.त्या संदर्भात संध्याकाळी ०४:३० (चार वाजुन तीस मिनिटे झाल्यावरचा असिस्टंट इंजिनिअर तथा प्रभारी उप कार्यकारी अभियंता लिंबोने रवी जयंती का साजरी केली नाही संदर्भात केलेला विडिओ पण उपलब्ध आहे) अशांवर वरिष्ठ अधिकाऱ्यांनी कडक कारवाई करण्यासंदर्भातील मागणी देवणी शिवसेनेतर्फ करण्यात आली आहे. याची दखल तात्काळ घेऊन कार्यवाही करण्यात यावी अन्यथा देवणी शिवसेनेतर्फ आंदोलन करण्यात येणार असल्याचे निवेदन देवणी तहसीलदारांना देण्यात आले. निवेदनाची माहितीस्तव प्रत जिल्हाधिकारी लातूर यांना पण देण्यात येईल. निवेदनावर शिवसेना शहरप्रमुख दिपक मळभागे, माधव तेलंगे, चेतन मिटकरी, विलास तोंडारे, विशाल डोंगरेसह अदिंच्या स्वाक्षऱ्या आहेत.

### बाळासाहेब ठाकरेंच्या जयंतीनिमित्त कन्यापूजन



वाडा : हिंदूहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंती निमित्त वाडा तालुक्यातील पाली येथे शिवसेनेचे (उबाठा) पालघर जिल्हा समन्वयक (विक्रमगड व बोईसर विधानसभा) ओमकार पाटील यांनी एका अनोख्या व स्तुत्य उपक्रमाचे आयोजन केले होते. तालुक्यातील बा.ल.शिंगडा विद्यालय व इतर शाळेतील मुलींना आदरपूर्वक एकत्र करून कन्यापूजन करून त्यांना योग्य तो मान सन्मान दिला. एकूण २३ बालकन्यांचे विधिवत पूजन करून त्यांना भेट वस्तू, ड्रेस पीस व अन्नदान करुन पूजन करण्यात आले. त्यानंतर करमणुकीचे खेळ घेण्यात आले त्यामुळे कार्यक्रमाला एक वेगळीच रंगत आली. खेळातील विजेत्या मुलींना शैक्षणिक साहित्य बक्षीस म्हणून देण्यात आले. सन्मान पूर्वक त्यांना येण्या जाण्याची सोय केली व जाताना गुलाबाचे रोपटे ही भेट म्हणून देण्यात आले. शिवसेना महिला कार्यकर्त्यांना साडी देवून सन्मानित करण्यात आले. बाळासाहेबांची रांगोळी हे ही ह्या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण ठरले. बाळासाहेबांच्या जयंतीचे निमित्त साधून पाली सारख्या ग्रामीण भागात ओमकार पाटील यांनी राबविलेला हा उपक्रम नक्कीच वाखणण्या जोगा आणि स्तुत्य आहे.

### अखेर वाडा बस स्थानकाच्या दुरुस्तीचे काम सुरु



वाडा: काँक्रिटी करणासाठी वाडा बस स्थानक येथे शनिवार दि.२५ जानेवारी पासून खोदकाम सुरु केले असून हे काम महिनाभर चालेले असा अंदाज व्यक्त केला जात आहे. मात्र सर्व बस नवीन स्थानकातून सुटणार असल्यामुळे विद्यार्थी व सर्व प्रवाशांना बस पकडण्यासाठी कोर्टासमोरील बस स्थानका कडे धाव घ्यावी लागत आहे. पहिल्याच दिवशी अनेक विद्यार्थी बस पकडण्यासाठी महामार्गावरून चालत जाताना दिसत होते. खंडेश्वरी नाका येथे एक पीक-उप पॉईंट ठेवणार होते अस समजले मात्र पहिल्या दिवशी असे काही दिसून आले नाही. खंडेश्वरी नाका येथे पीक-अप पॉईंट असेल तर दोन्ही बाजला जाणाऱ्या प्रवाशांसाठी तात्पुरती शेड बंधने आवश्यक असल्याचे प्रवाशांनी सांगितले.

### बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंती निमित्त वाड्यात फळ वाटप आणि रक्तदान शिबीर



वाडा : हिंदूहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंती निमित्त वाड्यात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. शिवसेना (उबाठा) वाडा तालुका व शहर शाखेच्या वतीने गुरुवारी बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंती निमित्त वाडा ग्रामीण रुग्णालयातील रुग्णांना फळं वाटप करण्यात आली. तर पालघर जिल्हा उपप्रमुख प्रकाश केणी यांच्या निवास स्थानी आयोजीत कार्यक्रमात ज्योती ठाकरे, निलेश गंधे, भास्कर दळवी, वर्षा गोळे, डी.बि.पाटील आदी मान्यवरांणी आपले मनोगत मांडले या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निलेश पाटील, यांनी केले. तसेच कुडूस विभागात शिवसेनेचे(उबाठा) गोविंद पाटील यांनी रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते.या शिबिरात ५६ हून अधिक तरुणांनी रक्तदान केले.

# लोकनायक जयप्रकाश नारायण कुष्ठरोग निर्मूलन संस्थेचा स्वर्ण आठवणीची संध्याकाळ!



**वसई/लक्ष्मणराव पाटोळे-पाटील**

वसई पूर्वेकडील वालीव नवजीवन कॉलनी येथील लोकनायक जयप्रकाश नारायण कुष्ठरोग निर्मूलन संस्थेचा ५० वर्षाचा प्रवास पाहता सुवर्ण महोत्सव वर्ष साजरा करण्यात आले . या अस्मरणीय आठवणीला उजाळा देण्यात आला संस्थेच्या मैदानावरील रविवारची संध्याकाळ खरंच 'सुवर्ण' ठरली.

सुवर्ण महोत्सवाचे सुरुवात वेगवेगळ्या कार्यक्रमाने करण्यात आली. लोकनायक जयप्रकाश नारायण कुष्ठरोग निर्मूलन संस्थेचा सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या विशेष कार्यक्रमाची सुरुवात आपल्या संस्थेच्या अध्यक्ष श्रीमती जिरोनिमा जगदीश सामंत यांनी कार्यक्रमाच्या प्रस्तावना केली. स्वर्गीय डॉ. जगदीश सामंत यांनी या संस्थेची सुरुवात १९७४ साली केली. डॉक्टरांनी शासकीय कार्यालयात खेट्या मारून वन विभागाची जमीन भाडेतत्त्वार घेऊन एका छोट्याशा खोलीमध्ये संस्थेचे काम सुरू केले. संस्थेच्या आजूबाजूस सर्व जंगल होते लोक खूप कमी प्रमाणात येथे राहत होते. या कामाची सुरुवात केली तेव्हा येथील गावातील अनेक लोकांचा विरोधी झाला. कारण कुष्ठरोगी रुग्ण या संस्थेमध्ये उपचार घेत होते, परंतु यांच्या विरोधाला न डगमगता डॉक्टरांनी आपले काम सुरूच ठेवले. 'रुग्णसेवा हीच खरी ईश्वरसेवा' समजणारे डॉक्टर आज आपल्या या सुवर्ण महोत्सवी कार्यक्रमात नसल्यामुळे आम्हाला त्यांची उणीव वाटते असे प्रतिपादन संस्थेच्या अध्यक्ष व त्यांच्या पत्नी जेरोनिमा सामंत यांनी केले. या





आठवणीला उजाळा देत असताना त्यांचे अश्रू अनावर झाले. एका छोट्याशा रूममध्ये चालू केलेले संस्थेचा आज वटवृक्ष झाले आहे. या कामाला अनेक देणगीदारांनी हातभार लावला. तसेच येथे काम करणारे डॉक्टर्स व कर्मचारी यांच्या मेहनतीने आज आम्ही एवढा मोठा ५० वर्षांचा काळ गाठू शकलो. म्हणून आज आम्ही स्वर्ण महोत्सव कार्यक्रम मोठ्या आनंदाने व उत्साहाने साजरा करीत आहोत, असेही जेरोनिमा यांनी बोलताना सांगितले. या कार्यक्रमात स्वर्गीय डॉ. जगदीश सामंत आदर्श समाजसेवक, पुरस्कार सत्कारमूर्ती डॉ. विनायक रघुनाथ परुळेकर यांना संस्थेच्या पदाधिकाऱ्याकडून प्रदान करण्यात आला. परूळेकर यांनी वयाची शंबरावी पूर्ण केली आहे. त्यांनी आपल्या जीवनामध्ये अनेक रुग्णांची सेवा केली आहे. समाजाने त्यांना समाजसेवक म्हणून पदवी दिली आहे. ते आपल्या भाषणात म्हणाले की स्वर्गीय डॉ. सामंत यांचे खूप मोठ्या हे कार्य आहे आणि त्यांनी सुरू केलेल्या या संस्थेला ५० वर्षे पूर्ण झाले आहे. या संस्थेकडून मला हा पुरस्कार मिळाला त्याबद्दल मी शतशः ऋणी आहे, अशा भावना त्यांनी व्यक्त केल्या. संस्थेत गेल्या अनेक वर्षापासून सेवा देणारे डॉ. विकास परुळेकर हे सेवानिवृत्त झाले. संस्थेच्या विश्वस्तांकडून त्यांच्या पत्नी व विकास परूळेकर यांचा सत्कार करण्यात आला. विकास परूळेकर आपल्या मनोगत व्यक्त करताना म्हणाले की, मी स्वर्गीय डॉ. सामंत यांच्यासोबत काम केला आहे. त्यांच्या कामाचा अनुभव घेऊन मी आतापर्यंत रुग्णसेवा करीत आलो आहे. मी करोनानंतर एका मोठ्या आजाराने पीडित होतो व त्याचा उपचार घेत होतो, तरी मला संस्थेने दोन वर्षाचा पूर्ण पगार दिला म्हणूनच आज मी या सेवानिवृत्ती व सुवर्ण उत्सव कार्यक्रमात आहे. जरी मी सेवानिवृत्त झालो असेल तरी मी पुढेही संस्थेचे पूर्णवेळ काम करेल अशी ग्वाही त्यांनी दिली. या कार्यक्रमाचे स्वागत अध्यक्ष विनोद मोतीराम गवारी आपल्या भाषणात म्हणाले की, डॉक्टरांकडून आम्हाला फार काही शिकायला मिळालेले आहे. त्यांच्यासोबत आम्ही काम केला आहे. आता आपणास संस्थेच्या माध्यमातून काही सामाजिक कार्यक्रम राबवायचे आहेत. त्यासाठी आम्ही व आमची राष्ट्रीय सेवा योजना मुंबई हे सदैव आपल्या सोबत असेल असे वक्तव्य त्यांनी केले. या कार्यक्रमात डॉ. हेमंन कुलकर्णी सचिव, मनीष दाभोळकर खजिनदार, सुरेश मिश्रा विश्वस्त,, डॉ. विजय पागे कार्यकारी विश्वस्त, राजश्री सामंत महालक्ष्मी हॉस्पिटल सीईओ व काही सामाजिक संस्था तसेच विभागातील काही मान्यवर व्यक्ती आणि पत्रकार व स्थानिक नागरिक ही मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संस्थेचे डॉक्टर्स व कर्मचारी यांनी अफाट मेहनत घेतली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुजाता कवळी यांनी केले.

## गुरुचरण जमिनीवरील बेकायदेशीर बांधकामावर तोडक कारवाई



**विरार/प्रतिनिधी**

सरकारी गुरुचरण जमिनीवर काही चाळ माफियाकडून बेकायदेशीरपणे बांधकामे डीएफसीसी रेल्वे ओव्हर ब्रिजचे काम सुरू असलेल्या बाजूस काही अनधिकृत ढाबा व चाळी बांधलेल्या होत्या. महसूल प्रशासन व महापालिकाच्या संयुक्त कारवाईने जेसीपीच्या माध्यमातून जमीन दोस्त करण्यात आल्या दोन्ही विभागाच्या प्रशासनाला कारवाई करीत असताना स्थानिक नागरिकांकडून त्याचा विरोध करण्यात आला व कारवाई करीत असताना मोठा अडथळा निर्माण झाला. म्हणून कारवाही करण्यासाठी खूप मोठी मशागत करावी लागली. गाव मौजे शिरगाव येथील शासकीय गुरुचरण सर्वे नंबर ३५३, ४०२ गडगानाका डीएफसीसी रेल्वे ओव्हरबीजचे काम सुरू असतानाही शेजारील गुरुचरण जमिनीवर चाळमाफीकडून अनधिकृत धाबा, व्यापारी गाळे, दोन रूम टॉयलेट बाथरूम या सर्व बांधकामावर महसूल विभाग व महानगरपालिका यांची संयुक्त कारवाही करून जमीन मोकळी करण्यात आली. ही कारवाही सकाळी ११ ते संध्याकाळी ५.०० वाजेपर्यत चालली. तालुक्यात ...पान ६ वर




## भूमि अभिलेख कोकण प्रदेश मुंबई क्रीडा आणि सांस्कृतिक स्पर्धा संपन्न





**रत्नागिरी/प्रतिनिधी**

कोकण प्रदेश भूमी अभिलेख क्रीडा व सांस्कृतिक विभागीय स्पर्धा २०२५ डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ दापोली विजय क्रीडा संकुलन येथे यशस्वीरित्या संपन्न झाला. मुंबई उपनगर, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सर्व खेळाडूंनी क्रीडा व संस्कृती स्पर्धेत भाग घेतला. प्रमुख पाहुणे कुलगुरू डॉ. संजय भावे तसेच अनिल माने उपसंचालक भूमी अभिलेख कोकण प्रदेश सर्व जिल्ह्यातील अधीक्षक भूमी अभिलेख उपाधीक्षक भूमी अभिलेख नगर भूमापन अधिकारी यांनी दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात केली. जिल्हा खेळाडू संघा मानवंदना दिली.

या २२ ते २४ जानेवारी २०२५ पर्यत होणाऱ्या क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धा संपन्न झाल्या. कार्यक्रमाची सुरुवात ठाणे जिल्हा नृत्य, मुंबई उपनगर नृत्य तसेच एकपात्री लोकमान्य टिळक विशाल गोल्डन गर्ल पल्लवी कदम राणी ताराबाई आणि येसूबाई एकपात्री खूप छान रचले. सिंधुदुर्ग जिल्हा फेम सचिन टीम सर यांचे भूमी अभिलेख कर्मचारी तांत्रिक वेतनश्रेणी बाबत कटू सत्य नाटक सादर केले. पी २४ तास बातम्या ऐकलं नृत्य डान्स शितल सौदाने तसेच पालघर भूमी अभिलेख किशोर कुमार समीर झोपले सोलो गायन गाऊन आलेल्या सर्व श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. सिंधुदुर्ग जिल्ह्यात सांस्कृतिक क्षेत्रात चांगले कामगिरी केलेले कलाकार टीम व त्यांचे इतर सहकारी यांनी देखील सुंदर कला सादर केल्या. क्रिकेट स्पर्धेमध्ये रायगड संघाने ५४ धावाचे लक्ष मुंबई उपनगर संघाने दिले. ३४ धावसंख्या उभारली तसेच २० धावांनी त्यांचा पराभव झाला. अंतिम क्रिकेट सामना अपुरा प्रकाशाने एकतर्फी झाला. संपूर्ण क्रिकेट स्पर्धेत नाव गाजवलेले मुंबई उपनगर खेळाडू यांनी २९ चेंडू मध्ये ७० धावा करणारे जयेश वारघडे यांचे तसेच सिंधुदुर्ग कडून अजय शेख रायगड कडून जरंग सर यांनी देखील सुंदर फलंदाजी केली. पालघर मधील निवेदिता खेळाडू यांनी सुंदर गोलंदाजी प्रदर्शन केले. मुंबई उपनगर संघांकडून राज यशवंतराव यांनी ८ धावांच्या मोबदल्या ६ गडी बाद केले त्याचे विशेष कौतुक करण्यात आले. रायगड संघाने अंतिम सामना जिंकून प्रमोद सर, नयन पाटील, शैलेश डबरी, सागर नवखा यांचे नेतृत्वाखाली विजय मिळवला. क्रिकेटच्या फायनल स्पर्धेच्या शेवटच्या दिवशी खेळावी अशी मागणी होती. महिला खो-खो ठाणे विरुद्ध रायगड हा सामना खूप अटीतटीचा झाला. नवीन महिला खेळाडू रायगड जिल्ह्यात अत्यंत उत्तम खो-खो खेळ साजरा केला. अत्यंत चुरशीची स्पर्धा झाली. यामध्ये नवीन खेळाडू यांचे कामगिरी सर्वोत्तम होती. खूप मेडल नवीन कर्मचारी खेळाडूंनी पटकावले, यांच्या कौतुक केले. कुणाला पारितोषिक मिळाले नाही म्हणून नाराज होऊ नये पुढील वर्षी नव्या जोमाने सराव करून चांगले खेळाडू बनून आपणही पदक जिंका असे संघाकडून सांगण्यात आले. काही खेळाडू आणि सांस्कृतिक कलाकार त्यांच्या खाजगी कारणास्तव उपस्थित राहू शकले नाहीत. त्यांनी पुढल्या वर्षी पालघर जिल्हा येथील अवश्य सहभागी व्हावं असे भूमि अभिलेख कोकण प्रदेश सांस्कृतिक व क्रीडा विभागाच्या प्रमुखांकडून सांगण्यात आले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे आनंद भंडारी अप्पर जमावबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख महाराष्ट्र राज्य पुणे, नरेंद्र पाटील पालघर भूमी अभिलेख अधीक्षक, अमोल बदाडे उपाध्यक्ष भूमि अभिलेख वसई, कार्यक्रमाचे व्यवस्थापक सचिन इंगळे जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख रत्नागिरी, नरेंद्र गोरे, संजय पाटोळे, भाऊसाहेब नागवेकर, विशाल कुबल, श्रीमती अपूर्व मांडवकर व श्री मांडवकर, दर्शना साळवी हे मान्यवर उपस्थित होते.

### 'वसई तालुका पत्रकार संघा'चा पत्रकारितेविषयी स्तुत्य कार्यक्रम संपन्न

## नवोदित पत्रकारांना पत्रकारितेच्या अनेक संधी -प्रा.महेश जगताप



**वसई/प्रतिनिधी**

आजच्या डिजिटल युगात विद्यार्थ्यांना पत्रकारितेच्या अनेक संधी उपलब्ध आहेत. वृत्त पत्र पत्रकार, वाहिन्यावरील पत्रकार जाहिरात विभाग याबरोबरच सोशल मीडियावरील फेसबुक, एक्स पोस्ट इन्स्टरगाम याआरखी विविध माध्यमे उपलब्ध असल्याने या क्षेत्रात करिअर करणाऱ्या विद्यार्थ्यांना हे दालन म्हणजे समाजसेवेसोबत विविध समस्यांना वाचा फोडणारे साधन झाल्याचे प्रतिपादन विवा महाविद्यालयात चे प्राध्यापक महेश जगताप यांनी जूचंद्र येथे वसई तालूका पत्रकार संघ, शिवछत्रपती समाज सेवा मंडळ आणि कर्मवीर भाऊराव पाटील कनिष्ठ महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या पत्रकारिता मार्गदर्शन कार्यक्रमात केले. या कार्यक्रमाला जेष्ठ पत्रकार केदारनाथ पाटील, समाज सेवा मंडळ संस्थपक पुरुषोत्तम पाटील, मंडळ अध्यक्ष किरण म्हात्रे, रयत शिक्षण संस्था सातारा, जनरल बॉडी सदस्य विनय गोपिकिसन पाटील, निवृत्त माहिती उपसंचालक निरंजन राऊत, डॉक्टर हेमंत जोशी, पत्रकार संघाचे अध्यक्ष संदीप पंडित, उपाध्यक्ष भरत म्हात्रे, सचिव आशिष राणे, खजिनदार अरुण सिंग आदी व्यासपीठावर उपस्थित होते. या कार्यक्रमात मार्गदर्शन करताना कार्यक्रमाचे प्रास्तविक पुरुषोत्तम पाटील व मनोगत संदीप पंडित यांनी केलं. या कार्यक्रमात बोलताना दुसरे मार्गदर्शक प्रा.अभिषेक माडये यांनी सांगितले की वाणिज्य शाखेतुनही पत्रकारितेच्या अनेक संधी उपलब्ध आहेत. ज्यामध्ये शेअर मार्केट, अर्थव्यवस्था, बँकिंग आदी फायनास विषयाबाबत पत्रकारिता करण्याची दालन उपलब्ध आहेत. यासाठी विद्यार्थ्यांनी वेळोवेळी वाचन व लेखन यावर आपलं प्रभुत्व ठेवण व सातत्य ठेवणं आवश्यक असल्याचे सांगितले. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे केदारनाथ पाटील यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना जूचंद्र हे जसे कलाकारांचे गाव आहे तसे त्याठिकाणचे ...पान ६ वर